'सुमंत' कविकृत.

सीतापुनर्वियोग नाटक.

प्रकाशक,

मेसर्स पाटील आणि मर्दे.

यथा मधुलिड् पुष्पं योजयेत् पुस्तकं तथा ।

'सुमंत' कविकृत

सीतापुनर्वियोग नाटक.

प्रकाशकः

मेसर्स पाटील आणि वर्दे,
ग्रांटरोड—मुंबई.

१९११.

किंमत ८ आणे.

Printed by
G. N. Kulkarni, at the Karnatak Press,
No. 7, Girgaon Back Road, Bombay.

प्रकाशकांचे दोन शब्द.

मराठी वाङ्मयांत जेणेंकरून एका सुंदर ग्रंथाची भर पडेल असें पुस्तक **'उद्याना'**च्या आश्रयदात्यांस भेटीदाखल देण्याचा आमचा उद्देश कितपत पार पडेल याची आह्मांस शंका होती. पण ईशकृपेनें ज्या कांहीं उदार रसिक व विद्वान अशा महाराष्ट्र लेखकांची **'उद्याना'**स आरंभापासूनच मदत होत होती त्यांपैकीं आमचे मित्र **'सुमंत'** यांचे सहाय्यानें शेवटीं आह्मास आमचा संकल्प पार पाडतां आला याबद्दल त्यांचे आह्मी फार ऋणी आहों. **'उद्याना'**च्या या प्रेमपूर्वक अर्पिलेल्या भेटीचा **'उद्याना'**चे वाचक सप्रेम स्वीकार करोत.

'उद्यान' मासिक व हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचे कामीं 'कर्नाटक' छापखान्याचे मालक **श्रीयुत गणपतराव कुळकर्णी** यांचें जें कळकळीचें सहाय्य झालें व होत आहे त्यांचेही येथें आभार मानणें अवश्य आहे. सकल स्फूर्तिशक्तिदाता प्रभु आमच्या अंगीं महाराष्ट्र भाषेची अशीच सेवा करण्याचा हुरूप कायम ठेवो !

प्रकाशक.

कवीचे उद्गार.

प्रस्तुत **'सीतापुनर्वियोग' नाटक** हें महाकवि **भवभूति** यांच्या संस्कृत **'उत्तररामचरित'** नामक प्रसिद्ध नाटकाचें मराठी प्रतिबिंब होय. मूळ संस्कृत नाटक सात अंकी असून तें श्राव्यकाव्यमय असल्यामुळें, रंगभूमीवर प्रयोग करण्यास पात्र नाहीं, असा कित्येक विद्वानांचा अभिप्राय आहे व तो बऱ्याच अंशीं खराही आहे. तथापि इतकें उत्कृष्ट नाटक मागें पडून राहणें बरें नव्हे, असें वाटल्यावरून मीं त्यांत बऱ्याच ठिकाणीं योग्य ते फेरफार करून त्याचे पांच अंक केले आहेत, आणि त्यास संगीताचें मोहक रूप देऊन, तें प्रयोगास सोईस्कर होईल असें माझ्या अल्पबुद्धीप्रमाणें सजविलें आहे ! पद्यांच्या चाली कर्णमधुर व प्रसंगानुकूल अशा जुन्या व नव्या निवडून घातल्या आहेत. हा माझा प्रयत्न कितपत सिद्धीस गेला आहे हें पाहणें रसिकवाचकवर्गाकडे आहे. त्याला माझी ही कृति अल्प जरी पसंत पडली तरी माझ्या श्रमाचें योग्य चीज झालें असें मी समजेन.

प्रस्तुत नाटक रचण्याचे कामीं, कै. **परशुरामपंत तात्या गोडबोले** यांचें उत्तररामचरिताचें मराठी भाषांतर, **वे० वामनशास्त्री** इसलामपूरकर यांची करुणराघव कादंबरी व विविधज्ञानविस्तारांतून प्रसिद्ध झालेले श्रीयुत **महादेव त्र्यंकट लेले** यांचे उत्तररामचरित सार व विचार, इत्यादि पुस्तकांचा मला बराच उपयोग झाला; याबद्दल त्या त्या पुस्तकांचे कर्त्यांचा मी फार फार आभारी आहें!

त्याप्रमाणेंच ही माझी कृति पुस्तकरूपानें रसिकांपुढें मांडण्याचें श्रेय **'उद्यान'** मासिकाचे संपादकांनीं आपल्याकडे घेतलें, हें त्यांचें ऋण तर माझ्या हातून निःसंशय कदापि फिटणार नाहीं! असो, शेवटीं ज्याच्या कृपाप्रसादामुळें हें माझें अल्प कार्य तडीस गेलें, त्या जगच्चालक दयार्णव परमेश्वराची प्रार्थना करून मी येथेंच थांबतों.

कोल्हापुर,
२०।१२।१० इ०

'सुमन्त.'

संगीत

सीतापुनर्वियोग नाटक.

अंक १ ला.

मंगलाचरण.

पद—(भूप-त्रिवट.)

ती अतर्क्य बहु चेतोहरा तव लीला ईश्वरा ॥ ध्रु० ॥
सविता चंद्र ग्रहगण तारे। लावियले त्वां दीपचि सारे!
रंगभूमि चित्रा तैशी निर्मियली ही धरा ॥ १ ॥
नाना पात्रें मनुजें केलीं। भिन्ना वेषीं करिती केली।
सूत्रधार तूं परि न कळे रूप कुणाही जरा ॥ २ ॥

पद-(काफी-त्रिवट.)

त्या आद्यां कविवरां। सकलां। मम असो सदा हा नमस्कार ॥ध्रु०॥ अनुग्रहानें अल्पहि ज्यांच्या। आत्म्याची जी कलाच वाचा। संपादिन ती सुधासार ॥ १ ॥

(पारिपार्श्वक निघून जातात.)

सूत्रधार—(पुढें येऊन) झालें इतकें मंगलाचरण पुरे आहे. अधिक विस्तार कशाला? आतां या एकत्र जमलेल्या महाजनांला मी इतकीच प्रार्थना करितों कीं,

साकी-(धुमाळी.)

कालिदासकृति संगीतीं त्या दावियली बलवंतें।
तैशी ही भवभूतिकृति असे रचिली आज सुमंतें ॥
मूळांतिल गोडी। नाहीं मिळेल परि थोडी ॥ १ ॥

असें जरी आहे, तरी गुणैकदृष्टीनें या सीतापुनर्वियोग कृतीचें त्यांनीं अवलोकन करावें; ह्मणजे कवीला उत्तेजन दिल्याप्रमाणें होईल. असो, आतां मारि-

षाला बोलावून पात्रांची सिद्धता झाली कीं नाहीं हें विचारावें. पण हा पहा, तोच आपला दुर्मुखाचा वेष घेऊन इकडे येतो आहे. तर आतां त्याला विचारण्याचें कारणच नाहीं. या बाजूनें नेपथ्यांत जाऊन आपल्या पुढील वेषाच्या तयारीला लागावें. (निघून जातो.)

(प्रस्तावना समाप्त.)

अंक] प्रवेश १ ला. [पहिला.

[दुर्मुख प्रवेश करितो.]

दुर्मुख–(स्वतःशीं) शिव शिव!

दिंडी–(दादरा.)

जानकीला जन देति दूषणास ।
राक्षसाच्या गृहिं घडे ह्मणुनि वास ॥
अग्निशुद्धीला मानितात खोटें ।
मला वाटे साश्चर्य दुःख मोठें ॥ १ ॥

काय करावें? आतां हा सीतादेवीविषयीं लोकापवाद प्रभु रामचंद्राला कसा सांगावा? पण प्रभूंनींच हें गुप्तदूताचें काम माझ्याकडे सोंपविल्यामुळें माझा निरुपाय आहे. मला प्रभूंची आज्ञा मान्य केलीच पाहिजे. हाय ! हाय ! काय हें माझ्या कपाळीं आलें? ही वार्ता ऐकून प्रभूंच्या मनाची स्थिति काय होईल? आणि ते सीतादेवींची काय दशा करितील कोण जाणे! तशांतून त्या गरोदर असून त्यांचे प्रसूतीचे दिवसही भरत आले आहेत. बरें, अशा वेळीं येथें जाणत्यांपैकीं तरी कोणी आहे ह्मणावें, तर अरुंधतीवसिष्ठांबरोबर कौसल्यादि सर्वच राजमाता ऋष्यश्टंगाच्या–आपल्या जांवयाच्या–आश्रमांत यज्ञाकरितां निघून गेल्या आहेत. जनकमहाराज मात्र मुलीची बऱ्याच वर्षांनीं भेट झाली ह्मणून इतके दिवस येथें राज्याभिषेकाचा उत्सव पहात राहिले होते; पण ते देखील नुकतेच आपल्या मिथिला राजधानीला परत निघून गेले. आणि त्यांच्या वियोगानें तर सीतादेवीचें मन फारच उदास झालें आहे; अशा स्थितींत जर मीं ही वार्ता प्रभूंला कळविली, तर काय अनर्थ होईल, किती दुःखाचा प्रसंग येईल, याची कल्पनाच करवत नाहीं! नको, नको हा जीव आतां! हा

अपवाद कानीं पडतांच माझे प्राण या देहांतून कां निघून गेले नाहींत? पण या दुर्मुखाचें तितकें सुदैव कोठें आहे? असो, जें दैवीं कर्तव्य आलें आहे तें केलेंच पाहिजे. [निघून जातो.]

अंक] प्रवेश २ रा. [पहिला.

[सीता व राम]

राम—प्रिये जानकि! असें काय बरें करितेस?

पद—(पिलु–दीपचंदी.)

न करीं ऐसा तूं खेद अतां। हृदयासि जरा निज दे स्थिरता ॥ ध्रु० ॥ गुरुजन गेले आह्मां त्यजुनी। तीं नित्य अनुष्ठानें ह्मणुनी। तिळमात्र नसे त्यां स्वतंत्रता ॥ १ ॥ ये प्रत्यवाय कीं जरि कांहीं। तरि आहिताग्निची त्या पाहीं। हो संकटाच ती गृहस्थता ॥ २ ॥

सीता—प्राणनाथ! हें सारें मी जाणतें; पण काय करूं?

पद—(यमिमायमि०)

दुःसह बहु विरह वाटतो। बंधुजनांचा तो ॥ ध्रु० ॥ गेले गुरुजन सारे एकदांचि या कालीं। उदासीनता आली। ह्मणुनि हृदयिं खेद दाटतो ॥ १ ॥

राम—असें खरेंच. या संसारांतील प्रत्येक गोष्ट अशी हृदयाला भेदून टाकणारी आहे; आणि ह्मणूनच सर्वसंगपरित्याग करून विचारशील मुनिलोक मनाला शांति देणारा असा अरण्यवास पत्करितात.

कंचुकी—(प्रवेश करून) रामभद्र! (चपापून) महाराज!

राम—(किंचित् हंसून) आर्या! छेः, असें नांव कां फिरविलेंत? तुह्मीं वडिलांच्या वेळच्या माणसांनीं मला 'रामभद्र' ह्मटलेलेंच अधिक शोभतें. तुह्माला परिपाठ आहे तशीच मला हांक मारीत जा.

कंचुकी—महाराज! ऋष्यशृंगमुनींच्या आश्रमाकडून अष्टावक्र आले आहेत.

सीता—मग उशीर कां? त्यांना लवकर आंत येऊं द्या.

कंचुकी—जशी आज्ञा. (जातो.)

अष्टावक्र—(प्रवेश करून) तुह्मां उभयतांचें कल्याण असो.

राम--आर्या ! मी अभिवंदन करितों. या आसनावर बसावें.

सीता--माझाही प्रणाम असो. सर्व वडील माणसें खुशाल आहेत ना ?

अष्टावक्र—सर्व खुशाल आहेत.

सीता—आणि शांता वन्सें ?

अष्टावक्र--त्याही खुशाल आहेत.

राम—आमचे मेव्हणे भगवान् ऋष्यशृंग आणि आमची भगिनी शांता-आक्का यांचें यज्ञानुष्ठानकर्म निर्विघ्नपणें चाललें आहे ना ?

अष्टावक्र—अगदीं निर्विघ्नपणें चाललें आहे.

सीता--दोघेंही आमची आठवण काढितात का ?

अष्टावक्र—आठवण काढितात यांत काय संशय ! वारंवार आठवण काढितात. (बसून) देवि सीते ! भगवान् वसिष्ठ गुरूंनीं तुला सांगितलें आहे कीं,

पद--(पार्थी तुज देउनि०)

प्रसवे वसुधा तुज कन्ये । जनकही प्रतिधाता धन्ये ॥ ध्रु० ॥
कुलगुरु रवि मी तसाचि ज्यांतें । होसि वधू त्या रघुकुं-
लजांतें । शोभसि बहु सौजन्यें ॥ प्रसवे वसुधा तुज कन्ये ॥१॥

तेव्हां आह्मीं तुला आणखी कोणता आशीर्वाद द्यावा ? आतां तूं वीरप्रसू हो ह्मणजे झालें.

राम—वसिष्ठ गुरूंचा हा आह्मांवर मोठा अनुग्रहच होय. कारण,

पद--(बिहाग-त्रिवट.)

साधारण साधूंची वाचा । धांवे अनुरोधें अर्थाच्या ॥ ध्रु० ॥
आद्यमुनी हे परि जे असती । अर्थचि घेती धांव
निश्चितीं । वाणिकडे त्यांच्या ॥ साधारण साधूंची० ॥ १ ॥

अष्टावक्र—तसेंच रामा ! तुला भगवति अरुंधती, कौसल्यादि राजमाता आणि शांताबाई यांनीं पुनःपुन्हा असें सांगितलें आहे कीं, सीतादेवीला गर्भारपणाचे जे जे डोहाळे होतील ते ते सर्व तत्काळ अवश्य पूर्ण करावे.

राम—होय, पण ही सांगेल तर !

अष्टावक्र--आणि देवि जानकि ! तुझ्या नणंदेचे पति भगवान् ऋष्यशृंग यांनीं तुला निरोप सांगितला आहे कीं, तूं गर्भार असून तुझे प्रसूतीचे दिवस

भरत आले आहेत, ह्मणून तुला आह्मीं इकडे आणविली नाहीं. आणि तुझ्या करमणूकीकरितांच रामभद्रालाही तेथें सोबतीला ठेविला आहे. आतां तूं पुत्राला मांडीवर खेळवितांनाच आह्मी तुला पाहूं.

राम–(किंचित् हंसून) बरें, असेंच होवो. वसिष्ठ गुरूंची आणखी कांहीं आज्ञा आहे का ?

अष्टावक्र—होय; त्यांनीं पुन्हा तुला असें सांगितलें आहे कीं,

पद–(शाखा सद्गुण जया०)

गुंतुनि गेलों यज्ञीं अह्मि या जामाताच्या घरीं ।
बाल अजुनि तूं राज्यहि नव तें आलें तुझिया करीं ॥
राहुनि तत्पर तरी बहुपरी लोकरंजना करीं ।
मिळवीं रामा ! सुकीर्ति तुमची तीच संपदा खरी ॥१॥

राम—जशी गुरुजींची आज्ञा. प्रजेला खुष ठेवण्यांत स्नेह, दया, सौख्य, फार काय-प्रत्यक्ष या जानकीचाही त्याग करावा लागला, तरी त्याबद्दल मला कांहीं वाईट वाटणार नाहीं.

सीता--ह्मणूनच आपल्याला रघुकुलधुरंधर ह्मणायचें !

राम—असो; कोण आहे रे तिकडे ? या अष्टावक्र मुनींची चांगली बरदास्त ठेवा.

अष्टावक्र—(उठून इकडे तिकडे पहात) अरे, हा कुमार लक्ष्मण आला. (निघून जातो.)

लक्ष्मण–(प्रवेश करून) दादांचा विजय असो. दादा ! आपल्या आज्ञेप्रमाणें त्या चितान्यानें आपल्या चरित्रांतील निरनिराळ्या प्रसंगांचे देखावे काढून तयार केलेला चित्रपट आपल्या विलासमंदिरांत आणून लाविला आहे, तो पहावा.

राम--बरें झालें. देवीचेंही मन उदास झालें आहे, तर तिला बरीच करमणूक होईल. पण कोठपर्यंत चित्रें काढिलीं आहेत ?

लक्ष्मण—वहिनींची अग्नींत शुद्धि झाली, तेथपर्यंत.

राम—छेः ! जी जात्याच शुद्ध तिला दुसऱ्या वस्तूकडून काय शुद्धता येणार आहे ? तीर्थोदक आणि अग्नि यांना दुसऱ्यांनीं तें काय करायचें ? हे यज्ञभूसंभवे

जानकि! हा अग्निशुद्धीचा लोकापवाद तुला यावज्जीव लागणार. त्याला आतां उपाय नाहीं. पण रागावूं नको, क्षमा कर. कारण,

पद—(कपोला कपोलाचि०)

जनालागिं अनुरंजवावें असें। कुलीना कठिण वर्तणें
तें असे ॥ ध्रु० ॥ दुरुक्तें प्रिये बोललों जीं अतां। मुळीं
उचित ना तीं तुला तत्वतां ॥ धरावें सदा गौरवें
मस्तकीं। स्वभावें अशी योग्यता ज्यास कीं। सुगंधी
तया चारु पुष्पा कसें। चुरावें पदीं,क्षुद्रता का नसे॥१॥

सीता—राहूं द्या प्राणनाथ! त्याचें काय मेलें आत्तां! चला आपण आपलीं तीं चित्रें पाहूं. [चित्रपटाचा देखावा.]

लक्ष्मण—हा पहा चित्रपट.

सीता—(निरखून पाहून) पण हे वरल्या बाजूला प्राणनाथांची स्तुति करीत सारखे उभे राहिले आहेत असे दोघे कोण?

लक्ष्मण—वहिनी! हीं सरहस्य जृंभकास्त्रें. हीं प्रथम कृशाश्वमुनींपासून भगवान् विश्वामित्र ऋषींना प्राप्त झालीं, आणि त्यांनीं ताटकावधाचे वेळीं दादांना कृपाप्रसाद ह्मणून दिलीं.

राम—जानकि! हीं दिव्य अस्त्रें आहेत, यांना वंदन कर.

सीता—या अस्त्रदेवतांना माझा नमस्कार असो.

राम—आतां हीं अस्त्रें तुझ्या पुत्रांना प्राप्त होतील.

सीता--हा माझ्यावर मोठा अनुग्रहच आहे.

लक्ष्मण--हा पुढें मिथिलेंतील वृत्तांत.

सीता—अगबाई! हे प्राणनाथ! किती मनोहर रूप काढलें आहे तरी!

पद--(सुवर्ण केतकि परि जो०)

सतेज कोमल गोंडस ऐशा सुंदर बहु या देहाची।
कांति असे ही श्यामवर्ण जशि नवविकासित नीलाब्जाची ॥
करुनि विलोकन लीला ती त्या चंडशिवधनुर्भंगाची।
प्रेक्षणीय लघु मूर्तिकडे कशि दृष्टि लागली तातांची ॥
कर्णांवरि जी धारण केली दिसते जोडी झुलुपांची।
तेणें आली किती तरी मुखमंडलासि शोभा साची ॥ १ ॥

लक्ष्मण—आणि वहिनी ! हे तुमचे बाबा वसिष्ठादि व्याही मंडळीची पूजा करीत असून शतानंद पुरोहित विधि सांगत आहेत.

राम--खरोखर हा प्रसंग मोठा पाहण्यासारखा आहे. जनकरघुकुलांचा हा संबंध कोणाला प्रिय नाहीं? त्यांतही दान करणारा आणि तें घेणारा स्वतःच कुशिकनंदन विश्वामित्र ! मग काय ?

सीता—हे तुह्मी चौघेही बंधु गोदानादि उरकून एकदमच लग्नाला सिद्ध झालां आहां ! आणि मला तर बाई त्याच वेळीं त्याच स्थळीं जणूं आहें असें वाटतें.

राम—मला देखील असेंच वाटतें.

पद—(जरी साक्षात् सुत तो०)

जणुं तोचि समय हा आहे। बहु आनंदाचा पाहें ॥ ध्रु० ॥
सुवर्णकंकणयुक्त तुझा कर मूर्त महोत्सव जो कीं।
त्या दिला शतानंदानें या माझ्या हातीं लोकीं॥ १ ॥

लक्ष्मण--वहिनी ! ह्या आपण; ही आर्या मांडवी; ही वधू श्रुतकीर्ति.

सीता--आणि ही हो चवथी कोण ?

लक्ष्मण-(लाजून हंसत तोंड फिरवून स्वतःशीं) ह्या उर्मिलेविषयीं विचारतात. असो, आपण दुसरेंच दाखवावें. (उघड) वहिनी ! तें कशाला ? हें तर पहा ! हा भगवान् परशुराम.

सीता--अगबाई ! मला तर भय वाटतें.

राम—महर्षे ! तुला नमस्कार असो.

लक्ष्मण—वहिनी ! पहा तर खरें. यांना दादांनीं—

राम--तें राहूंदे रे, दुसरें पुष्कळ पहायाचें आहे. पुढें दाखव.

सीता—(सप्रेम आनंदानें) प्राणनाथ ! अशा या विनयगुणानें आपण किती तरी शोभतां ह्मणून सांगूं !

लक्ष्मण—हें पहा, आपण आतां अयोध्येला आलों.

राम—(डोळ्यांत पाणी आणून) हाय, हाय ! आठवतात बरें-ते दिवस मला वारंवार आठवतात. बाबा असतांना ज्यावेळीं आमचीं नुकतींच लग्नें झालीं, तेव्हां आमच्या आयांनीं जे कांहीं लाड केले, जी कांहीं काळजी घेतली-असे ते आमचे बाळपणचे आनंदाचे दिवस निघून गेले ! ते आतां पुन्हा कसचे येतात ! त्यावेळीं ही जानकीदेखील—

पद—(निंदितात माते०)

सान अवयवांनीं आपुल्या मधुर बाललीला करी।
पाहतांचि त्या मातांच्या मोद हो किती अंतरीं ॥ ध्रु० ॥
विरल कुटिल कुंतल भालां। दंत कुंद कलिका माला।
मुग्ध हास्य खुलवी गालां। लोल दृष्टि विहित वयाला।
वदन कांतिही विलसे ती धवल चंद्रिकेच्या परी ॥ १ ॥

लक्ष्मण—ही पहा मंथरा.

राम—(बुद्ध्या दुसरीकडे दृष्टि देऊन) प्रिये जानकी ! हा पहा तो शृंगवेर नगरी जवळील इंगुदीचा वृक्ष. याच्या खालींच त्या प्रेमळ निषादपति गूहकाचा समागम झाला होता.

लक्ष्मण—(हंसून स्वतःशीं) अरे, दादांनीं मध्यममाता कैकेयीचा वृत्तांत अगदींच गाळला !

सीता—प्राणनाथ ! आपण ह्याच ठिकाणीं जटा वळल्या, नाहीं बरें ?

लक्ष्मण—(एकीकडे) शिवशिव ! काय सांगावें ?

पद-(हतबल तो अश्व०)

पुत्रांतें राज्य सारें स्वकरानें वाहुनी।
त्या अमुच्या पूर्वजांनीं वृद्धपणा पाहुनी ॥
वनवासव्रत सुखानें पुण्यदसें पावणें।
बालपणामधिंच आलें तें दादांकारणें ॥ १ ॥

सीता—ही पहा, स्वच्छ आणि पवित्र जलाची भगवती भागीरथी.

राम—रघुकुलदेवते गंगे ! तुला नमस्कार असो. तूं जगद्वंद्य जगन्माता आहेस, तर या आपल्या सुनेवर अरुंधतीप्रमाणेंच कृपा ठेवून तिचें कल्याण चिंतन कर.

लक्ष्मण—हा पहा, भारद्वाज ऋषींनीं दाखविलेल्या चित्रकूट पर्वताच्या मार्गांतील यमुनातीरावरील श्याम नांवाचा वटवृक्ष.

सीता--प्राणनाथ ! आपल्याला या स्थलाचें स्मरण आहे का ?

राम—प्रिये ! मी कसा बरें विसरेन ? कारण-

पद-(त्या मदनानें नाहिं०)

चालुनि चालुनि गेलिस थकुनी मार्गीं तूं भारी।
विकल जाहलीं आलस्यानें गात्रें हीं सारीं ॥ ध्रु० ॥

एकामेकां दृढ कवळोनी संवाहन केलें ।
त्वदंग निर्बल चुरितमृणालासम होउनि गेलें ॥
तेव्हां शिर हें त्वां मम हृदयावरी ठेवियेलें ।
झोंप लागली आह्मां येथें संगें सुकुमारी ॥ १ ॥

लक्ष्मण—हें विंध्यारण्य. यांत प्रवेश करितांना विराध राक्षसानें आपणांला अटकाव केला होता.

सीता—जाऊं दे मेलें तें; मला नको पहायला आतां! प्राणनाथांनीं आपल्या हातांत ताडाचें छत्र धरिलें होतें, आणि आपण दक्षिणारण्यांत शिरलों तें पाहूं या.

राम—प्रिये ! हीं तपोवनें पाहिलींस का ? येथें या नदीकांठच्या वृक्षांखालीं ऋषींचे कितीतरी आश्रम आहेत !

लक्ष्मण—हा तो जनस्थानामधला प्रस्रवण पर्वत.

राम—हा पर्वत, प्रिये ! तुझ्या पूर्ण ओळखीचा असला पाहिजे; कारण–

पद—(अंबरगत परि पयो०)

केली सारी सोय लक्ष्मणें याच पर्वतावरी ।
लोटिला काळ सुखें कितितरी ॥
वाहे याच्या जवळुनि रुचिकरनीरा गोदावरी ।
क्रीडलों तटीं तिच्या बहुपरी ॥

त्याचप्रमाणें एकदां चांदण्या रात्रीं--

। चाल । अह्मि कवळुनि शयनीं परस्परां दृढ करीं ।
लावूनि गाल गाला प्रेमाच्या भरीं ।
काढियल्या गोष्टी आठवतां अंतरीं ।
। चाल । वदतां वदतां रात्र शेवटीं गेलि सरुनि सुंदरी
राहिल्या तशाच गोष्टी परी ॥ १ ॥

लक्ष्मण--ही पंचवटींत शूर्पणखा.

सीता--हाय हाय !! प्राणनाथ ! आतां आपली हीच शेवटची भेट !

राम—हा वेडे ! हें चित्र आहे. आतां तें वियोगाचें भय मानूं नको.

सीता—कांहीं असो; पण मेलें दुष्टाचें नांव घेतलें तरी त्यापासून ताप होतोच !

राम—अरेरे ! हा जनस्थानांतला वृत्तांत आतांच घडत आहे कीं काय असा भास होतो !

लक्ष्मण—खरोखर काय तो प्रसंग !

पद—(दैवयोग दुर्विपाक०)

स्वर्णमृगच्छद्मानें दुष्ट राक्षसीं। दिधला बहु ताप, करुनि गोष्ट जी तशी ॥ ध्रु० ॥ झाला परिहार प्रतिकारही जरी। होतां क्षणिं आतां स्मृति आपणा तरी। देत असे सलुनि मनीं ती व्यथा अशी ॥ १ ॥ शून्य जनस्थानींचा शोक पाहुनी। पाषाणहि रडले ते द्रव न साहुनी। पविहृदयहि भंगावें वाटतें मसीं ॥ २ ॥

सीता—हाय हाय ! प्राणनाथ ! माझ्याकरितां आपल्याला इतके क्लेश झालेना ?

लक्ष्मण—(रामाच्या नेत्रांतून अश्रु आलेले पाहून) दादा ! हें काय ?

पद—(सारंग—धुमाळी.)

नेत्रांतुनि या टपटप भूवरि अश्रुबिंदु गळती।
जैशीं तुटल्या माळेमधुनी मोत्यें ओघळती ॥ ध्रु० ॥
दाटे शोकावेग किती तरि अपुल्या हृदयांतीं।
कष्टें मोठ्या सांवरितां तो परि न गमे शांती ॥ १ ॥
अधर नासिकापुट तैसे बहु दिसती हे स्फुरती।
तेणें कळते दुःखाची ती बद्धस्थिति पुरती ॥ २ ॥

राम—वत्सा लक्ष्मणा ! काय सांगूं ?

पद—(नंदन वनदेवीनें०)

प्रिय सखयेच्या विरहें तेव्हां येउनि जन्माला।
प्रतिकाराच्या आशेवरि जो सह्य मला झाला ॥ ध्रु० ॥
दुःखानल तो दुःसह आजी येत अनुभवाला।
हृन्मर्मींचा व्रणकिण तैसा देइ वेदनांला ॥ १ ॥

सीता—हाय हाय ! यावेळीं प्राणनाथांच्या वियोगानें दुःखित झालें आहें असेंच मला वाटूं लागलें आहे !

लक्ष्मण—आतां पुढें हा—

राम—लक्ष्मणा ! पुरे कर–पुरे कर–आतां माझ्यानें नाहीं पाहवत ! मला पुन्हा तोच प्रियेचा वियोग पुढें दृष्टीस पडणार–आणि ही देखील थकलेली दिसते. हिला विश्रांति घेऊं दिलेली बरी.

लक्ष्मण—ठीक आहे, जशी आज्ञा.

सीता—प्राणनाथ ! या चित्रदर्शनानें माझ्या मनांत कांहीं आलें आहे, विचारूं का ?

राम—प्रिये ! 'विचारणें ?' काय आज्ञा आहे, बोल.

सीता—असें कसें होईल ? मीं आपल्याला प्रार्थनाच करावी ! मला वाटतें कीं,—

पद—(लग्न अह्मीं लाविलें)

आज पुन्हा जाउनी । वनातें । मन रमवावें पाहुनी ॥ ध्रु० ॥
ती पावन भागीरथी । जल शीतल विमलहि अती ।
तनु शमवावी त्यांत न्हाउनी ॥ वनातें । आज० ॥ १ ॥

राम—फार उत्तम आहे. वत्सा लक्ष्मणा ! प्रियेला डोहाळे होतील ते तात्काळ पुरविण्याविषयीं गुरुजनांची नुकतीच आज्ञा झाली आहे. तर जा, वाटेंत अंगाला अगदीं धक्का न लागेल असा रथ लवकर तयार करव.

लक्ष्मण—आज्ञा ! हा रथ तयार झालाच ह्मणा. (जातो.)

सीता—पण बाई मी एकटीच नाहीं जाणार. आपणही तिकडे आलें पाहिजे.

राम—तूं मोठी कठीण मनाची खरी ! अग, हेंही सांगावयाला का पाहिजे ?

सीता—तसें झालें तर मग फारच बरें होईल !

राम—प्रिये ! लक्ष्मण रथ तयार करवी तोंपर्यंत आपण त्या खिडकीजवळ वाऱ्यावर बसूं चल.

सीता—बरें तर, चित्रें पाहण्याच्या परिश्रमानें मलाही थोडी झोंप येतेशी वाटते. तिथेंच थोडा वेळ पडेन.

राम—तर मग तेथेंच माझ्याजवळ गळ्यांत हात घालून अंमळ नीज. आण तो हात इकडे माझ्या गळ्यांत घाल पाहूं ! (तसें करून) प्रिये ! मला असें हें काय होतें बरें ? तुझा स्पर्श होत जातो तसतशीं माझीं इंद्रियें सारीं मूढ बनताहेत ! या विकारामुळें त्यांचें चैतन्य नष्ट होऊन तीं जशीं एकांतिक होताहेत, तेव्हां हें आहे तरी काय ?

पद—(नृपममता रामा०)

सुख होतें कीं मजला हें । दुःख असे अथवा पाहें । जानकी ।
कीं गाढ मोह हा आहे । अथवा कीं ये निद्रा हे । जानकी ॥

विषवेग शरीरीं वाहे। उन्माद चढुनि कीं राहे। जानकी ॥ चाल ॥ ह्मणुं यास। काय मी, खास। कळे न मनास। कथावें त्वां हें। कथावें त्वां हें। जिवलगास या लवलाहें। जानकी ॥सुख हो०॥१॥

सीता—आपली कृपा आणि प्रीति माझ्यावर पूर्ण आहे त्याचें हें लक्षण दुसरें काय ?

राम—अहाहा! काय मधुर भाषण हें!

पद—(सुधविसरगइ०)

सुविकास जीं म्लान मम जीव कुसुमास। सुखवोनि सकलेंद्रियां देति मोहास ॥ ध्रु० ॥ वचनें सुधा तींच कमलाक्षि! कर्णांस। गमतात हृदयासहि रसायनें खास ॥ १ ॥

सीता—बरें गडे गोड बोलणें करावयाचें! चला आतां पडूं द्या मला. (इकडे-तिकडे उशाला पाहूं लागते.)

राम—प्रिये! काय पाहतेस ? अग, आपल्या लग्नापासून घरांत, वनांत, बालपणीं तसेंच तरुणपणींही सदा सर्वकाळ हा रामाचा बाहूच तुझ्या उशाला ठरलेला नाहीं का ? मग चल ये, टेंक याच्यावर डोकें.

सीता—(तसें निजून) होय प्राणनाथ! असें खरेंच बरें.

राम—अरे, इतक्यांत पडल्याबरोबर हिला झोंप लागली! अहाहा! हिचें कितीतरी वर्णन करावें ?

पद-(अरसिक किती हा०)

शोभा ही जणुं सदना। तशि अमृतशलाका साक्षात् नयनां ॥ स्पर्श होय सुवदना। कशि चंदनाहुनी सुखकर ललना ॥ चाल ॥ शीतल मुक्तासर कोमल कर हिचा खरोखर कंठीं हा। सर्वहि आहे प्रिय, परि साहे विरहचि मम न मना ॥ १ ॥

(प्रतीहारी प्रवेश करून)

प्रतीहारी—महाराज! तो आला.

राम—अग, पण तो कोण ?

प्रतीहारी—महाराजांचा सेवक दुर्मुख.

राम—(स्वतःशीं) हां, गुप्तदूत दुर्मुख काय ? मी समजलों, तो प्रियेचा विरहच आला! असो, दुर्मुखानें काय लोकवार्ता आणिली आहे ऐकूं. (उघड) बरें, त्याला आंत येऊं दे.

(प्रतीहारी गेल्यावर दुर्मुख प्रवेश करितो.)

दुर्मुख—(स्वतःशीं) हे पहा प्रभु बसले आहेत, आणि त्या सीतादेवी त्यांच्या अंगावरच झोंपी गेल्या आहेत. अशावेळीं यांना मी ती वार्ता कळवून दुःख देऊं काय ? छेः! हें कांहीं चांगलें नाहीं. पण काय करूं ? यांनीं विचारल्यावर मला सांगावें लागणारच. एवढें एक बरें आहे कीं देवींना चांगली गाढ झोंप लागली आहे.

सीता—(झोपेंत) प्राणनाथ ! कुठें आहांत ?

राम—अरे, आपल्या विरहाच्या वेळचीं चित्रें पाहिल्यामुळें प्रियेला विरह झाला असें वाटून ही झोंपेंत बरळते आहे. (तिच्या अंगावरून हात फिरवून) अहाहा ! काय हिचें हें प्रेम !

दुर्मुख—(जवळ जाऊन) महाराजांचा विजय असो.

राम—काय वार्ता आहे ?

दुर्मुख—महाराज ! नगरांतील आबालवृद्ध सर्व लोक आपल्याला धन्यवाद देतात, आणि आपण दशरथमहाराजांचा अगदीं विसर पाडिला, असें ह्मणतात.

राम—अरे, हा शिष्टाचार नको. कांहीं दोष काढीत असले तर सांग, ह्मणजे ते दूर करायाला बरें.

दुर्मुख—(दुःखानें स्वतःशीं) हाय! शेवटीं हा प्रसंग आलाच! पण यांच्या कानांतच सांगावें. (उघड) ऐकावें महाराज! (कानाशीं लागून) हें–असें असें लोक ह्मणतात.

राम—हाय हाय! काय वज्रपात हा! (मूर्छा पावतो.)

दुर्मुख—महाराज ! सावध व्हा ! सावध व्हा ! अविचारी लोकांच्या बोलण्यावर जाऊं नका.

राम—(सावध होऊन दुःखानें) अरेरे! या जानकीला परगृहवासरूपी जें एक दूषण लागलें, त्याचें अद्भुत उपायांनीं निवारण केलें, तरी तें दुर्दैवानें पिसाळलेल्या कुत्र्याच्या विषाप्रमाणें सर्वत्र पुन्हा पसरतेंच आहे! छेः छेः! आतां मी मंदभागी काय करूं? याचा प्रतिकार कसा होईल? अथवा दुसरें काय? असेंच केलें पाहिजे.

पद—(पूर्वी-दादरा)

लोक रंजना । करणें । नानाविध यत्न, असे विहित हेंचि महाजनां ॥ ध्रु० ॥ सोडुनि मज तनयातें । अपुल्याही प्राणांतें । त्या वदान्य मत्तातें । आचरिलें तशा वर्तना ॥१॥

नुकतेंच वसिष्ठगुरूंनींही असेंच सांगून पाठविलें आहे. आणखी आमचा हा सूर्यवंश—मोठे सदाचारी व महा पराक्रमी अशा अनेक राजांनीं आपल्या प्रभावानें मोठ्या योग्यतेला पोंचविला आहे. अशा पवित्र वंशांत उत्पन्न होऊन माझ्यासंबंधानेंच त्याला असा वाईट अपवाद लागला, तर नीच अशा या माझ्या जन्माला धिःकार असो. हे देवि! जी तूं देवयज्ञांत उत्पन्न झालीस, आपल्या जन्मानें या वसुंधरेला अनुगृहीत व पवित्र केलेंस, निमिजनक वंशाला आनंदविलेंस, अग्नि, वसिष्ठ, अरुंधती अशांनीं प्रशंसा करण्याजोगें शील बाळगिलेंस, केवळ माझ्यावरच जीव धरून वनवासांत मला सुखाविलेंस, वडील माणसांना अत्यंत प्रिय होण्यासारखें आपलें वर्तन ठेविलेंस, आणि नेहमीं थोडें पण फार गोड असें भाषण केलेंस—त्या तुझा हा अशा प्रकारचा परिणाम व्हावा ना? हाय हाय!! सीते!

पद—(खचित गमे मज आज०)

तव योगानें पुण्यांना ये पुण्यपणा जगतीं ।
तुजविषयीं मग पापवाद हा लोक कसा वदती ॥ ध्रु० ॥
तुजपासोनी सनाथपण तें । प्राप्त होय ज्यांलागुनि जन तें । करावया तुज अनाथ आतां कारण कीं घडती ॥ १ ॥

दुर्मुखा! जा लक्ष्मणाला ह्मणावें, हा तुझा नवीन राजा—राम याची तुला अशी आज्ञा आहे कीं, (कानाशीं लागून) या याप्रमाणें लवकर कर.

दुर्मुख—महाराज! आपण हें भलतेंच काय करितां? जिला प्रत्यक्ष अग्नीनें शुद्ध केलें आहे आणि जिच्या गर्भांत रघुकुलाचें पवित्र संतान स्फुरण पावत आहे त्या ह्या देवींना दुर्जनांच्या अपवादावरून आणि हें असें—आपण करितां, हें कांहीं बरें नाहीं.

राम—शिवशिव! लोकांना दुर्जन असें कसें ह्मणतोस? अरे, हा इक्ष्वाकुवंश साऱ्या प्रजेला मोठा मान्य आणि प्रिय—सांप्रत दुर्दैवानें अपवादाला कारण झाला आहे खरा! विशुद्धीच्या वेळीं तिकडे दूर घडलेल्या अद्भुत गोष्टीवर कोण बरें विश्वास ठेवील? तर जा, लक्ष्मणाला त्याप्रमाणेंच सांग.

दुर्मुख—(स्वतःशीं) हाय हाय !! देवि जनकनंदिनि ! आतां आपली काय गति होईल ? मीं दुष्टानें हें काय केलें ? धिःकार ! धिःकार असो मला ! (निघून जातो.)

राम—(दुःखानें) अरेरे ! आज मीं कितीतरी दुष्कर्मा चांडाळ झालों पहा ! बालपणापासून मोठ्या प्रेमानें जिचें पालन पोषण केलें, स्नेह जडल्यापासून जिला दुजाभाव कधींच ठाऊक नाहीं, अशा या एकचित्त आणि प्रेमळ प्रियसखीला मी कपटानें–एखादा कसाई जसा पाळलेल्या बिचाऱ्या गरीब गाईचा स्वतःच गळा कापितो तसा–मृत्यूच्या हवालीं करितों आहें ! यापरता चांडाळपणा तो दुसरा कोणता आहे ? खरोखर मी मोठा अधम–महापातकी—आपल्या निंद्य व दूषित स्पर्शानें या विशुद्ध देवीला कां विटाळतों ? छेः ! हें कांहीं बरें नाहीं. (तिचें मस्तक हळूच खालीं ठेवून आपला बाहु काढून घेऊन) हे देवि मुग्धे ! हा मी अपूर्वकर्मचांडाळ–सोड मला ! तूं चंदन समजून एका भयंकर विषवृक्षाचाच फसून आश्रय केलास बरें ! (उठून) हाय हाय !! हा सर्व जीवलोक मला उलटा भासतो आहे ! जीविताचें प्रयोजनच संपलें ! हें जग जणों शून्य व जीर्ण अरण्य वाटूं लागलें ! संसार केवळ निःसार ! हें शरीर केवळ कष्टमय राहिलें आहे ! हर हर ! आतां मी हतभागी कुठें जाऊं ? काय करूं ? माझी गति पुढें काय ? अथवा खरोखर या रामाच्या शरीरांत चैतन्य आलें, तें केवळ दुःखाचाच अनुभव घेण्याकरितां–आणि तें, स्थिर व मर्मभेदक प्राणांनीं–जणों वज्राच्या कीलांनीं–अगदीं खिळून टाकिलें आहे ! नाहींसेंही होत नाहीं ! हे अंबे अरुंधति ! अहो भगवान् विश्वामित्रऋषी ! हे भगवंता अग्निनारायणा ! हे देवि भूतमात्रधारिणि वसुंधरे ! अहो जनक राजर्षे ! अहो बाबा ! हे मातांनो ! हे प्रियसख्या सुग्रीवा ! हे निष्ठावंत हनुमंता ! हे महोपकारि लंकाधिपते बिभीषणा ! हे सखि त्रिजटे ! या रामानें–नीचानें–तुह्मां सर्वांना ठकविलें–लुटलें ! सर्व प्रकारें तुमचा अगदीं अपमान केला ! पण त्यांना आतां हांक मारण्याची माझी प्राज्ञा किंवा योग्यता तरी काय ? त्या सर्व महात्म्यांचें मीं कृतघ्न दुरात्मा–पापी–चांडाळानें नांव घेतलें तरी सुद्धां त्यांना माझ्या पापाचा स्पर्श होईल ! जी विश्वासानें माझ्या अंगावर झोंपीं गेलेली–प्रियभार्या–प्रत्यक्ष गृहलक्ष्मी–कठोर गर्भसंतापानें स्फुरण पावत असल्यामुळें, जिचें सर्वांग कसें भारावलेलें, अशा या गरीब बिचारीला मी निर्दयपणानें श्वापदांना बलीसारखी अर्पण करितों आहेना ? हाय ! (मूर्छित होतो.)

[पडद्यांत—अब्रह्मण्य हो अब्रह्मण्य !]

राम—(सावध होऊन) अरे, कोण आहे तिकडे ? पहा पहा काय आहे तें.

[पुन्हां पडद्यांत]

ओंवी.

यमुनातटवासी ऋषिगण । करी जो उग्रतपाचरण ।
त्रास देई राक्षस लवण । ह्मणूनि शरण तुज रामा ॥ १ ॥

राम—(उठून) काय ! अजून राक्षसांचा त्रास आहेच आं ! या दुष्ट कुंभीनसी पुत्राच्या पारिपत्याला आतांच शत्रुघ्नाला पाठवून देतों. (कांहीं पावलें जाऊन पुन्हा मागें वळून) हे देवि सीते ! आतां तुझी काय दशा होईल ? भगवति वसुंधरे ! तूंच आतां या जानकीला सांभाळ !

पद—(मनिं खेद न करीं०)

तुज निरवियलें माते । या तव दुहिते । 'क्षमस्व,'
वदण्या लाज न मातें ॥ ध्रु० ॥ पुण्यवतीच्या रूपें
साचें । मंगल तें रघुजनककुलांचें । यज्ञामाजीं
त्या देवांचे । आणियलें कीं त्वां जन्मातें ॥ निर०॥

हा देवीच्या पादपंकजांचा या मस्तकाला शेवटचाच स्पर्श! (तसें करून तिच्याकडे पहात पहात निघून जातो.)

सीता—(झोंपेंत) प्राणनाथ! कुठें आहांत? (दचकून उठून) अगबाई! दुष्ट स्वप्नानें मला भ्रांतींत पाडिलें आणि उगीच मी आपली प्राणनाथांना हांक मारितें. (इकडेतिकडे पाहून) काय! खरेंच मला एकटीला सोडून जायचें झालें? हें असें कसें बरें! प्राणनाथ, कुठें हो आहांत? नाहीं! माझ्याशीं बोलायचें नाहीं! काय माझ्याकडून चुकलें? तसें असेल तर क्षमा करा. पण—पण काय? प्राणनाथ आहेत कुठें? गेलेच ते निघून! हाय हाय!! मला आपण कधींच टाकिलें नव्हतें, आणि आजच असें हें काय बरें? नुकतेंच गुरुजनांच्या वियोगानें मला अंमळ बरें वाटत नाहीं, असें आपण ऐकतांच राजकार्य तसेंच ठेवून माझें शांतवन करण्याकरितां इकडे आलां होतांना? मग मला एकटीलाच इथें सोडून कसे हो निघून गेलां? माझा वियोग आपल्याला सहन तरी कसा झाला? बरें, आतां पुन्हा आपण मला दिसलां कीं,—

पद—(दाखविं तव दिव्य०)

रुसुनि मी बसेन अशी नाथ आपणांवरी ।
नाहिं बोलणार मुळीं केलें कांहीं जरी ॥ ध्रु० ॥

पण बाई। मन हें वेडें जेव्हां। ऐकेलचि, तें तेव्हां।
झालें पाहिन केव्हां। श्याममूर्ति ती बरी ॥ १॥

कोण आहे ग तिकडे?

दुर्मुख—(प्रवेश करून) देवि! रथ तयार आहे; येऊन बसावें, अशी कुमार लक्ष्मणांची आपणाला विनंति आहे.

सीता—पण प्राणनाथ कुठें आहेत? तेही माझ्याबरोबर वनांत येणार होते.

दुर्मुख—(स्वतःशीं) ते आतां कसचे येतात! त्यांनीं आपल्याला मात्र वनवासी केलें बरें!

सीता—कां दुर्मुख! तुम्ही बोलत कां नाहीं?

दुर्मुख—नाहीं; म्हटलें, ते मागाहून येतील.

सीता—बरें तर चला, ही मी आलें. पण बाई माझ्यानें लवकर लवकर नाहीं चालवत. माझें पोट चळवळतें.

दुर्मुख—हळू हळू बेतानें चालावें.

सीता—(जातां जातां)—

पद—(कपटि मोठी पुरुषांची०)

मनोभावें करितें मी नमस्कारातें ॥ ध्रु० ॥
रघुकुलिंच्या देवतांनो। आज तुह्मांतें ॥ १॥
प्रिय पतिच्या पदाब्जांनो। आज तुह्मांतें ॥ २॥
शुभदात्या गुरुजनांनो। आज तुह्मांतें ॥ ३॥

(निघून जातात.)

[अंक १ ला समाप्त.]

अंक दुसरा.

प्रवेश १ ला.

(वासंती आणि आत्रेयी.)

वासंती—(भीतीनें) आत्रेयि ! काय ह्मटलेंस, सीता नामशेष झाली ? तिच्या जिवाला कांहीं भलतेंसलतें झालें कीं काय ?

आत्रेयी—होय बाई, आणि तें देखील नुसतेंच नव्हे, तर अपवाद लागून. (कानाशीं लागून) आणि याकरितां रामचंद्रानें लक्ष्मणाकडून तिला वनांत सोडून दिली !

वासंती—(दुःखानें) हाय हाय ! तिजवर दुर्दैवाचा केवढा घाला हा ! महाभागे जानकि ! तुझा असा शेवट व्हावा ना ? रामभद्रा ! तूं असें करावेंस काय ? पण तुला तरी काय बोलावें ? तिचेंच दैव फिरलें ! बाई आत्रेयी ! सीतेला अरण्यांत सोडून दिल्यावर तिचें पुढें काय झालें कांहीं कळलें आहे का ?

आत्रेयी—नाहीं, कांहीं नाहीं.

वासंती—हाय हाय ! वसिष्ठ, अरुंधती आणि रामाच्या सर्व वृद्ध माता जिवंत असतांना रघुकुलांत असें झालें तरी कसें ?

आत्रेयी—वासंति ! मी असें ऐकतें कीं, त्यावेळीं सर्व वडील माणसें ऋष्यशृंगाच्या आश्रमांत द्वादश वार्षिक सत्राकरितां गेलीं होतीं. नुकतेंच तें सत्र संपून ऋष्यशृंगानें यथोचित पूजासत्कार करून सर्व गुरुजनांला निरोप दिला; तेव्हां वधूविरहित अयोध्येंत मी जाणार नाहीं असें अरुंधती ह्मणाली, आणि रामाच्या मातांनींही त्याला पूर्ण अनुमोदन दिलें. त्याप्रमाणेंच भगवान् वसिष्ठांनींही आपण वाल्मीकीच्या तपोवनांत जाऊन राहणार असें स्पष्ट सांगितलें. आणि रामचंद्रानें अयोध्येंत अश्वमेध सुरू केला असतांही तिकडे न जातां सर्व वाल्मीकीच्या तपोवनाकडेच निघालीं आहेत.

वासंती—काय ! रामानें पुन्हा लग्न सुद्धां केलें मा ?

आत्रेयी—छेः छेः ! असें कसें होईल ?

वासंती—तर मग त्या यज्ञांत धर्मपत्नी कोण ?

आत्रेयी—सीतेची सुवर्णमयी प्रतिमा केली आहे ती.

वासंती—काय बाई विलक्षण तरि हें!

पद—(मम जिवाची प्रिय०)

कधिं कुणी का गणुं शकती ॥
लोकोत्तर जे पुरुष तयांचीं।
विचित्र ऐशीं चरितें जगतीं ॥ कुणी० ॥ ध्रु० ॥
वज्राहुनिही प्रखर पहातां।
कुसुमाहुनि जीं कोमल दिसती ॥ कुणी० ॥ १ ॥

आत्रेयी—त्या यज्ञांत वामदेवानें अभिमंत्रित असा अश्व सोडिला असून त्याच्या रक्षणाकरितां शास्त्रोक्त रक्षक नेमिले आहेत, आणि त्यांच्यावर मुख्य अधिपति लक्ष्मणाचा पुत्र चंद्रकेतु याची योजना केली आहे; कारण त्याला दिव्य जृंभकास्त्रें प्राप्त झालीं आहेत. तो चतुरंग सेनेसह अश्वरक्षणाकरितां निघाला देखील आहे.

वासंती— (गहिंवरून कौतुकानें) काय! त्या कुमार लक्ष्मणाला पुत्र झाला आहे ? बरें बाई, एवढा तरी माझ्या जिवाला आधार आहे.

आत्रेयी—इतक्यांत एक ब्राह्मण आपल्या पुत्राचें प्रेत राजद्वारीं आणून मोठ्यानें आक्रोश व शोक करित 'अब्रह्मण्यं' 'अब्रह्मण्यं' असें ओरडूं लागला. तेव्हां रामचंद्र करुणायुक्त होऊन, राजाच्या अपराधावांचून प्रजेला अकालमृत्यु येत नाहीं, असा विचार करूं लागला. तोंच—

दिंडी—(दादरा.)

शूद्र कोणी शंबूक नाम ज्याचें।
महीवरि जो करि आचरण तपाचें ॥
वध्य रामा तुज तरी त्यास मारीं।
त्वरित मृत या द्विजकुमारास तारीं ॥ १ ॥

अशी आकाशवाणी झाली. ती ऐकून रामचंद्र हातांत खड्ग घेऊन पुष्पक विमानांत बसून त्या शूद्र तपस्व्याच्या शोधाकरितां निघाला आहे.

वासंती—बरें झालें शंबूक नामा शूद्र याच जनस्थानांत धूम्रपान करित तप करितो आहे. त्याच्या निमित्तानें तरी पुन्हा रामभद्राचें या वनांत आगमन होईल.

आत्रेयी—बरें तर वासंति! येतें मी आतां. लोभ असूं दे. पण अगस्ति ऋषींच्या आश्रमाला याच मार्गानें जाऊं ना?

वासंती—होय, अशीच पंचवटीवरून या गोदावरीच्या तीरातीरानें जा, ह्मणजे थेट त्यांच्या आश्रमाला जाऊन पोहोंचशील.

आत्रेयी—ठीक आहे, येतें तर. (निघून जाते.)

वासंती—(स्वत:शीं) वाल्मीकिऋषींनीं प्रतिपालन केलेल्या त्या तीव्रबुद्धीच्या व विलक्षण धारणाशक्तीच्या कुशलव मुलांपुढें आपला मुळींच टिकाव लागत नाहीं, आणि स्वत: वाल्मीकीऋषी ब्रह्मदेवाच्या आज्ञेवरून रामायणकाव्य रचण्याच्या कामांत गुंतले आहेत, त्यामुळें त्यांना शिकवायालाही फावत नाहीं, अशी अडचण आल्याकारणानें ही आत्रेयी अगस्तिप्रमुख महर्षींजवळ वेदांताचें अध्ययन करण्याच्या हेतूनें इकडे आली, ह्मणून मला रामभद्र व सीतादेवी यांची ही हकीकत तिच्या मुखानें कळली. नाहींतर आज बारा वर्षें होऊन गेलीं त्यांचें कांहींच वर्तमान समजलें नव्हतें. मला तें या वनांत कोण सांगणार? पण एकंदरींत सीतेचें फारच वाईट झालें! आतां ती पुन्हा मला कोठून दिसणार आहे? अहाहा! काय तिचें तें माझ्यावर प्रेम! रामभद्रानें शेवटीं अगदींच अविचार केला! तो शंबूकाला शोधीत इकडे आला कीं, मी त्याची चांगलीच कानउघाडणी करितें. अगबाई! पण मी इथें कितीवेळ तरी बोलत उभी राहिलें! दिवस बराच प्रखर झाला आहे. हें पहा,—

पद—(प्रात:कालीं शिर०)

जलावरी जीं गळति फुलें गजगंडघर्षणानें ।
त्यांहीं करिती गोदार्चन हे वृक्ष आदरानें ॥ ध्रु० ॥
बसुनि वेंचिती स्कंधि कीटकां खग चंचुपुटानें ।
कपोत कुक्कुटही आरवती बहु आनंदानें ॥ १ ॥

तर आतां या गोदावरीच्या डोहांत स्नान करून आपल्या विश्रांतीच्या ठिकाणीं निघून जावें. (निघून जाते.)

अंक] प्रवेश २ रा [दुसरा.

(राम प्रवेश करितो.)

राम--हाच तो शंबूक (सदय होऊन)

पद—(बागेसरी—धमार.)

जीववाया द्विजसुता त्या सव्य हस्ता आज झडकरि।
होउनी निःशंक चालविं खड्ग तूं या शूद्र मुनिवरि॥ ध्रु० ॥
गर्भखिन्ना जानकीतें घोरवनिं सोडूनि द्याया।
राम हा पटु जो तयाचें गात्र तूं। कृति ही कराया।
केविं येईल तुज दया तरि ॥ जीववाया० ॥ १ ॥

(खड्गाचा प्रहार करून) वा: रामाला योग्य असेंच तूं कर्म केलेंस! पण तो ब्राह्मणाचा पुत्र तरी जिवंत होईल का?

शंबूक—(दिव्य रूपानें प्रवेश करून) रामदेवाचा विजय असो.

पद—(शिणलासि माझ्या०)

हा शंबूक पहा नत झाला। नत झाला या चरणांला॥ ध्रु० ॥
देउनि अभया जीवविलें त्या। विप्राच्या कुमराला ॥ १ ॥
दंडुनि मजला लाभविलें या। दिव्य अशा देहाला ॥ २ ॥
प्रभुच्या करिंचें मरणहि होई। कारण तारायाला ॥ ३ ॥

राम—द्विजकुमार उठणें आणि तुझा उद्धार होणें या दोन्ही गोष्टी मला प्रियच आहेत. जा, आतां वैराजलोकीं आनंदानें आपल्या उग्र तपाच्या फलाचा उपभोग घे.

शंबूक—महाराज! हा सर्व आपल्या चरणांचाच प्रभाव! माझें तप कसलें? अथवा या तपानेंच मोठा उपकार केला; कारण—

पद—(हा उत्सुक तव०)

त्रिभुवनांत जन धुंडिती शरण्या ज्याला।
तो लोकनाथ सोडुनी निजस्थानाला।
मज शोधित शत योजनें चालुनी आला॥ चाल॥
तपफल हें न तरि पुन्हा कसे। शिवाति पद असे।
दंडक विपिनाला॥ त्रिभुवनांत० ॥ १ ॥

राम—(आश्चर्यानें) काय हें दंडकारण्य?

शंबूक—होय, तेंच हें. यांतच रहात असतांना पूर्वीं आपण खरदूषण-त्रिशिरादि दुष्ट व भयंकर असे चौदा हजार राक्षस मारिले, आणि त्यामुळें या सिद्धक्षेत्र अशा जनस्थानांत माझ्यासारख्या भित्र्याला देखील निर्भयपणानें राहतां येऊं लागलें.

राम—काय! नुसतें दंडकारण्यच नव्हे, तर हें जनस्थानही आहे? (चोंहोंकडे पाहून) हो खरेंच–हेंच जनस्थान! हें स्थान पाहून पूर्वींच्या सर्व गोष्टी मला आठवूं लागल्या, आणि या वेळीं मी त्यांचा मानसिक अनुभवही घेतों आहें! जानकीला बागबगीच्यांची विशेष आवड, ह्मणून या ठिकाणीं तिचें मन किती तरी रमलें होतें! तींच हीं वनें आतां कशीं भयाण दिसताहेत! (डोळ्यांत पाणी आणून)

पद—(जयजय जगज्जननि०)

'अपुल्यासह या वनांत। राहिन मी प्राणनाथ।
मधुरगंधयुक्त वात। ज्यांत वाहतो' ॥ ध्रु० ॥
वदत असें दिवसरात। वागली सखी सुखांत।
स्नेह तिच्या अंतरांत। दृढ तसाच तो ॥ १ ॥

साहजिक स्वस्थपणा व शांतपणा यांपासून होणाऱ्या सुखाच्या योगानें ती दुःखावर पांघरूण घालीत असे. असो, शंबूका! जा. तुझा मार्ग तुला सुखप्रद होवो.

शंबूक—ठीक आहे. जवळच प्राचीन ब्रह्मवादी अगस्तिऋषि राहतात, त्यांचें दर्शन घेऊन मग आपल्या शाश्वत पदाला जाईन. (जातो.)

राम—अहाहा! तेंच हें वन मी पुन्हा पाहतों आहें; पण यांत आतां किती तरी विलक्षण फेरफार झालेला दिसतो! पूर्वीं ज्या ठिकाणीं पाण्याचे प्रवाह होते, तेथें आतां नुसतीं वाळवंटें दिसतात. पूर्वींचे घनदाट वृक्ष विरल होऊन हे दुसरे नवेच वृक्ष उत्पन्न झाले आहेत. पर्वत मात्र जागच्याजागीं कायम आहेत, यामुळेंच काय तें हें पूर्वींचेंच वन अशी खात्री होते. होय; हीच ती पंचवटी! ही गोदावरी नदी! हा प्रस्रवण पर्वत! याच प्रचंड पर्वतशिखरावर गृध्रराज जटायु राहत असत! आणि त्याच्याच खालच्या बाजूस आमची पर्णकुटिका होती! जवळच माझ्या प्रियेची सखी जीवनदेवता वासंती, तिचेंही राहण्याचें ठिकाण आहे! या पंचवटींत पूर्वीं आह्मी पुष्कळ दिवस स्वधर्मानुरूप व गृहस्थावस्थेला योग्य असें वर्तन करीत संसारसुखाचा अनुभव घेत आनंदांत राहिलों होतों. पण आज हा मी अभागी प्रियाघातक राम तिला एकटाच जाऊन कसा पाहूं? अथवा न पाहतां तरी कसा निघून जाऊं? माझ्यानें मुळींच पहावणार नाहीं, ह्मणून येथून निघुन जावें असें मनांत येत असूनही, या पंचवटीविषयींचा

पूर्वपरिचयमूलक स्नेह मला जणों जोरानें आकर्षण करितो आहे ? हाय हाय ! काय हा मजवर विलक्षण प्रसंग आला आहे !

पद—(बाथांनो द्या सोडोनी०)

गेला जो विषरस पोटीं, तुंबोनि राहिल्यानें तो।
वेगानें सकल शरीरीं, पसरोनि अनुभवा येतो ॥
अथवा शल्यांश जडे जो, दृढ मर्मस्थानातें तो।
लागतां तयाला कांहीं, वेदना सलोनी देतो ॥ चाल ॥
कीं सांध्यावरि जो झाला। निपजली गांठही ज्याला।
व्रण फुटतां तो त्या काला। देहभान हरुनी घेतो ॥
हा तीव्र शोक नव तैसा। मम मोह विकोपा नेतो ॥ १ ॥

(शंबूक पुन्हा प्रवेश करितो.)

शंबूक—(वंदन करून) रामदेवाचा विजय असो. भगवान् अगस्तिमुनींला आपण इकडे आल्याचें वर्तमान मीं सहज कळविलें, त्यावरून त्यांनीं मला मुद्दाम आपल्याकडे पाठविलें आहे. त्यांनीं सांगितलें आहे कीं, येथवर येऊन आह्मांला एकवेळ भेटून जावें. आपण विमानांतून उतरतांच आपल्याला मंगलार्ती करण्याची सर्व सिद्धता करून वत्सला लोपामुद्रा आपली वाट पहात आहे. आश्रमवासी इतर ऋषिमंडळीही आपल्याकरितां फार उत्सुक झाली आहे. आपला खोळंबा न करितां लवकरच निरोप देऊं; आणि आपलें पुष्पक विमानही इच्छावेगी आहे. तेव्हां येथून अयोध्येला तत्काळ पोहोंचून अश्वमेधाला सहज सिद्ध होतां येईल, असेंही ते ह्मणाले.

राम—बरें आहे. भगवान् अगस्तिमुनींची आज्ञा, तेव्हां ती मला मान्य केलीच पाहिजे. हे भगवति पंचवटि !

साकी—(धुमाळी.)

गुर्वाज्ञेस्तव जरी चाललों उल्लंघुनि तुजला मी।
जाणुनियां तरि अशा प्रसंगीं कोपुं नको या रामीं ॥
येतों लवलाहीं। नाहीं स्थैर्य मना कांहीं ॥ १ ॥

(विमानांत बसून निघून जातो.)

अंक] प्रवेश तिसरा. [दुसरा.

(तमसा आणि मुरला)

तमसा— कायग मुरले ! अशी गडबडीनें कुणीकडे चाललीस ?

मुरला—बाई तमसे ! मी भगवति लोपामुद्रेचा निरोप घेऊन गोदावरीकडे निघालें आहें.

तमसा—तो कोणता बाई, इतका गडबडीचा निरोप ?

मुरला—हें पहा, जानकीचा त्याग केल्यादिवसापासून, स्वभाव गंभीर असल्यामुळें, आपल्याला होत असलेली व्यथा रामचंद्र बाहेर दाखवीत नाहीं. तरी प्रियेचा तसा कष्टकारक परिणाम झाल्यानें त्याचा शोक व संताप सारखा वाढत जाऊन सांप्रत तो फारच क्षीण झाला आहे. त्याच्याकडे पहावतसुद्धां नाहीं. आतां तो येथून परत जातांना या पंचवटींतून जाईल, तेव्हां पूर्वीं सीतेसह ज्या ज्या ठिकाणीं राहिला होता तीं तीं स्थळें पाहतांच शोकक्षोभानें त्याचा धीर सुटून न जाणों कांहीं तरी प्रमाद घडण्याचा संभव आहे, ह्मणून तो या वनांत असे तोंपर्यंत बाई गोदावरि ! तूं त्याच्यावर चांगली दृष्टि ठेव आणि--

अंजनीगीत--(धुमाळी.)

जेव्हां जेव्हां मोह तयातें । होईल, त्याच्या रक्षिं जिवातें ।
शीत गंधयुत वीचीवातें । सावध तूं करुनी ॥ १ ॥

असा निरोप सांगायला तिच्याकडे मला पाठविली आहे.

तमसा—त्यांनीं अशी काळजी घेणें हें त्यांच्या स्नेहाला फारच शोभतें. पण तशा स्थितींत रामचंद्राला सावध करण्याचा उपाय आज अगदीं जवळच आहे.

मुरला—ह्मणजे ! मला कांहीं समजलें नाहीं.

तमसा—सांगतें ऐक. वाल्मीकीच्या तपोवनाच्या आसपास लक्ष्मण जानकीला सोडून गेल्यावर तिला असह्य प्रसववेदना होऊं लागल्या, तेव्हां तिनें भागीरथींत उडी टाकिली. तिथें तिला दोन पुत्र झाले. त्यांच्यासह भागीरथी आणि भूदेवी यांनीं तिला पाताळांत नेऊन ठेविली. पुढें त्या मुलांचें स्तनपान सुटल्यावर त्यांना स्वतः भागीरथीनें महर्षि वाल्मीकीच्या स्वाधीन केलें.

मुरला—असे साहाय्यकारी मिळाल्यावर वाईट कर्मांचा सुद्धां परिणाम अद्भुत होतो तो असा.

तमसा—शंबूकाच्या निमित्तानें रामचंद्र जनस्थानांत गेल्याचें वर्तमान सरयूकडून भागीरथीनें ऐकिलें; तेव्हां तिलाही लोपामुद्रेसारखीच शंका वाटून ती कांहीं कारण काढून जानकीसह गोदावरीला भेटायला आली आहे.

मुरला—हें तिनें खरेंच फार चांगलें केलें. पण आतां सीतेच्या हातून रामचंद्राचें समाधान कसें होणार ?

तमसा—आज त्या कुमार कुशलवांचा बारावा वाढदिवस आहे, ह्मणून रघुकुलपति जो तेजोनिधि सूर्यनारायण त्याच्या पूजेसाठीं स्वतः फुलें आणायला तिनें सीतेला धाडली आहे. आणि तिच्याबरोबर तूं तिची प्रेमाची सखी ह्मणून रहा, अशी मलाही आज्ञा केली आहे. आह्मी दोघी तिच्या प्रभावानें अदृश्य रहाणार आहों. आतां ही मी तिकडेच निघालें आहें.

मुरला—हें फार बरें झालें बाई. आतां काळजी करण्याचें कांहींच कारण नाहीं. तर मागें परत जाऊन हें सर्व मी भगवति लोपामुद्रेला सांगतें.

तमसा—ठीक आहे. पण ती पहा, गोदावरीच्या डोहांतून निघून जानकी इकडेच येते आहे.

पद—(पिलु–धुमाळी.)

व्यथा विरहाची । मूर्ति जणों करुणरसाची ॥ ध्रु० ॥
गेले गाल सुकोनी भारी । गात्रें क्षीण जहालीं सारीं ।
वेणी नच घाली सुकुमारी । मनोज्ञा साची ।
जरिही निस्तेज मुखाची ॥ व्यथाविरहाची ॥ १ ॥

मुरला—खरेंच—

पद—(हिमनग जो०)

कोमल किसलय गळुनि पडावें जसें बंधना पासोनी ।
तैशी दिसते दारुण शोकें घेतां हृदया शोषोनी ॥ ध्रु० ॥
शरत्कालरवितापें जातें केतकिचें दल वाळोनी ।
केली विरहें तशी दशा परिपांडु शरीरा गाळोनी ॥ १ ॥

(निघून जातात.)

अंक] प्रवेश ४ था. [दुसरा.

(सीता फुलें वेंचित असलेली दिसते.)

सीता—(स्वतःशीं) खरोखरीच,—

पद—(हिंगणदिपची०)

प्राणपतीच्या सहवासीं मी असतांना या वनीं। सुख
बहु झालें मजला मनीं ॥ दीर्घ परी तो काळ लोटिला
उटजामधिं राहुनी। मेघश्याम मूर्ति पाहुनी ॥ चाल ॥
क्षणभरी न दूरी झालें। प्रेमामृत पूरीं न्हालें। वन
गृहचि अनुभवा आलें ॥ चाल ॥ क्षुधा तृषा मुळिं
बाधली न कीं उष्णता कुण्या दिनीं। स्थिति ती किति-
तरि आल्हादिनी ॥ प्रा० ॥ १ ॥

पण दुर्दैवानें असा प्रसंग आल्यामुळें तेंच हें वन आज मला किती उदास भासतें आहे! जें जें ठिकाण पहावें तें तें प्राणनाथांवांचून कसें अगदीं शून्य दिसतें! अहाहा! काय ती मूर्ति! काय तें प्रेम! आणि काय तें भाषण! प्रत्यक्ष जशीं माझ्यापुढें आतां आहेत! (तमसा प्रवेश करिते.)

(पडद्यांत)—'हे विमानराजपुष्पका! थांब इथेंच थांब.'

सीता—अगबाई! हा सजल मेघगर्जनेप्रमाणें गंभीर असा शब्द एकाएकीं कुठून बरें झाला?

तमसा—सखे! मेघाच्या ध्वनीनें जशी मयूरी, तशी या अस्पष्ट शब्दानें सुद्धां तूं अशी कावरीबावरी झालीस ना?

सीता—अग, अस्पष्ट कां? मीं खचित ओळखला. प्राणनाथांचाच शब्द हा!

तमसा—ऐकतें आहें खरें, कीं— एका शूद्र तपस्व्याला शासन करण्याकरितां कोणी ऐक्ष्वाकुराजा या जनस्थानांत आला आहे.

सीता—तर मग सुदैवच हें कीं, त्यांनीं अजून राजधर्माचा त्याग केला नाहीं. (विमानांतून उतरतांना रामाकडे पाहून) बाई तमसे! प्राणनाथच हे!

पद—(जशी चक्रवाकाविणें०)

प्रभातीं शशीच्या जशी मंडलातें।
तशी क्षीणता म्लानता या प्रियातें ॥ ध्रु० ॥
दशा ही अशी भ्रांति पाडी मनातें।
परी ये गभीराननें जाणण्यातें ॥ १ ॥

माझ्यानें यांच्याकडे पाहवेना, मला मूर्च्छा येते, तर आतां सांवरून धर गडे! (असें म्हणून तिच्या अंगावर मूर्छित होते.)

तमसा—सखे! सावध हो, सावध हो. असा धीर सोडूं नकोस.

(राम प्रवेश करितो.)

राम—या पंचवटीच्या दर्शनानें—

पद—(अबला स्त्री ही०)

आजवरी जो लीन जहाला या हृदयामाजी ।
दुःखानल तो घेई वेगें पेट पहा आजी ॥ ध्रु० ॥
लोट धुराचा हा जणुं त्याचा मोह नव्हे वाटे ।
व्यापुनि आतां सकल शरीरीं खास मला भाजी ॥ १ ॥

तमसा—(मनांत) लोपामुद्रा आणि भागीरथी यांनादेखील शंका आली ती तरी याच विषयींची.

सीता—बाई तमसे ! आतां कसें करावें बरें ? चल गडे ! अंमळ एकीकडे जाऊं. मला कदाचित् पाहिलें तर आज्ञेवांचून जवळ आल्याबद्दल अधिकच रागावणें होईल.

तमसा—अग, अशी भितेस कां ? भागीरथीच्या प्रभावानें आपण वनदेवतांना देखील दिसत नाहीं, कीं आपलें भाषणही कुणाला ऐकूं येत नाहीं.

सीता—होय गडे ! मला त्याचें मुळीं स्मरणच नव्हतें.

राम--(दुःखानें) हाय हाय ! हे देवि !

पद–(अस्तमान झाला.)

जनक राजतनये । सीते प्राणेश्वरी सखये ॥ ध्रु० ॥
कवण्या ठायीं तुजला पाहूं । एकाकी मी कैसा राहूं ।
दुःखाचा किती तापहि साहूं । भेट तरी चल ये ।
सहचरि वनिं या मज सदये । जनक० ॥ १ ॥

सीता--प्राणनाथ ! वस्तुस्थिति पाहतां हें भाषण आणि ती कृति जुळते का ? (डोळ्यांत पाणी आणून) अथवा कसली मी कठोर मनाची !

पद--(भूपती खरे ते०)

जें अनेक जन्मीं दर्शन दुर्लभ यांचें ।
तें अभागिनीला आज जहालें साचें ॥
जें दुर्मिळ होतें मला कितिक दिवसांचें ।
तें भाषण पडलें श्रवणीं या प्रेमाचें ॥ चाल ॥
त्यांवरी कठिण मी व्हावें ॥ अंतरीं ॥
टोंचुनी सरोष वदावें ॥ यापरी ॥
ही कृती मला स्त्रीभावें ॥ ना बरी ॥

जें दैवीं लिहिलें अनुभवितें फल त्याचें।
प्रियकराकडे मग दूषण यांत कशाचें ॥ १ ॥

राम--हाय हाय! काय असा मी भ्रमांत पडलों! प्राणेश्वरी इथें कुठून येणार?

सीता--बाई तमसे! प्राणनाथांनीं माझा तसा त्याग केला, तरी हें रूप आणि ही अवस्था पाहून माझ्या मनाची कांहीं विलक्षण स्थिति झाली आहे.

तमसा—खरेंच तुला असें कां होतें तें मी समजलें.

पद—(जरि गंध गजाचा०)

विप्रियें निराशायोगें मन खिन्न उदास जहालें।
जड तसें वियोगीं होतां ही सहज भेट बहु कालें।
स्वाभाविक तव सौजन्यें सुप्रसन्नतेसहि आलें॥
परिसुनि पतिशोकरवातें। पावुनी अमित करुणा तें।
प्रेमानें द्रवलें जातें ॥ चाल ॥ अशि अवर्णनीय तयाची
स्थिति असे जनकनृपबाळे ॥ विप्रि० ॥ १ ॥

राम—मला निरंतर प्रियेचा ध्यास लागून मन तल्लीन झाल्यानें असें होतें आहे; दुसरें काय?

(पडद्यांत.)

वासंती—अगबाई! काय हें? पहा पहा!

पद—(या कोणि वाली०)

अपुल्या करीं त्या सीतेनें खुडिल्या सुपल्लवांनीं।
जो पोशियला करि कलभप्रेमें पूर्वीं या रानीं ॥ ध्रु० ॥
डोहांत तो हा मदें क्रीडतां निज युवतीसंगें।
द्विरदें अन्यें या गांठियलें कुणि धांवा तत्राणीं ॥ १ ॥

सीता—(घाबरून) अगबाई? आतां कोण बरें त्याला सोडवील? प्राणनाथ! धांवा धांवा लवकर.

राम--कुठें आहे, कुठें आहे तो दुरात्मा!

वासंती--(गडबडीनें प्रवेश करून) कोण, देव रघुनंदन कांय? आपला विजय असो.

सीता—अगबाई! ही माझी प्रियसखी वासंती!

वासंती--रामदेवा! धांवा धांवा आणि त्या-पण बाई हा विजयी झालाच! तो पहा.

राम—पुत्रका गजराजा! असाच सदा विजयी हो.

सीता—माझ्या बाळाला उदंड आयुष्य असो; आणि त्याला स्त्रीविरह तर कधींच न होवो ?

राम-वासंति! पाहिलेंस, हा बेटा आपल्या प्रियेला कसें खुलवावें हें शिकला आहे!

पद--(परदेशी सैंया०)

निजकांता श्रांता जाणुनियां ती हा करी ॥ ध्रु० ॥
शुंडेनें जल घेउनि कैसा सिंचन देहीं तिच्या करी ।
कमलपत्र नव सुछत्रापरी । शिरावरी तें पहा धरी ।
स्वप्रेमभरीं । श्रमखेद हरी । कीं खरोखरी ॥ १ ॥
लीलेकरुनी ह्मणाल खंडें । तोडुनि चघळुनि तीं तुंडें ।
भक्षाया दे कवळ करोनी । तसें तिला जल ।
पाजि सुनिर्मल । रमवि सहचरी। अशी अंतरीं। परोपरी० ॥२॥

सीता—बाई तमसे! हा एवढा थोरला झाला आहे, तर ते माझे कुशलव इतक्या दिवसांत कसे ग झाले असतील ?

तमसा—जसा हा तसेच ते बरें.

सीता—सखे! मी मेली कितीतरी दुर्भाग्याची! केवळ पतिविरहाचेंच नव्हे, तर पुत्रविरहाचेंही दुःख भोगतें आहें.

तमसा—अग, ही दैवगति! दुसरें काय ?

सीता—काय तरी बाई विलक्षण दैवगति ही!

पद—(दादरा.)

मी व्यर्थ या जगीं ते प्रसवूनि तनय पाहीं ॥ ध्रु० ॥
धवलदंत, मृदुकपोल, मधुरहास्य कुरलकेश ऐशांहीं ॥
शोभतिं मुखें त्यांचीं नाथें तीं चुंबिलीं न कांहीं ॥ मी० ॥ १ ॥

तमसा—देवतांच्या प्रसादानें हेंदेखील होईल बरें.

सीता—बाई तमसे! त्या पुत्रांच्या स्मरणानें मला पान्हा फुटला, आणि प्राणनाथही जवळच आहेत, ह्मणून यावेळीं मी क्षणभर पुन्हा संसारिणी झालें आहें.

तमसा—होय, तूं तशीच आहेस.

वासंती—रामदेवा ! पुरे आतां तें गजराजाकडे पाहणें. पूर्वीच्या आपल्या शिलातलावर येऊन बसावें. यावरच सीताही आपल्या कोमल हस्तांनीं मृगांना चारा घालीत, आणि या कदंबवृक्षावर नाचणाऱ्या मयूराकडे कौतुकानें पहात बसत असे.

राम—हाय हाय ! हें स्थळ माझ्यानें नाहीं पहावत !

साकी—(धुमाळी)

पूर्वीं जेथें सीतेसह म्यां नित्य सुखांत असावें।
तेथें कैसें एकाकी या स्थितींत आज बसावें ॥ १ ॥

(दुसरीकडे जातो.)

सीता—(मनांत) गडे वासंति ! हें तूं काय बरें केलेंस ? प्राणनाथांना आणि मला हें स्थळ दाखवून अधिकच दुःखांत मात्र घातलेंस ! हाय हाय ! तेच हे प्राणनाथ; तीच ही पंचवटी; तीच ही वासंती; तेंच हें शिलातल; तेच हे पशु-पक्षी वृक्ष; आणि तीच ही मी ! पण मला मंदभागिनीला हें सर्व कांहीं प्रत्यक्ष दिसत असूनही व्यर्थ आहे ! अर्थात् भवचक्राची उलटी गति ती हीच होय.

राम—सखे वासंति ! अशी इकडे माझ्याजवळ येऊन बैस.

(दोघें खालीं बसतात.)

वासंती—(गर्हिवरून) कां महाराज ! कुमार लक्ष्मण खुशाल आहेना ?

राम—(मनांत) हिनें मला 'महाराज' असें उपरोधानें ह्मटलें, आणि गर्हिवरून लक्ष्मणाविषयींच कुशल प्रश्न केला, यावरून सीतेचा वृत्तांत हिला कळला आहे वाटतें ? (उघड) हो कुमार लक्ष्मण खुशाल आहे बरें.

वासंती—देवा ! आपण एकदम इतके कठोर कसे हो झालां ?

सीता—गडे वासंति ! हें तूं काय बरें बोलणें काढलेंस ? माझे प्राणनाथ तसे नाहींत बरें ! ते सर्वांना प्रिय आहेत. त्यांतून तुला तर विशेषच असले पाहिजेत.

वासंती—हाय हाय ! रामदेवा !

पद—(जो मम नयन चकोरां०)

'तूं प्रतिजीव हृदय मम अससी। नयनां प्रभा
शशीची दिससी। कीं जणुं होसि सुधेचा रसशी।

या देहातें' ॥ १ ॥ वदुनी ऐशा मधुवचनां जी
गुंतविली दृढ मोहामाजी । तिजसिच—
अथवा बोलूं आजी । काय तुह्मांतें ॥२॥ (मूर्छित होते.)

तमसा--हिला पुढें बोलवेनासें होऊन मूर्छा आली हें स्नेहातिशयास योग्यच आहे.

राम--वासंति ! सावध हो, सावध हो.

वासंती--(सावध होऊन) पण आपल्या हातून अशी गोष्ट घडण्याचें कारण तरी काय ?

सीता--गडे वासंति ! पुरे कर मेलें आतां.

राम—लोकांना आवडलें नाहीं ह्मणून.

वासंती—आवडलें नाहीं ! तें कां ?

राम--तें त्यांचें त्यांनाच ठाऊक.

तमसा--अशा लोकांचा तिरस्कारच केलेला बरा.

वासंती—लोकांची समजूत कशीही असली ह्मणून आपण असें करावें काय ? ह्यांत काय बरें मिळविलेंत ?

पद--(आवडली हरिला०)

कठिण हृदय नृपराय । गमली कीर्ती बरी ॥
याहुनि जगीं दुजि काय । अपकीर्ती ती परी ॥ ध्रु० ॥
असेल झाली कोण गति वदा हरिणाक्षींची हाय ।
घन विपिना भीतरीं । कठिण हृदय नृपराय ॥ १ ॥

सीता—वासंति ! तूंच कठीण हृदयाची आहेस; नाहीं तर असा दुःखावर डाग कशाला दिला असतास ?

तमसा--अग, तिचा स्नेह आणि शोक हेच असे वदवीत आहेत बरें !

राम—सखे ! तिची अवस्था वनांत काय व्हायची आहे ? हिंसक प्राणीमात्रांनीं तिचें शरीर फाडून खाल्लें असावें, दुसरें काय ?

सीता--नाहीं नाहीं. प्राणनाथ ! ही मी जिवंत आहें बरें.

राम—हाय हाय ! ! प्रिये जानकि ! कुठें ग आहेस ?

पद--(मजला वरिल०)

नाहीं उरली कांहीं आस । प्राप्तीची तव ती ॥ ध्रु० ॥
होती हृदयावरि जे घाय । नच ते सोसवती मज

हाय। त्यजुनि देहा जीव न जाय। आतां काय उपाय
गती ॥ नाहीं उरली कांहीं० ॥ १ ॥

(रडूं लागतो.)

सीता—अगबाई ! प्राणनाथ आतां मोठ्यानें रडूं लागले.

तमसा—सखे ! दुःखितांचीं दुःखें रडूनच कमी होतात बरें.

राम—वासंति ! काय करूं ?

पद–(चिंति मन हें०)

हृदय मम हें उले शोकें न होई द्विविधा परी।
विकल मूर्छा करी, काया अचेतनता ना धरी ॥ ध्रु० ॥
जाळि आंतुनि तनू ज्वाळा घडेना रक्षा तरी।
दैव निर्दय मर्म भेदी, न जीवातें या हरी ॥ १ ॥

सीता—होय, असेंच आहे खरें.

राम—हे अयोध्यापूरवासी जन हो ! देवीनें आपल्या घरीं रहावें हें तुह्मांला रुचलें नाहीं, ह्मणून मीं तिचा तत्काळ वनांत त्याग केला आणि तिच्या विषयीं शोक उघड दाखविला नाहीं; पण सांप्रत तिच्या या चिरपरिचित वस्तूंमुळें मला मोह पडून मी निरुपायानें असा रडतों आहें, याबद्दल मला क्षमा करा.

वासंती—देवा ! झाली गोष्ट होऊन गेली, आतां आपण धैर्यच धरलें पाहिजे.

राम—वासंति ! हें सांगायाला का हवें ? देवी जगांतून नष्ट झाल्याला पुरें तप लोटलें–तिचें नांवसुद्धां लोपलें, तरी हा राम राहिला नाहीं असें कांहीं झालें नाहीं. पहा,—

दिंडी–(दादरा.)

तीव्र शर कीं रद अहीचा विषारी।
होय हृदया बहु जसा क्लेशकारी ॥
शोक शंकू जो तसा भिनुनि गेला।
मर्मभेदी मीं मनीं सहन केला ॥ १ ॥

सीता—हाय हाय ! काय मीं मंदभागिनी ! प्राणनाथांना पुन्हा अशी दुःख देणारी झालें ना ?

राम—याप्रमाणें मी आजवर शोक आवरीत आलों; पण आतां ह्या प्रिय-वस्तूंच्या दर्शनानें उत्पन्न होणारा हा अनावर शोक माझ्यानें सहन करवत नाहीं ! माझा सारा यत्न इथें निष्फळ आहे.

वासंती—(मनांत) आतां यांचें चित्त दुसरीकडे लाविलें पाहिजे. (उघड) रामदेवा ! तें लतागृह तरी पहा, ह्मणजे आपल्या मनाला कांहीं समाधान वाटेल.

राम--बरें आहे, चल जाऊं. (उठतात.)

सीता—वासंति ! तूं मोठीच निर्दय खरी. हृदयाला भेदणाऱ्या अशा गोष्टी दाखवून प्राणनाथांना आणि मला पुनःपुनः दुःख कां देतेस? तुझ्या या उपायानें त्यांच्या मनाचें समाधान होईल असें तुला कसें वाटतें ?

वासंती-(लतागृहाजवळ जाऊन कळवळून) देवा ! हें लतागृह आपल्या पूर्ण परिचयाचें आहे. इथें घडलेल्या गोष्टीची आपल्याला आठवण आहे का ?

पद–(वैभव माझें नष्टचि०)

लतागृहीं या तुह्मी एकदां बसलां असतां जावोनी ।
त्रासलां मनीं सीतेच्या त्या मार्गी दृष्टी लावोनी ॥ ध्रु० ॥
गोदातीरीं हंसविलासा अवलोकित जी राहियली ।
येतां कालें जिनें आपुली खिन्न मुखश्री पाहियली ।
शंकित होतां भयें जिची तनु कंपित, घर्में न्हाणियली ।
केला मुग्ध प्रणामांजली तिनें तुह्मां कर जोडोनी ॥ १ ॥

राम--(विव्हळ होऊन) हे चंडि जानकि ! तूं मला जिकडे तिकडे जणों प्रत्यक्ष दिसते आहेस आणि मजवर दया नाहीं ना करीत? हाय हाय !

पद—(वसंतसेना हरिणी०)

फुटे हृदय मम सखये आतां शरीर हें बघ गळे ।
त्रिभुवन मजला शून्यचि वाटे अंतर्यामहि जळे ॥ ध्रु० ॥
मनें सदा किति विव्हल व्हावें दुःखाच्या दृढ छळें ।
पुनःपुन्हा हा मोह व्यापी काय करूं नच कळे ॥ १ ॥

(मूर्छित होतो.)

वासंती—रामदेवा ! सावध व्हा, सावध व्हा.

सीता—हाय हाय ! धिःकार असो या कर्माला ।

पद—(असुनि तुझें मुख०)

अपुला हा अवतार। नाथा। विश्व मंगलाधार॥ ध्रु०॥
या हतभाग्येकारणें दुःखें वारंवार।
मोहित होउनि ना कळे जीवा कीं मुकणार॥ १॥
जळो जळो मम हें जिणें नष्ट खरी मी फार।
पाहीं ह्मणुनी लोचनीं दशा अशी अनिवार॥ २॥

(मूर्छित होते.)

वासंती--हाय हाय! काय करावें? रामदेव अजून सावध होईनात. सखे सीते! कुठें ग आहेस? तूं तरी येऊन या आपल्या प्राणेश्वराला जीवदान दे.

तमसा--बाई जानकि! ऊठ, सावध हो आणि रामभद्राला आपल्या हाताचा स्पर्श कर. तुझ्या स्पर्शानेंच ते पुन्हा शुद्धीवर येतील.

(सीता सावध होऊन तसें करिते.)

राम—(सावध होऊन आनंदानें) अहाहा? काय चमत्कार हा!

पद—(तुझी अन्यथा तीं०)

गमे स्पर्श हा अमृत लेपा करी। शरीरासि आंतूनि
तैसा वरी॥ ध्रु०॥ अकस्मात् मला रक्षुनी या परी।
प्रमोदें दुजा मोह दे अंतरीं॥ गमे स्पर्श हा०॥ १॥

वासंती—तें कसें काय?

राम—अग, कसें काय? जानकी पुन्हा प्राप्त झाली.

वासंती—(आश्चर्यानें) अगबाई कुठें आहे ती?

राम—ही पहा पुढेंच आहे.

वासंती--(खेदानें) देवा! आधींच दुःखानें पोळून गेलेल्या या मंदभागिनीला अशा प्रलापांनीं आणखी डाग द्यावा हें योग्य आहे का?

सीता—सखे तमसे! मी येथून आतां दूर व्हावें ह्मणतें; पण कसें ग करूं?

पद—(स्वर्ग सोपान हा०)

वज्रलेपें जणों खिळुनि राहतो॥ नाथ देहा पहा।
धर्मयुत हस्त हा। होउनी जड महा। थरर कांपतो॥ ध्रु०॥

संतत यांचा स्पर्श जो शीतल सुखकर साच ।
होता पूर्वीं जो मला झाला आज तसाच ॥ चाल ॥
तरि संताप या दीर्घ कालांतला । मम सारा विलोपा
क्षणीं पावला । मन मोहूनि हें गुंतलें या स्थला ।
शम दुणावतो ॥ वज्रलेपें जणों खिळुनि० ॥१ ॥

राम—वासंति ! प्रलाप कशाचे ? हा पहा मीं तिचा हातसुद्धां धरिला. (सीतेचा हात धरितो.)

सीता—(घाबरून) अग बाई ! इथें राहिलें ही माझी मोठीच चूक झाली.

राम—वासंति ! यावेळी माझीं इंद्रियें आनंदानें जड झालीं आहेत, आणि ही सुटून जाईल या भीतीमुळें मी अधीर बनलों आहें, तर तूं हिला धर कशी.

वासंती—(स्वतःशीं) आतां काय माझें कपाळ धरूं ? इथें कशाची सीता आणि कशाचा स्पर्श ? ही सारी दुःखशोकांतली बडबड मात्र दिसते.

(सीता गडबडीनें हात सोडवून घेऊन बाजूस होते.)

राम—(घाबरून) हाय हाय ! काय प्रमाद हा !

साकी-(धुमाळी.)

जड कंपित घर्मप्लुत झाले उभयांचे कर तेणें ।
दृढ धरली असतांहि सुटोनी गेली सखी त्वरेनें ॥
दैवें लाभविली । परि ती न दावितां हरिली ॥ १ ॥

हा निर्दये जानकि ! कुठेंग आहेस ?

सीता—हो खरीच मी निर्दया—आपली अशी स्थिति प्रत्यक्ष पहात असूनही अजून जिवंत राहिलें आहें.

वासंती—रामदेवा ! आतां कृपा करा, आणि हा दारुण शोक आवरून धरा; माझ्यानें नाहीं ऐकवत. प्रियसखी जानकी इथें कुठची बरें ?

राम—काय, खरेंच ती इथें नाहीं ह्मणतेस ? अथवा नसेलच ! असती तर तुला कशी न दिसती ? तर काय मला हें स्वप्न पडलें ? पण मी निजलों नाहीं ! या रामाला कुठची झोंप ? छेः ! केवळ कल्पनेमुळें भास वाटाविणारा हा वियोग व विचारच मला असा मोह पाडून तिचा प्रत्यक्ष स्पर्श झाला असें भासवितो आहे, दुसरें काय ?

सीता—म्यांच निर्दयेनें प्राणनाथांना यावेळीं फसविलें. हाय हाय !

राम—पण प्रिये ! तूं अशी आहेस तरी कुठें ? जिथें सुग्रीवाचें सख्य, वानरांचें वीर्य, जांबुवंताचें शहाणपण-सर्व व्यर्थ; वायुपुत्राची जिथें गति खुंटली, प्रत्यक्ष विश्वकर्म्यांचा पुत्र नलही जिथें मार्ग काढूं शकत नाहीं, आणि सौमित्राच्या बाणाचाही जिथें प्रवेश नाहीं, अशा कोणत्या विलक्षण जागीं तूं आहेस ? हाय !

सीता—या भाषणावरून तो पूर्वीचाच वियोग बरा झटला पाहिजे.

राम—असो, वासंति ! सांप्रत या रामाचें दर्शन त्याच्या सुहृज्जनाला केवळ दुःखदायकच आहे. तुला मी असें कुठवर रडवूं ? तर जाऊं दे मला आतां, निरोप दे.

सीता—(उद्वेगानें) अगबाई ! तमसे ! प्राणनाथ जायला निघाले कीं ग !

तमसा--अग, स्वस्थ हो. घाबरूं नको अशी. जाऊं देत गेले तर. आपणालाही त्या कुमार कुशलवांच्या वाढदिवसाच्या उत्सवाकरितां भागीरथीच्या पायांजवळ जायचेंच आहे.

सीता--सखे ! कृपा करून अंमळ थांब. दुर्लभदर्शन अशा या प्राणनाथांना मला आणखी थोडा वेळ पाहून घेऊं दे.

राम--सध्यां अश्वमेधाकरितां दुसरी धर्मपत्नी—

सीता--अं, ती कोण ?

राम--सीतेची सुवर्णमयी प्रतिमा आहेच. तिच्याकडे बाष्पपूरित नेत्रांनीं पहात आतां मनाचें समाधान करून घेतों.

सीता--प्राणनाथांना इतकी मानवली त्याअर्थी धन्यच ती ! असो, माझ्या हृदयांत सारखें सलत असलेलें लाजिरवाणें परित्यागरूपी शल्य प्राणनाथांनीं पार काढून टाकिलें ! आतां माझ्या जिवाला आधार मिळाला.

वासंती-रामदेवा ! आपल्या जाण्याला मीं अडथळा आणिला हा माझ्याकडून मोठाच प्रमाद झाला. आतां आपली कार्यहानि न होईल अशा रीतीनें आपण जावें.

तमसा—चल गडे जानकि ! आपणही जाऊं.

सीता—(मोठ्या कष्टानें) बरें, जाऊं या.

तमसा--' जाऊं या ' ह्मणतेस, पण आपल्या प्रियकरावर सारखी जडलेली तुझी दृष्टि कुठें निघते ?

सीता--अग, या चरणांना नमस्कार तरी-(मूर्छित होते.)

तमसा--सखे! सावध हो; धीर धर; असें काय करतेस ?

सीता—(सावध होऊन)

पद—(दिलदार यार०)

या प्राणनाथचरणां ही मम नमस्कृती ॥ ध्रु० ॥
जगतीं ज्याच्या नाहीं। पदरीं पुण्य जराही।
ऐशा जनासि पाहीं। जे दुर्लभ असती ॥ १ ॥

(नमस्कार करून) असो, मेघाच्या आड जाणाऱ्या पूर्णचंद्राचें हें असें कितीवेळ दर्शन होणार आहे ? तर चल गडे, आतां जाऊं.

तमसा--काय बाई चमत्कार हा! भोंवरे, बुडबुडे, लहरी इत्यादि एकाच पाण्याचीं जशीं निरनिराळीं रूपें, त्याप्रमाणें एकाच करुणरसांत आनंद, शोक, सुख, मोह असे अनेक विकार यावेळीं प्रगट झालेले दिसून आले.

राम-हे विमानराजा! ये असा इकडे ये.

वासंती--(रामास) }
तमसा—(सीतेस) }

पद—(गिन मारूं पैजरियां०)

अह्मां समेता भगवती वसुमती भागीरथी ॥ ध्रु० ॥
वाल्मीकि मुनी सूर्यकुलपती। वसिष्ठकुलगुरु तशी अरुंधती।
उदंड मंगलदायक होउत सदा तुह्मांप्रती ॥ १ ॥

(सर्व निघून जातात.)

अंक २ रा समाप्त.

अंक तिसरा.

प्रवेश पहिला.

(भांडायन आणि सौधातकी.)

भांडायन—सौधातके ! आज आपल्या या वाल्मीकिगुरूंच्या आश्रमाला ही कितीतरी विलक्षण शोभा आली आहे पहा !

(कटाव-धुमाळी.)

अतिथी थोर थोर ते आले।
गुरुवर तेणें प्रमुदित झाले ॥ ध्रु० ॥
घडतां आज्ञा योग्य करावा आदर ऐशी।
जिकडे तिकडे उडूनि गेली गडबड कैशी ॥
पाकाच्या त्या शाळेमधिं तर कवणाच्याही।
जिवास कांहीं मिळत विसावा घडिभर नाहीं ॥
नीवाराचा शिजवित असतां भात, उता जी।
प्रथम जातसे पेज मधुर ती उष्णहि ताजी ॥
काढुनि देती नव प्रसूता हरिणीसी, मग।
पितात उरली तपोवनांतिल इतर मृगी मृग ॥
ओदन उकरुनि वरी कढविलें तूप घालितां।
अथवा शाकांमध्यें व्यंजन बदर मिसळतां ॥
घमघमाट जो सुटुनी त्यांचा पसरे भारी।
सुगंधेंच त्या जातात दिशा भरुनी चारी ॥ १ ॥

सौधातकी—हो खरेंच. आणि ही पिकलेल्या दाढी मिशांची झातारी झातारी मंडळी इथें जमल्यामुळें, आज आपल्या अनध्यायाला विशेषच कारण झालें आहे, नाहीं ?

भांडायन—वाः ! हा असा वृद्ध गुरुजनांचा अपूर्व बहुमान फार उत्तम करितोस बुवा !

सौधातकी—तें असो; पण कायरे भांडायना ! या साऱ्या ह्यातार्‍या गुळे-कर्‍यांचा नायकच जणों असा एक फार ह्यातारा बोवा काल आला आहे, तो कोण बरें ? त्याचें नांव काय ?

भांडायन--छेः ! अशी चेष्टा काय करितोस ? भलतेंच काय बोलावें ? अरे, ते भगवान् वसिष्ठऋषि, अरुंधतीसहवर्तमान राजा दशरथाच्या स्त्रियांना बरोबर घेऊन, ऋष्यशृंगाच्या आश्रमाहून इथें आले आहेत.

सौधातकी-हं, वसिष्ठबोवा काय ?

भांडायन-हो तेच तेच; समजलास ?

सौधातकी-मला वाटलें,—

भांडायन-काय वाटलें ?

सौधातकी-तो कोणी वाघोबा किंवा लांडगोबा असावा.

भांडायन-आं, काय काय ह्मटलेंस ?

सौधातकी-नाहीं ह्मटलें, त्यानें येण्याबरोबर ती बिचारी आपली सुरेख गोर्‍ही कालवड मटकावली ! ह्मणून—

भांडायन-अरे घरीं कोणी श्रेष्ठ अतिथि आला ह्मणजे त्यांचा सत्कार करण्याकरितां कालवड, बैल अथवा मेंढा मारून त्याच्या मांसानें मधुपर्क करावा असें शास्त्र आहे. तर उगीच काय बडबड लाविली आहेस ?

सौधातकी-वाः ! तर मग तूं इथें बोलण्यांत सांपडलास !

भांडायन-तो कसारे बुवा ?

सौधातकी-ऐक सांगतों कसा तो. काल वसिष्ठाची स्वारी आली त्याच्या करितां कालवड मारली पण आजच राजर्षि जनक आला त्याच्याकरितां गुरुजींनीं दहीं आणि मध यांनींच मधुपर्क आटोपला ! कालवड कुठें मारली नाहीं ? तेव्हां मांसानेंच मधुपर्क केला पाहिजे असें नाहीं !

भांडायन-अरे बाबा ! ज्यांनीं मांस सोडिलें नाहीं त्यांचा विधि वेगळा, आणि ज्यांनीं मांस सोडिलें आहे त्यांचा विधि वेगळा. जनकानें सांप्रत मांसभक्षण वर्ज केलें आहे, ह्मणून त्याला तसा मधुपर्क केला. आलें लक्षांत !

सौधातकी-काय, जनकानें मांसभक्षण वर्ज केलें आहे ? कारण ?

भांडायन–कारण त्याची कन्या सीतादेवी हिचा दुर्दैवानें तसा दुःखकारक परिणाम झाला, असें ऐकतांच मनाला उद्विग्नता येऊन त्यानें वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार केला, आणि तेव्हांपासून तो आज कित्येक वर्षे चंद्रद्वीप तपोवनांत केवळ कंदमुल फलाहार करून तपश्चर्या करीत होता.

सौधातकी–मग आतां इकडे कशाकरितां आला आहे ?

भांडायन–विशेष मैत्रीमुळें आमच्या गुरुजींना भेटावें ह्मणून.

सौधातकी––आला वरें झालें; पण त्याची आणि त्याच्या विहिणींची भेट झाली का ?

भांडायन—आतांच वसिष्ठऋषींनीं अरुंधतीबरोबर कौसल्यादेवीला सांगून पाठविलें आहे कीं, तुह्मींच स्वत: जाऊन जनकराजाची भेट घ्यावी.

सौधातकी—ठीक आहे, तर आतां

पद–(व्याघ्र हजारों जेणें०)

वृद्ध वृद्ध जन मिळुनि आज ते बसतिल गोष्टी करित जसे।
जमुनि आपणहि बटुबटु सारे खेळ खेळुं या चला तसे ॥ १ ॥
संसारांतिल सुखदुःखाच्या निघतिल त्यांच्या गोष्टि जशा।
परोपरींच्या बाळपणींच्या क्रीडा अमुच्या काढुं तशा ॥ २ ॥

भांडायन––(जातांजातां) अरे ! पण तो पहा, महाब्रह्मनिष्ठ वृद्ध जनकराजा वाल्मीकि आणि वसिष्ठ यांची भेट घेऊन आश्रमाबाहेरील त्या वटवृक्षाखालीं खिन्न मुद्रेनें वसला आहे.

कामदा–(दादरा)

अंतरीं सुता शोक जो असे।
सर्वदां तयें तप्त होतसे ॥
आंत पेटला वृक्ष ज्यापरी।
खास भासतो तो तसा तरी ॥ १ ॥

(जातात.)

अंक] प्रवेश दुसरा. [तिसरा.

(जनकराजा बसला आहे.)

जनक-- (खिन्न होऊन स्वतःशीं)

पद-(कालंगडा-दीपचंदी.)

ये दुरित कसें तनयेवरती।
विपरीत अती खरि दैवगती ॥ ध्रु० ॥
त्यायोगें या व्रणित मनाला।
दुःखाचे चरके बसती ॥ १ ॥

धारावाही क्रकचें जाणों।
मर्मस्थानें चिर चिराति ॥ २ ॥

ताप शमेना तरिही कांहीं।
लोटति अब्दें द्वादश तीं ॥ ३ ॥

अरेरे ! कोण हा त्रास ! ह्या जरेनें आणि त्या मुलांच्या घोरतर दुःखानें, तसेंच उपोषणाच्या कडक नियमांनीं सर्व धातु व रस शुष्क होऊन अत्यंत क्षीण झालेला हा माझा देह एकदांचा पतनही पावत नाहीं ! काय करावें ? आत्मघात करून घ्यावा ह्मटलें, तर तसें करणारे लोक, सुर्याचें कधींच दर्शन होत नाहीं अशा, अंधतामिश्र लोकाला जाऊन पोहोंचतात असें ऋषींचें वचन आहे. तेव्हां तसेंही करितां येत नाहीं. आतां किती काळपर्यंत हें असें दुःसह दुःख भोगावें लागणार आहे कोण जाणे ! आज इतकीं वर्षें होऊन गेलीं तरी प्रतिक्षणीं त्याच त्याच गोष्टीचें चिंतन करीत राहिल्यामुळें स्पष्ट भासणारा हा दारुण दुःखावेग नव्यासारखाच असून अद्यापि मुळींच शांत होत नाहीं. हे देवयजनसंभवे सीते ? तुझी एवढी योग्यता असतांना असा भयंकर परिणाम व्हावा ना ? असो, भवितव्यतेपुढें तूं काय करशील ? लाजे-मुळें लोकांत तोंड दाखवायला आणि गळा मोकळा करून मोठ्यानें मनसोक्त रडायलाही मला मोठी अडचण पडली आहे ! हाय हाय ! बाळे काय सांगूं मला सारें आठवतें बरें !

पद—(व्यक्तरदन बघुनि०)

बालपणामधिल तुझ्या सहज कौतुका।
पाहुनी कसा अपार पावलों सुखा ॥ ध्रु० ॥
निष्कारण रुदन हास्य जेथ सर्वदां।
जें कोमल विरल धवल धरित नवरदां ॥
वाणी ये जिथुनि मंद मंजु आविषदा ।
शोभा किति ऐशा तव सान त्या मुखा ॥ १ ॥

हे भगवति वसुंधरे ! तूं तरी खरोखर मोठी कठोर खरी ! जिचें माहात्म्य तूं स्वत:, अग्नि, वामदेव, वसिष्ठ, अरुंधती, गंगा, फार काय प्रत्यक्ष रघुवंशाचा आदिपुरुष सूर्यनारायणही जाणतो आहे, आणि वाग्देवतेपासून जसा विद्येचा तसा प्रत्यक्ष तुजपासून जिचा जन्म झाला आहे, अशा त्या प्रतिदेवतेचा तो तसा घात झालेला पाहून तुझ्यानें स्वस्थ तरी कसें राहवलें ?

(पडद्यांत)—'अहो भगवति। अहो महादेवि ! असें इकडून चलावें !

जनक—(पाहून) अरे, कंचुकी वाट दाखवीत आहे अशी ही भगवती अरुंधती (उठून) पण ही दुसरी देवि कोण ? (निरखून पाहून) हो ही तर आपली प्रियसखी दशरथराजाची धर्मपत्नी कौसल्या ! हाय हाय ! काय हिची दशा झाली ही ! तीच ही असें आतां कोणाला तरी वाटेल का ?

पद—(देस--धुमाळी.)

नृप दशरथाचिया घरीं। वास ही करी। तेव्हां केवळ
लक्ष्मी परी॥ हवि तिची कशाला सरी। असे उघड
हीच लक्ष्मी खरी ॥ १ ॥ परि विशंक परकी जशी। आ-
ज ही तशी। मजला भासतसे मानसीं ॥ कठिण दैव-
योगें कशी। आणिली कुदशा इजला अशी ॥ २ ॥

अरेरे ! माझ्या स्थितींत काय चमत्कारिक वैपरीत्य आलें आहे ! पूर्वी ज्यांचें दर्शन मला मुर्तिमंत महोत्सव वाटत असे, त्यांचेंच यावेळीं झालेलें हें दर्शन मला क्षतावरील क्षारासारखें दु:सह होतें आहे ! (खिन्न होऊन खालीं पहात उभा राहतो तोंच अरुंधती, कौसल्या आणि कंचुकी येतात.)

कौसल्या—बाळे सीतेची ती दशा झाली; आतां आह्मीं वैदेहाला तोंड तरी काय ह्मणून दाखवावें? नको, त्याचें दर्शन घेणें नको. चला जाऊं मागें.

अरुंधती—बाई कौसल्ये! 'तुह्मीं स्वतः जाऊन त्या राजर्षींची भेट घ्यावी' अशी आपल्या कुलगुरूंची आज्ञा, आणि त्यासाठींच मला पाठविलेली; तर पावलो पावलीं असे हे आढेवेढे कां बरें घ्यावे?

कंचुकी—महादेवि! धीर धरा, शांत व्हा. भगवान् वसिष्ठगुरूंच्या आज्ञेप्रमाणेंच करावें अशी माझीही आपल्याला विनंति आहे.

कौसल्या—अशा प्रसंगीं आणि यावेळीं त्याला भेटणें–ह्मणजे सर्व दुःखें एकदमच मुर्तिमंत पुढें उभीं राहतात. माझ्या हृदयाचीं सारीं बंधनें व मुळें जणों एकदम शिथिल होत असल्यामुळें मला त्यास पुरी स्वस्थता देतां येत नाहीं.

अरुंधती—खरें आहे बाई,यांत काय संशय? प्रिये आप्तजनांच्या वियोगाचीं दुःखें सारखीं संताप करीत असतात; आणि त्यांतच कोणा निकट संबंधी आप्तेष्टाचें दर्शन झालें ह्मणजे तर तीं अगदीं अनावर होऊन सहस्रावधी प्रवाहांनीं एकाद्याला जणों पार बुडवून टाकितात. असो, चलावें आतां. (सर्व पुढें होतात.)

कंचुकी—देवि! हे पहा आपले थोर संबंधी राजर्षि जनक महाराज.

कौसल्या—(मनांत) महाराजांच्या हृदयाला अत्यंत आनंद देणारा सीतेचा पिता, जनकराजर्षि! हाय हाय! कशी मी अभागिनी आज हा महोत्सवविरहित दिवस पहायला जगलें आहें! पूर्वीपैकीं आतां कांहींच शेष राहिलेलें नाहीं!

जनक—(जवळ जाऊन) हे भगवति अरुंधति!

पद—(शृंगा ताडोनी०)

ठेवुनि शिर भूतें। नमितों। विनयें मी तूतें॥ अखिल जगा जशि आधीं संध्या तशि जी वंद्या असशी तूं ते॥ध्रु०॥ निधि जो तेजांचा। सविता। कुलपति रघुजांचा॥ आद्य गुरुगणाचा। गुरु जो। वसिष्ठ मुनि साचा॥ ते तव योगें सदैव गणिती परम पावन स्वीय तनूतें॥ ठेवुनि०॥ १॥

अरुंधती—राजा! परब्रह्म तुला प्रकाशित करो, आणि रजोगुणापलीकडे तपणारा देव सविता तुला पावन करो.

(सर्व खालीं बसतात.)

जनक—कां कंचुकी! त्या प्रजापालकाची ही माता खुशाल आहेना?

कंचुकी—(मनांत) 'प्रजापालकाची माता' या उपरोधिक भाषणानें यांनीं आमची चांगलचि फजिती केली ह्मणायची. असो. (उघड) राजर्षे! आपल्या मनांत जी गोष्ट आली आहे तिच्याच निमित्तानें अतिशय रागावून महादेवींनीं रामचंद्राचें मुखावलोकन देखील केलें नाहीं; त्यामुळें त्यांना अगोदरच दुःख झालें आहे, तशांत आपण आणखी असे टोमणे मारणें योग्य नाहीं. रामचंद्राकडे तरी काय आहे? जानकीच्या अग्निशुद्धीवर विश्वास न ठेवितां लोकांनीं भलतीच दुर्वार्ता उठविल्यामुळें, त्याला तसें कठोर कर्म करणें भाग पडलें; हें त्याचें दुर्दैवच ह्मटलें पाहिजे.

जनक—(रागानें) काय? अग्नि! असा कोण तो अग्नि? आणि माझ्या मुलीला शुद्ध करण्याचें त्याला काय सामर्थ्य? हाय हाय! रामानें आमचा अपमान केला आहेच, आणि त्यावर अशीं भाषणें बोलून हे लोक आमचा पुन्हा असा अपमान करीत आहेत! काय करावें?

अरुंधती—होय, असेंच खरें. सीतेविषयीं 'अग्निशुद्धि' हीं अक्षरें उच्चारणें देखील गौण; तिला 'सीता' इतकें ह्मटलें ह्मणजेच तिच्या शुद्धतेची सीमा झाली! अहाहा! वत्से जानकि! तूं माझ्याशीं सुता व शिष्या या दोन्ही नात्यांनीं वागलीस, पण तुझ्या विशुद्ध गुणांचा उत्कर्ष होत गेल्यामुळेंच माझी तुझ्यावरील भक्ति अधिक दृढ झाली आहे. तुझें शिशुत्व अथवा स्त्रीत्व-कांहीं असो! प्रत्येक स्थितींत तूं सर्व जगाला वंद्य आहेस. खरेंच, मनुष्याच्या आंगचे गुणच पूज्य, त्याला वय अथवा जात यांची मुळींच गरज नाहीं.

कौसल्या—अगबाई! एकाएकीं मला असें काय होतें हें! माझ्या सर्वांगांत अतिशय वेदना येऊं लागल्या! (मूर्छित होते.)

जनक—अरेरे! हें काय! या बाईला असें काय झालें हें?

अरुंधती—राजर्षे! दुसरें काय होणार? तुझी प्रिय आप्त,तुझ्याला पाहतांच एकदम तो राजा दशरथ-तें त्या काळचें सुख-ते शिशुजन-ते आनंदाचे दिवस-सर्व कांहीं जशाचें तसें आठवून, आणि आतांचा हा घोर परिणामही डोळ्यांपुढें

मूर्तिमंत उभा राहून, शोकावेगानें हिचें देहभान नाहींसें झालें आहे. प्रौढ आणि कुलीन स्त्रियांचें अंतःकरण स्वभावतःच जातिपुष्पासारखें कोमल असतें.

जनक—हाय हाय! मी कितीतरी कठोर हा! आपल्या प्रिय मित्राच्या आवडत्या स्त्रीची अशी पुष्कळ दिवसांनीं भेट झाली असतां तिच्याकडे अद्यापि पहातसुद्धां नाहीं, हें अगदीं अयोग्य आहे.

पद—(लाज येइ रजनिस०)

श्लाघ्य थोर मत्संबंधी दशरथाख्य राजा।
प्राणसखा तो कौसल्या ही तदीय भाजा॥ ध्रु०॥
व्यर्थ जरी हो एकांतीं प्रेमकलह कांहीं।
देत मला दूषण तेव्हां फार उभयतांहीं।
शांतविणें चेतविणें कीं मजकडेच राही।
स्मरण नको आतां जाळी अंतरास माझ्या॥ १॥

अरुंधती--अगबाई! कितीवेळ तरी हिचा श्वास बंद आहे! हें हृदय पहा कसें अगदीं स्तब्ध झालें आहे!

जनक--बाई कौसल्ये! सावध हो. (कमंडलूंतील उदक शिंपडतो.)

कंचुकी--(मनांत) अरेरे! जें दैव प्रथम सारखें अनुकूल राहून आपला सर्व तऱ्हेनें स्नेहभाव दाखवी, तेंच आतां अगदीं प्रातिकूल होऊन मनाला अत्यंत ताप देतें आहे, याला काय ह्मणावें?

कौसल्या--(सावध होऊन) हा वत्से जानकि! कुठेंग आहेस?

पद-(चंद्रकांत राजाची०)

विवाहलक्ष्मी भूषणयुत तव सलज्ज विलसित तें।
मुग्ध मुखांबुज नयनांपुढतीं मूर्त मला दिसतें॥
चंद्रिकेपरी चारु मनोहर त्या अपुल्या अंगीं॥
सुखवीं पुनरपि बाळे! मज या बैसुनि उत्संगीं॥
वदत सर्वदां महाराजकीं रघुकुलपुरुषांची।
स्नुषा जरी ही जनकस्नेहें सुताच मम साची॥ १॥

कंचुकी—होय, महादेवींनीं ह्मटलें तें अगदीं खरें आहे. दशरथ महारा-

जांना पांचही मुलांत रामचंद्र विशेष प्रिय; तसेंच चाऱ्ही सुनांत सीतादेवीवर त्यांचें शांताआकासारखेंच किंबहुना अधिक प्रेम असे.

जनक—हे महाराजा, प्रियसख्या दशरथा ! खरेंच तूं सर्व प्रकारें हृदयंगम होतास. तुला मी कधींही विसरणार नाहीं. झटलें असतां आमच्याकडे मुलीचें नातें, तेव्हां आह्मीं तुझा सन्मान ठेवावा. पण उलट तूंच आमची नेहमीं आराधना करावीस. अरेरे !

पद— (रजनिनाथ हा०)

काळानें तुज ओढुनि नेलें । संबंधाचें बीजहि गेलें ॥ ध्रु० ॥
दुर्दैवानें जीवलोकिंच्या घोर अशा या नरकामाजी ।
कष्ट सहाया केवळ आजी । धिक् जीवित मम कैसें ठेलें ॥
काळानें० ॥ १ ॥

कौसल्या--बाळे जानकि ! जणों वज्रलेपाच्या बंधनानें निश्चल झालेलें हें माझें हतभागी जीवित मलाही पापिणीला सोडून जात नाहीं; काय करूं ?

अरुंधती--बाई कौसल्ये ! स्वस्थ हो, धीर धर. असें सारखें रडत बसणें चांगलें नाहीं. तुमच्या कुलगुरूंनीं ऋष्यश्रृंगाच्या आश्रमांत असतांना काय सांगितलें होतें, त्याची तुला आठवण नाहींका ? व्हावयाची गोष्ट होऊन गेली; पण आतां पुढें सर्व प्रकारें कल्याणच होणार आहे, समजलीस ?

कौसल्या--भगवति ! तें मी विसरलें नाहीं बरें; पण सीतेची आणि आमची पुन्हा भेट होईल अशी आतां आशा देखील करायला मला नको.

अरुंधती—तर काय त्यांचें बोलणें तूं खोटेंच समजतेस ? अग, असें अगदीं समजूं नको. महामुनींची वाणी कधीं मिथ्या होईल का ? त्यांच्या मुखांतून निष्फळ भाषण मुळीं निघायचेंच नाहीं.

(पडद्यांत)

मुलें—अरे, चला चला त्या तिकडे खेळूं चला. (सर्व ऐकतात.)

जनक—शिष्टागमनामुळें आज अनध्याय मिळून आश्रमांतील सर्व विद्यार्थी खेळत आहेत, त्यांची ही गडबड दिसते.

कौसल्या--अहाहा ! बालपण मोठें सुखकारक असतें यांत कांहीं संशय पण बाई ह्या मुलांत माझ्या रामभद्रासारखा सुंदर आणि गोंडस दिस-

णारा हा श्यामवर्ण मुलगा कोण असावा बरें ? याला पाहून मला फार समाधान वाटतें.

जनक—खरेंच, मलाही तसेंच होतें आहे.

पद (परज. त्रिवट)

गमत, फिरुनि तो रघुनंदन मम।
पावे कीं शिशुरूपें उद्गम॥ ध्रु०॥
कुवलय दलवत् कांति विराजे।
शिरिं धरिलें नव शिखंड साजे।
बाल समाजीं स्वयशें गाजे।
शमवी नयनां अमृतांजनसम॥ १॥

अरुंधती-(आनंदानें स्वतःशीं) भागीरथीनें अमृतासारखी मधुर गुप्त गोष्ट सांगितली होती ती हीच ! पण त्या आयुष्मंत कुशलवांपैकीं हा कोणता हें मात्र कांहीं कळत नाहीं.

कंचुकी-याच्या वेषावरून हा क्षत्रियाचा मुलगा असावा असें वाटतें.

जनक—होय, याचीं चिन्हें तशींच दिसताहेत. कारण पाठीवर बाणांनीं भरलेले दोन भाते आहेत; त्यांतील बाणांचे पंख वर झुलपांला लागले आहेत; छातीवर भस्माचे पट्टे आणि मृगाजिन आहे; कंबरेला धनुष्याच्या दोरीचेंच कटिसूत्र बांधलें आहे; अंगावर भगवें वस्त्र, एका हातांत कोदंड आणि दुसऱ्यांत अश्वत्थदंड, तसेंच मनगटांत रुद्राक्षांची वलयेंही घातलीं आहेत.

अरुंधती—कंचुकी ! या मुलाला पाहून आह्मांला फारच कौतुक वाटतें, तर वाल्मीकि मुनीला जाऊन विचारा कीं, हा कुणाचा कोण ? तसेंच जातां जातां त्या मुलालाही इकडे कोणी वृद्ध वृद्ध माणसें तुला बोलावीत आहेत, असें सांगून पाठवून द्या.

कंचुकी—ठीक आहे, जशी आज्ञा. (निघून जातो.)

कौसल्या—पण अशा निरोपानें तो येईल का ?

अरुंधती—न येईल तर काय झालें ? त्याच्या आकारावरूनच तो मोठा कुलवंत दिसतो. आणि तशीं कुलीन मुलें वृद्ध माणसांची अवज्ञा कशीं करीतील.

कौसल्या—खरें आहे. तें पहा, कंचुकीनें सांगितलेला निरोप ऐकतांच सर्व मुलांना सोडून मोठ्या विनयानें तो इकडे यायला निघाला देखील.

जनक—काय चमत्कार तरी !

पद—(गोरे वदन पर०)

आहे किति मुलांत या नम्रता ही ।
सहसा अह्मांलाहि जी साध्य नाहीं ॥ ध्रु० ॥
चुंबक मणी आयसा हा तसा या ।
स्थिर मानसा माझिया वेधि पाहीं ॥ १ ॥

(लव प्रवेश करितो.)

लव—(स्वतःशीं) यांचीं नांवें, योग्यता व संबंध मला माहीत नाहींत. तरी हीं सारीं वडील माणसें मला वंद्यच आहेत; पण यांना आतां नमस्कार कसा करावा बरें ? (विचार करून) हं, शास्त्रपद्धतीला विरुद्ध नव्हे अशा रीतीनेंच करूं ह्मणजे झालें. (पुढें होऊन उघड) तुह्मां सर्वांना या लवाचा हा शिरसा प्रणाम असो. (प्रणाम करितो.)

अरुंधती व जनक--मुला ! चिरायु हो.

कौसल्या—बाळा ! तुला उदंड आयुष्य असो.

अरुंधती—ये लेंकरा ! इकडे ये. (त्यास मांडीवर घेऊन मनांत) अहाहा ! यावेळीं केवळ माझी मांडीच धन्य नव्हे, तर फार दिवसांनीं माझा मनोरथही पूर्ण झाला !

कौसल्या--बाळा ! मजकडे पण एकदां ये. (त्यास मांडीवर घेऊन) अगबाई ! या मुलाचा हा नीलोत्पलासारखा श्यामवर्ण आणि कलहंसासारखा गंभीर स्वरच नव्हे, तर याचा हा कमलगर्भासारखा कोमल स्पर्शही केवळ माझ्या रामभद्रासारखाच आहे. बाळा ! तुझा मुखचंद्र मला एकवेळ नीट पाहूं दे बरें. (तसें करून) राजर्षे ! या मुलाकडे पुरतेपणीं पाहिलें का? याचा आणि जानकीचा तोंडवळा अगदीं एक दिसतो आहे.

जनक—हो, असा दिसतो खरा.

कौसल्या—पण ही मी वेड्यासारखी भलत्याच कल्पना मनांत आणून काय बडबडतें आहें ?

जनक—खरेंच—

पद (पंकें भरलीं वदनें०)

सीतेचीं त्या रघुवीराचीं सकल लक्षणें जीं असती।
पूर्णपणें तीं बालकांत या प्रतिबिंबित झालीं दिसती॥ ध्रु०॥
आकृती द्युति वाणी उपजत विनय पवित्र प्रभावही।
पाहुनि येतें हा दैवा! कां मनीं कल्पना ही नसती॥ १॥

कौसल्या—बाळा! तुझी आई आहे का? आणि तुझा बाप कोण हें तुला आठवतें का?

लव—छेः, तें मला कांहीं ठाऊक नाहीं.

कौसल्या—तर मग तूं कुणाचा?

लव—भगवान् वाल्मीकि गुरू यांचा.

कौसल्या—अरे बाळा! असें काय? आह्मी विचारतों तें खरें सांग.

लव—मला इतकेंच ठाऊक आहे. दुसरें मी कांहीं जाणत नाहीं.

(पडद्यांत.)-'अहो सैनिक हो, ऐका नीट ऐका; कुमार चंद्रकेतूची तुह्मां सर्वांला अशी आज्ञा आहे कीं, कोणीही या आश्रमभूमीच्या आंत प्रवेश करूं नये हो.'

अरुंधती--आजचा हा केवढ्या भाग्याचा दिवस कीं यज्ञांतील अश्वरक्षणाच्या प्रसंगानें कुमार चंद्रकेतु इथेंच आह्माला दिसणार आहे!

कौसल्या—अहाहा! माझ्या लक्ष्मणाचा पुत्र चंद्रकेतु सैन्याला आज्ञा करतो हीं अमृतासारखीं मधुर अक्षरें आज माझ्या कानीं पडताहेत!

लव--आर्या! हा चंद्रकेतु तो कोण हो?

जनक—दशरथराजाचे पुत्र राम लक्ष्मण तुला माहित आहेत का?

लव—हो, ते तर रामायणकथेंतील मुख्य पुरुष मला कसे ठाऊक नसतील?

जनक—तर मग त्यांतील लक्ष्मणाचा पुत्र हा चंद्रकेतु, समजलास?

लव—हं हं, हा उर्मिलेचा मुलगा आणि राजर्षि जनकाचा नातु ह्मणायचा.

अरुंधती--(किंचित् हंसून) याला तर रामायणकथेची माहिती बरीच दिसते.

जनक--(विचार करून) बाळा! तुला जर ती कथा इतकी अवगत आहे

तर आह्मी विचारतों तें सांग पाहूं. दशरथाच्या पुत्रांना कोणकोणत्या स्त्रियांच्या पोटीं काय काय अपत्यें झालीं ?

लव--हा कथाभाग आह्मीं किंवा दुसऱ्या कोणीही अद्यापि ऐकला नाहीं !

जनक--तर काय, कवीनें तो भाग अद्यापि रचिलाच नाहीं ?

लव—रचिला आहे, पण प्रसिद्ध मात्र केला नाहीं. त्यांतलाच एक मनोरम आणि सरस भाग रंगभूमीवर प्रयोग करण्यासारखा तयार केला असून तो स्वत: भगवान् वाल्मीकि गुरूंनीं आपल्या हातानें लिहून नाटकाचार्य भरतमुनींकडे पाठविला आहे.

जनक—तो कशाकरितां ?

लव--अप्सरांकडून त्याचा प्रयोग करवावा ह्मणून.

जनक--या गोष्टीचें आह्मांला मोठें कौतुक वाटतें.

लव--आमच्या गुरुजींना तर त्याची फारच आवड आहे, ह्मणून त्यांनीं कांहीं विद्यार्थ्यांच्या हातीं तो ग्रंथ भरताश्रमाला पाठविला, आणि त्याच्या संरक्षणाकरितां बरोबर माझ्या भावाला धनुष्यबाण देऊन धाडिला आहे.

कौसल्या—काय, तुला दुसरा भाऊ आहे ह्मणतोस ?

लव--होय, त्याचें नांव कुश; पण मी त्याला दादा ह्मणतों.

कौसल्या--एकूण तो तुझ्यापेक्षां वडील आहे तर ?

लव--प्रसूतीक्रमानें तो तसा होतो खरा.

जनक--तर काय तुह्मी दोघे जुळे भाऊ आहां ?

लव--होय, जुळेच आहों.

जनक--बरें, रामायणकथा तुह्मी कोठपर्यंत शिकलां आहां ?

लव--लोकांनीं खोटा अपवाद उठविल्यामुळें उद्विग्न झालेल्या रामचंद्रानें सीतेला बाहेर घालविली आणि तिला प्रसववेदना होत असतां एकटीला घोर अरण्यांत सोडून लक्ष्मण परत निघून गेला, येथपर्यंत.

कौसल्या--हाय हाय ! बाळे जानकि ! दुर्दैवानें तूं त्या घोर अरण्यांत एकटी पडलीस त्यावेळीं तुझ्या पुष्पासारख्या कोमल शरीराची काय बरें अवस्था झाली असेल ?

जनक--हा वत्से सीते!

पद-(आज काल होति न०)

तुजवरि तो घोर किती समय पातला।
रक्षाया तव जीवा कोणत्या स्थला ॥ ध्रु० ॥
प्रसवकाल वेदनांत। टाकाया तुज मुखांत।
जमतां त्या श्वापदांत। आक्रंदुनि 'तात तात'।
दीने बहु असशिल तूं बाहिलें मला ॥ १ ॥

लव--(अरुंधतीस) बाई! हीं उभयतां कोण आहेत हो?

अरुंधती--बाळा! ही कौसल्या आणि हा राजर्षि जनक बरें.

लव—हां असें काय? तरीच हीं वारंवार दुःखित होताहेत.

जनक--(त्वेषानें) अरेरे! काय तरी हा लोकांचा अमर्याद दुष्ट स्वभाव आणि रामानें तरी कोण ही भलतीच त्वरा केली? हें संकट-छेः हा वज्रपात अकल्पितच झाला! काय करूं? मला स्मरण झालें कीं एकदम क्रोधावेशानें माझ्या अंगाचा कसा भडका उडून जातो आणि याचें निरसन चापानें किंवा शापानें केव्हां करूं असें होऊं लागतें.

कौसल्या—भगवति! यांच्या रागाचें कसें तरी शांतवन करून आह्मां सर्वांचें रक्षण करा.

अरुंधती—उपमर्द झालेल्या मानी जनाला असा क्रोधावेश येणें साहजिक आहे. राजर्षे! शांत व्हावें. रामभद्र आपल्या पुत्राप्रमाणें आहे, आणि गरीब बिचाऱ्या प्रजेचें पालनही झालेंच पाहिजे.

जनक--होय, तेंही खरेंच! त्यांच्यावर राग करणें मला मुळींच योग्य नाहीं. ते सारे क्षम्यच आहेत. (कांहीं मुलें धांवत येतात.)

मुलें—अरे लवा लवा! अश्व अश्व ह्मणून एक प्राणीविशेष लोकांत आहे असें ऐकत होतों तो आत्तां आह्मीं प्रत्यक्ष पाहिला!

लव—हो हो; प्राणिशास्त्रांत, यज्ञप्रकरणांत आणि संग्रामविद्येंत अश्व आला खरा, पण तो कसा आहे सांगा पाहूं.

मुलें—ऐक सांगतों कसा आहे तो.

पद—(मांड–धुमाळी.)

पुच्छ तयाला मागें मोठें हलवी तें तो वरी वरी ।
लांब जटाळू मान, चार खुर थय थय नाचे कसा तरी ॥
खाउनि लघुतृण फुर फुर करितो लेंड्या गाळी फळापरी ।
जाइल दुरी वारु असा तो ऊठ दावितों त्वरा करीं ॥ १ ॥

लव—पहा हो पहा, हे मला ओढून नेताहेत.

अरुंधती–जा बाळ जा, आपलें कौतुक पुरवून घे.

(सर्व मुलें लवाला ओढून घेऊन जातात.)

कौसल्या–भगवति ! हा मुलगा दृष्टीआड झाला तर माझे प्राण कासावीस होतील, याकरितां जरा पलीकडे जाऊन तो चालला आहे त्याला पहात उभ्या राहूं चला.

अरुंधती—अग, तो कसला चपळ ! पहा, इतक्यांत किती दूर निघून गेला. तो आतां कसा दिसणार आहे !

कंचुकी—(प्रवेश करून) भगवान् वाल्मीकि ऋषि ह्मणतात कीं, हें सर्व आपल्याला वेळेवर कळेलच. सांप्रत त्यासंबंधानें विशेष कांहीं सांगवत नाहीं.

जनक--हें कांहीं तरी गूढ प्रकरण असलें पाहिजे. तर चला आतां आपणच जाऊन त्यांची भेट घेऊं. (उठून) अहाहा !

साकी—(धुमाळी .)

पाहुनियां या बालकास जी मनिं उद्भवली आशा ।
फलदायक ती होवो वेगें जावो दुःख विनाशा ॥
ईशा तुज साची । येवो करुणा सकलांची ॥ १॥

अंक] प्रवेश ३ रा. [तिसरा.

(सर्व मुलें घोड्याभोंवतीं जमलीं आहेत.)

मुलें—कां लवा ! पाहिलास ना हा किती आश्चर्यकारक प्राणी आहे तो !

लव—अरे हो पाहिला; आणि हा यज्ञसंबंधी अश्व आहे हेंही पण मीं ओळखिलें.

मुलें—तें रे कशावरून ?

लव—अरे वेड्यांनो, तुह्मीं तें अश्वमेधकांड वाचलें नाहीं का ? मग त्यांत सांगितल्याप्रमाणें याच्याबरोबर कवचें घातलेले, दंडधारण करणारे आणि भाते बांधलेले असे शंभर शंभर वीर रक्षणाकरितां आले आहेत; ते पहा. तुह्मांला खरें नसलें वाटत तर जाऊन विचारा त्यांना. (कांहीं मुलें पुढें होऊन विचारितात.)

मुलें—कायहो, हा अश्व कुणाचा आणि असा रक्षकांनीं वेढिलेला काय ह्मणून फिरतो आहे ? सांगा पाहूं ?

लव—(स्वतःशीं हा अश्वमेध ह्मणजे सर्व क्षत्रियांची मानहानि करणारा, विश्वविजय करूं इच्छिणाऱ्या क्षत्रियांच्या अत्युच्च वैभवाचा कळस, अशा उत्कर्षांची कसोटीच नव्हे का ? ठीक आहे पहातो आतां.

(पडद्यांत)— 'ऐका, मुलांनो ऐका.'

आर्या

'ही हयरूप पताका अथवा ही वीरघोषणा त्याची ।
जो एकवीर सप्तहि लोकांत अशा दशास्यहंत्याची ' ॥ १ ॥

लव—अरेरे ! काय हे बडबडतात ! यांचे हे शब्द माझ्या काळजाला कसे झोंबून जाताहेत.

मुलें—लवा ! तूं मोठा हुषार खरा बुवा. पण असें काय बोलतोस हें ? चल जाऊं.

लव—अरे थांबा रे, तुह्मांला कांहीं कळत नाहीं. अहो वीर हो ! तुह्मी असें ह्मणतां, तर काय ही सर्व पृथ्वी आज निःक्षत्रिय झाली आहे ?

(पडद्यांत)—'अरे, असे क्षत्रिय आहेत कुठें ? आणि असले तरी आमच्या महाराजांपुढें त्यांची काय प्राज्ञा आहे ?'

लव—काय काय ह्मटलेंत ?

पद—(मृगया वनिं करितां०)

'जगतीं बलशाली क्षत्रिय कोठें राहती ' ॥ ध्रु० ॥
निंदुनि सर्वा कशास गर्वा धरुनि बोलतां यापरी ।
महाराज ते असोत तुमचे कसेहि, भय न मला तरी ।
मीच पताका हरितों आतां दावा प्राज्ञा काय ती ॥ १ ॥

(मुलांस) हं—गड्यांनो ! पाहतां काय ?

पद--(स्मरुनि कांहिं)

धरूनि न्या हयासि या । सकलहीं मिळूनियां ॥ ध्रु० ॥
आपुलिया आश्रमांत । चरत राहुं द्या मृगांत ।
पळवा तरि डिखुळाचा मार बहु करूनियां ॥ १ ॥

(एक वीर ऐटीनें पुढें येतो.)

वीर—अरे, धिःकार असो तुझ्या या पोरपणाला ! काय बडबडतोस हें ! हे वीर काय सामान्य आहेत ? पोराचें ह्मणून देखील ते असलें गर्विष्ठ भाषण मुळींच सहन करणार नाहींत. पहा, आमचा अधिपति चंद्रकेतु शत्रूची खोड मोडणारा आहे. तो या वेळीं सहज कौतुकानें अरण्य पहात फिरतो आहे तो आला नाहीं तोंपर्यंत तुह्मी सारे मुकाट्यानें येथून निघून जा कसे. नाहीं तर परिणाम फार बाईट होईल; काय समजलां सांगतों आहें ?

मुलें—(घाबरून) अरे बाबा लवा ! चल कसा. जाऊं दे त्या अश्वाला. आह्मांला घेऊन काय करायचा आहे ? आणखी असें पहा,—

पद—(शंभो शिवहर०)

रागें भरतिल भारी गुरुवर आह्मांतें हय पाहोनी ॥ ध्रु०॥ दाखविती भय वीर किती । शस्त्रें अपुलीं करिं धरिलीं तीं चमकावोनी ॥ १ ॥ आश्रमपदही दूर असे । गांठूं सत्वरि तरि हरिणापरि अह्मि धांवोनी ॥ रागें० ॥ २ ॥

लव—काय ह्मणतां, शस्त्रें चमकावून वीर आह्मांला भय दाखवीत आहेत ? ठीक आहे. तुह्मी अश्वाला घेऊन चला, मी त्यांचा चांगलाच समाचार घेतों. (धनुष्य सज्ज करून)

पद—(झंपा)

कालमुख जृंभणा चाप मम हें वरो। विकटपण त्यापरी आजि अनुसरो ॥ ध्रु० ॥ ज्याच जिव्हा कठिण कोटि दंष्ट्रा महा । घोष घर्घर भयद टंकार हा। होति चर्वण जिथें ग्रास खर शर पहा। गर्वयुत वीरगण सर्वहि हरो ॥ कालमुख० ॥ १ ॥

(मुलें घोडा घेऊन जातात व तोही मागाहून जातो).

वीर—वाहवा !

पद—(मजा देते है क्या०)

असे बाळ जरी हा वीर कसें धैर्य अलौकिक दावी ॥ ध्रु० ॥ झाली रक्त कोपुनी दृष्टी । करितो सेनेवरि शरवृष्टी। वाटे लोपवितो कीं सृष्टी ॥ चाल॥ या लोल शिखंडाची ही रणस्थिरता काय वदावी ॥ असे बाळ ॥ जरी० ॥ १ ॥

अरे, पण खरेंच यानें आमच्या सैन्याचा बराच संहार चालविला ! हां हां, सैनिकहो ! थांबा थांबा; भिऊं नका. हें पहा, आपल्याला चांगलेंच पाठबळ आलें.

पद—(राम करीं जरि०)

सूत सुमंतचि ज्याच्या वरती। चपल जोडिले हय ज्या असती। थडकुनि मार्गीं जो त्वरितगती। भव्य ध्वज डुलतो ॥ १ ॥ ऐशा अपुल्या रथांत बसुनी । साह्य करावें आह्मां ह्मणुनी । धनुर्बाण हा हातीं धरुनी। चंद्रकेतु आला ॥ २ ॥

(निघून जातो. चंद्रकेतु व सुमंत रथारूढ प्रवेश करितात.)

चंद्रकेतु—अहो सुमंत ! पाहिलेंत का ?

पद-(सुटला पितृ दिशेचा०)

ऋषिसुत एकाकी संगरीं। अपुले सैनिक हे कितितरी। वेढुनि प्रेरिती शस्त्रें त्याच्यावरी । तिळभरहि डगेना चेते उलटा परि॥ १ ॥ सोडी बाण सहस्र क्षणीं।

फोडी कुंजर मस्तक मणी। किती नवल वीरही पाडी
बहु हा रणीं । रघुकुलज कुणी का गमे अशा लक्षणीं ॥ २॥

सुमंत—खरेंच, मला देखील हा तुझ्या वयाचा तुझ्याच सारखा आणि देवदैत्यांहूनही अधिक पराक्रमी असा ऋषिकुमार पाहून कौशिकमखरक्षणाचे वेळीं सज्ज झालेल्या रघुनंदनाचें स्मरण होतें.

चंद्रकेतु—अहो, पण यानें आतां तर आमच्या सैन्याचा अगदींच निःपात चालविला! तर सुमंत! चला त्वरा करा.

सुमंत—(मनांत) आतां काय करावें? या चंद्रकेतूला मुनिकुमाराशीं युद्ध करायाला कसें अनुमोदन द्यावें? पण एकदां युद्ध जुंपून राहिल्यावर काय उपाय आहे? (रथ पुढें हांकून उघड) वत्सा चंद्रकेतो! हा पहा रथ मीं त्याच्या अगदीं जवळ उभा केला, तर बोल त्याच्याशीं काय तें.

चंद्रकेतु—अहो सैनिक हो! या कुमाराचें नांव काय ह्मटलेंत? लव! ठीक आहे. हे महाबाहो लवा! तेजानें तेजांतच शांत व्हावें, तर चल मजकडे

पद—(आज श्याममोह०)

पाहतां तुझे गुण तूं वाटसी सखा मजला।
जन माझे तवही ते प्रिय असोत तरि तुजला ॥ ध्रु० ॥
त्यांसह कां व्यर्थ असा निकर तुवां मांडियला।
झुंज मशीं मी त्वदीय दर्पनिकष हा प्रबला ॥ १ ॥

सुमंत—वत्सा! पहा पहा हा बालवीर सैन्याचें मर्दन करायाचें सोडून हत्तीचें गंडस्थल फोडणारा सिंहाचा छावा जसा मेघाची गर्जना ऐकून त्याच्याकडे धांव घेतो तसा तुझ्याकडे मोठ्या आवेशानें येतो आहे.

लव—(प्रवेश करून) शाबास राजकुमारा शाबास! तूं खरा ऐक्ष्वाकु आहेस. हा मी तुजकडे आलों पहा. (पडद्यांत 'हाणा मारा त्याला, काय पहातां? असा गलबला होतो) काय! हे सैनिक पराभूत होऊन सैरावैरां पळाले तरी पुन्हां एकत्र होऊन माझ्यावर शास्त्रप्रयोग करीत आहेत? अरे नीचांनो! धिःकार असो तुह्मांला! (आंत निघून जातो.)

चंद्रकेतु—अहो सुमंत, याच्याकडे अंमळ पहा तर खरें.

पद—(बांधल्या नवघंटिका०)

कौतुकानें दर्पदृष्टी मजवरी कैशी करी।
मागुतीं हा धन्वयष्टी सेनिकेवरिही धरी ॥ ध्रु० ॥
दोंहिकडुनी पवन चळवी सेंद्रधनु धन अंबरीं।
भासतो अति रम्य तैसा गंभिरानन संगरीं ॥ १ ॥

सुमंत—तूं याला अशा प्रकारें पाहूं तरी शकतोस; पण मी तर विस्मयानें केवळ थक्क आणि पराधीन झालों आहें.

चंद्रकेतु—अहो युद्ध करणारे सैनिक हो !

पद—(पिलु-धुमाळी.)

वीर एकटाची आहे। तुह्मि तरी अनेक पहा हे।
भूवरी उभा तो राहे। बैसलां रथांवरतीं ॥ १ ॥
मृगाजिन तयाचे देहीं। घातलीं तुह्मीं कवचें हीं।
धन्व मात्र तो करिं घेई। विविध आयुधें तुमचीं ॥ २ ॥
कोमलांग बालक त्यासी ॥ प्रौढ तुह्मी जिंकायासी।
सिद्ध जाहलां युद्धासी। धिक् तुह्मां आह्मां ह्मणुनी ॥ ३ ॥

लव—(प्रवेश करून स्वतःशीं) काय ! हा माझ्यावर दया करितो आहे? पण आपण याच्या अशा दयेला पात्र तरी व्हा कशाला? असो, आतां या सैनिकांशीं व्यर्थ काळ घालविण्यांत अर्थ नाहीं. यांना जृंभकास्त्रानें एकदम निचेष्ट करून टाकिलें पाहिजे. (अस्त्रध्यान करीत बसतो.)

सुमंत—वत्सा चंद्रकेतो ! या मुलानें जृंभकास्त्राचा प्रयोग चालविलेला दिसतो. तो पहा, आपल्या सैन्यांतील गलबला एकदम नाहींसा झाला.

चंद्रकतु—होय, असेंच वाटतें खरें.

सुमंत—पण याला हीं जृंभकास्त्रें मिळालीं कोठून?

चंद्रकेतु—भगवान् वाल्मीकि ऋषिपासून मिळालीं असावींत.

सुमंत—छेः! तसें होण्याचा मुळींच संभव नाहीं. कारण कृशाश्वमुनींपासून हीं अस्त्रें मूळ उत्पन्न झालीं. तेथून कौशिकाला आणि कौशिकाकडून रामचंद्राला मिळालीं, अशी यांची परंपरा आहे.

चंद्रकेतु—तें खरें; पण ज्यांच्यांत सत्वगुणाचा विशेष आविर्भाव असतो

असे मंत्रद्रष्टे ऋषीही अशीं अस्त्रें स्वतः उत्पन्न करूं शकतात असें ऐकतों. तेव्हां दुसऱ्या कोणाकडून ही परंपरा लागली नसेल कशावरून?

लव—(ध्यान विसर्जन करून) ठीक आहे. आतां या गर्विष्ठ राजकुमाराचा समाचार घेऊं या. (उठतो.)

सुमंत— तूं ह्मणतोस तेंच खरें. पण तो पहा ऋषिकुमार आतां तुझ्याकडे वळला; तर सावध ऐस.

चंद्रकेतु आणि लव—(एकमेकांस उद्देशून आनंदानें.)

पद—(अशि ही सुगुणं०)

बघुनियां कुमारा किती मोद वाटे ।
घडुनि हा समागम सहज कां असें प्रेम हृदयांत दाटे ॥ ध्रु० ॥
गुणातिशय कीं गतजन्मींचा याचा दृढ सहवास ।
अथवा गुप्त प्रकट जहालें नातें या समयास ॥
काय याला ह्मणूं ना कळे केविं घाटे ॥ बघुनि० ॥ १ ॥

सुमंत— (एकीकडे) एकाद्याशीं अकस्मात् स्नेह जडणें हा प्राणीमात्राचा धर्मच आहे. व्यवहारांत यालाच तारामैत्री किंवा चक्षुःप्रीति असें ह्मणतात. अबाधित आणि अहेतुक प्रेम तरी हेंच होय.

चंद्रकेतु आणि लव--(पुन्हा एकमेकांस उद्देशून आपल्याशीं)

पद—(त्वरित घे तुज०)

सुंदर या सुकुमारतनूवरि ॥ टाकावे शर ।
कैसे हे खर । येत असा संदेह मदंतरिं ॥ ध्रु० ॥
रोमांचित ही होउनि काया । वाटे कीं दृढ कवळूं काया ॥
वीरव्रत परि कठिण खरोखरि ।
स्नेह विरोधा मूल किती तरि ॥ सुंदर या० ॥ १ ॥

सुमंत—(स्वतःशीं) हा सीतापुत्र असेल काय? पण छेः; काय ही भलतीच कल्पना! जिथें सर्व मनोरथाचें मूळ बीजच दैवानें नष्ट केलें -वेलीचाच मुळीं नाश झालेला तिथें फलाची आशा कशाला?

चंद्रकेतु—सुमंत! आतां मी रथाखालीं उतरावें ह्मणतों. कारण तसें केल्यानें एकतर या वीराचा योग्य सन्मान राखल्यासारखें होईल, आणि दुसरें

असें पहा कीं, याच्याबरोबर पादचारी होऊन युद्ध केल्यानें क्षात्रधर्महीं पाळिला जाईल.

सुमंत--(मनांत) आतां या वाजवी गोष्टीला नाहीं कसें ह्मणावें ? आणि हें साहस करायला अनुमोदन तरी कसें द्यावें !

चंद्रकेतु—सुमंत ! तुह्मी असे विचारांत कां पडलां ?

सुमंत—वत्सा ! सनातनधर्म तूं ह्मणतोस तसाच खरा. आणि तूं असें वीरव्रत पाळितो आहेस, तेव्हां सुदैवानें दशरथकुल प्रतिष्ठेला पावलें यांत शंका नाहीं.

चंद्रकेतु--अहो, आमच्या वडील काकांचा वंश कायम झाला नसतां आपल्या कुलाची प्रतिष्ठा कशाची ? या विचारानें आमचे दुसरे त्रिवर्ग वडील नेहमीं कष्टी असतात.

सुमंत--हाय हाय ! हें भाषण किती तरी मर्मभेदक आहे !

लव--काय करावें ? अंतःकरणांत स्नेह आणि विरोध हे दोन्ही भाव एकवटल्यामुळें-

पद-(कालंगडा-दादरा.)

मम ही विचित्रा स्थिती । जाहली किती ॥ ध्रु० ॥
रमुनि नयन शमविति मन तों विवेक त्याप्रती ।
शिवतांचि स्फुरुनि बाहु युद्ध इच्छिती ॥ १ ॥

(चंद्रकेतु रथाखालीं उतरतो.)

चंद्रकेतु--आर्या ! आपल्याला नमस्कार असो.

सुमंत--वत्सा ! तुमचा कुलपति देव सविता रणांत तुला यश देवो; इंद्राग्न्यादि देवताही तुला आपापलीं तेजें अर्पण करोत; आणि तुमचा कुलगुरु वसिष्ठ त्याचप्रमाणें रामलक्ष्मण यांचा तुला आशीर्वाद असो.

लव—कुमारा ! तूं रथांत असलेलाच अधिक शोभतोस इतका अत्यादर कशाला ?

चंद्रकेतु--तर मग तूंही दुसऱ्या रथांत बैस.

लव—(सुमंतास) आर्या ! राजकुमाराला रथावर बसवावें.

सुमंत—तर तूंही या चंद्रकेतूच्या ह्मणण्याला मान दे.

लव—तसें करण्याला कांहीं हरकत नाहीं ह्मणा; पण आह्मी अरण्यवासी, आह्मांला रथांत बसणें काय माहीत? तुह्मांलाच तें योग्य.

सुमंत—मुला! स्वाभिमान आणि सौजन्य यांना अनुसरून कसें वागावें हें तूं पूर्ण जाणतो आहेस. इक्ष्वाकुवंशीय राजा रामचंद्र तुला पाहील तर त्याचें अंतःकरण खचित प्रेमानें द्रवून जाईल.

लव—आर्या! तो राजर्षि मोठा सुजन आहे असें ऐकतों खरें; आणि ह्मणूनच आह्मीं त्याच्या यज्ञाला विघ्न आणिलें नसतें. पण तुमच्या त्या अश्वरक्षकांनीं उद्दामपणानें सर्व क्षत्रियांविषयीं धिःकारयुक्त उद्गार काढले ते ऐकून मला मोठा क्रोध आला.

चंद्रकेतु—काय? आमच्या तातांच्या प्रतापोत्कर्षाविषयीं तुला क्रोध आला औं!

लव—तें कसेंही असो. पण अशा राजर्षीच्या आश्रितजनांनीं गर्वाचीं भाषणें करणें कांहीं ठीक नाहीं. हें पहा.

पद--(श्यामा रम्य शशि०)

वाणी मदोद्धता जरि राक्षसी खरी होय अशी गणती॥
वैराचें ती दुःखाचेंही मूळ मुनी ह्मणती ॥ ध्रु० ॥
तीच मृदु मधुरा गिरा जशि कामधेनू कामदा।
दैन्यहारी कीर्तिकारी दुष्कृतारि शुभास्पदा।
स्तवुनि तिला दृढ भावें न कसा कोण करी प्रणती?॥ १ ॥

सुमंत—(स्वतःशीं) ऋषिजनांच्या सहवासानें याच्या मुखांतून असें प्रौढ भाषण निघणें योग्यच आहे.

लव--बरें, पण चंद्रकेतो! तुला मी असें विचारितों कीं, क्षात्रधर्म काय एकट्या त्या रामचंद्राचेच ठिकाणीं वसत आहेत? दुसरे कोणी तसे नाहींत वाटतें?

सुमंत—अरे, तूं त्या ऐक्ष्वाकुराजाला जाणत नाहींस ह्मणून असें बोलतोस. अशा या अतिप्रसंगापासून दूर रहा. सैनिकांला निचेष्ट करण्यांत तुझें शौर्य प्रगट झालें इतकें पुरे. पण प्रत्यक्ष जामदग्न्यालाही जिंकणाऱ्या त्या रामचंद्राविषयीं मात्र हें भाषण तुला शोभत नाहीं; समजलास?

लव—अहो श्रेष्ठ! 'जामदग्न्यालाहि जिंकणारा' असें आपण ह्मणालांत, पण त्यांत त्याची अशी प्रौढी ती कोणती बरें?

दिंडी-(दादरा.)

वीर्य वाणीमधि राहतें द्विजांचे।
बाहुंमाजी तें असे क्षत्रियांचें॥
शस्त्रधर त्या जिंकिलें ब्राह्मणाला।
स्तुत्य कैसें हें कर्म राघवाला?॥ १॥

चंद्रकेतु—अहो सुमंत! हा वितंडवाद कशाला करितां?

पद-(पापिणि मी ह्मणवोनि०)

कोण असा अवतार नवा हा क्षत्रिय पावे।
ज्यास न भार्गववीर्य खपावें॥ कोण०॥ ध्रु०॥
राघवाच्या अभयदानीं जग सुखावे।
चरित ऐसें यास त्याचें काय ठावें?॥

लव—अरे, रामचरित्राचा महिमा जाणत नाहीं असा कोण आहे? पण एवढेंच सांग कीं, ताटिकेच्या निमित्तानें केलेला स्त्रीवध, खराशीं युद्ध करितांना पराङ्मुख न होतांही तीन पावलें मागें सरणें, आणि वालीवधाच्या वेळीं दाखविलेलें युद्धकौशल्य, या गोष्टी त्या रामचरित्रांतच आहेतना? अथवा या गोष्टींशीं मला काय करायाचें आहे? ते थोर आहेत, त्यांचीं चरित्रें कशींहीं असलीं तरी तीं मान्यच आहेत.

चंद्रकेतु—अरेरे! हा ताताला अपवाद लावून अमर्याद भाषण करितो आहे, आणि गर्वानें फारच फुगून गेला आहे!

लव—काय! हा मजवरच डोळे वटारूं लागला!

सुमंत—आतां मात्र हे दोघेही खरे चवताळले. एकमेकांचा पाडाव करण्याच्या उत्कट इच्छेमुळें, यांचें सर्वांग कसें कांपूं लागलें, नेत्र आरक्त झाले, भिंवया वरचेवर वक्र होऊं लागल्या.

चंद्रकेतु आणि लव—(एकमेकांस उद्देशून)

पद-(तन वारिदा०)

बल दावितों। तुज आपुलें मीं॥ ध्रु०॥
खर लावुनी बाण। धन्वावरी जाण।
आतां तुझे प्राण। संहारितों॥ बल०॥ १॥

(युद्ध करूं लागतात. पडदा पडतो.)

[अंक ३ रा समाप्त.]

अंक चवथा.

प्रवेश १ ला.

(विद्याधर आणि विद्याधरी.)

विद्याधर--काय तरी चमत्कार हा ! हे दोघेही रविकुलोद्भव राजकुमार अकस्मात् युद्धाला प्रवृत्त होऊन, आपलें क्षात्रतेज उत्तम प्रकारें प्रकट करीत आहेत. यांचें अद्भुत युद्धसामर्थ्य पाहून देवदैत्यांनाही मोठें आश्चर्य आणि भय वाटूं लागलें आहे. तर प्रिये चल, आपण या श्रेष्ठ वीरांवर सुवर्णकमलें व ताजीं उत्तमोत्तम मंदारपुष्पें आणून त्यांची वृष्टि करूं.

विद्याधरी--पण प्राणनाथ ! हें काय ? अकालीं स्फुरण पावणाऱ्या विद्युत्तेजाप्रमाणें हें आकाश पुन्हा एकाएकीं असें पिंगट व दैदिप्यमान कशानें झालें बरें ?

विद्याधर—हो खरेंच, काय तरी विलक्षण तेज हें ? सूर्याचा तीव्र प्रकाश सुद्धां याच्यापुढें अगदीं लोपून गेला ! भगवान् नीललोहित शंकरानें आपला तिसरा नेत्र तर उघडला नाहीं ! हं, समजलों. वत्स चंद्रकेतूनें आग्नेयास्त्राचा प्रयोग केल्यामुळें, अग्निवृष्टि होत आहे. हीं आकाशांतून संचार करणारीं विमानें ध्वजचामरें दग्ध होऊं लागलीं ह्मणून इकडेतिकडे सैरावैरां धावूं लागलीं आहेत. अरे, पण हा अग्नि आतां चहूंकडे पसरून सर्व दिशा संतप्त होऊं लागल्या ! तर प्रिये ! चल, आपण या ठिकाणाहून जरा दूर जाऊं हें बरें.

विद्याधरी—ठीक आहे. पण प्राणनाथ ! एकाएकीं हें विद्यास्फुरण होऊं लागलें आणि मयूरकंठाप्रमाणें नीलवर्ण अशा निबिड मेघांनीं सारें आकाश व्यापून गेलें, हें काय ?

विद्याधर--वाहवा ! कुमार लवानें वारुणास्त्राचा प्रयोग केला त्याचा हा प्रभाव ! अहाहा ! प्रिये ! ह्या असंख्य जलधारांनीं तें आग्नेयास्त्र अगदीं शांत होऊन गेलें.

विद्याधरी—अग्नि शांत झाला, फार बरें झालें बाई !

विद्याधर--पण अरेरे ! कोणतेंही अति झालें कीं तें वाईटच. ह्या वारु-

शास्त्राच्या योगानें जिकडेतिकडे वावटळें सुटून व अशा भयंकर गर्जना करणाऱ्या मेघांनीं सर्व आकाश व्यापलें जाऊन, सर्वत्र कसा दाट अंधकार पसरला आहे. यामुळें अखिल प्राणिमात्रांचे जीव कासावीस होऊन थरथर कांपूं लागले आहेत. आतांच कल्पांत होतो कीं काय अशी भीति उत्पन्न झाली आहे. पण शाबास चंद्रकेतो ! शाबास. योग्य वेळीं वायवास्त्राचा प्रयोग केलास. तत्वज्ञानाच्या योगानें अज्ञान संपून मिथ्याभासांचा जसा ब्रह्मामध्येंच लोप होतो, तद्वत् या वायूच्या योगानें मेघांचा विलय आकाशांत केव्हांच होऊन गेला.

विद्याधरी--पण प्राणनाथ ! हें कोण बरें आपल्या शेल्याचा पदर हालवीत व मधुर शब्दांनीं युद्धाचा प्रतिषेध करीत या उभय कुमारांकडे विमानांतून उतरून येत आहे !

विद्याधर—प्रिये ! शंबुकाचा उद्धार करून माघारा चाललेला हा प्रभु रामचंद्र. तें पहा, त्या थोर पुरुषाच्या वचनाला मान देऊन दोन्ही कुमारांनीं आपलें युद्ध बंद केलें, आणि आतां चंद्रकेतु त्याला प्रणाम करीत आहे. हा पुत्रसमागम प्रभु रामचंद्राला अत्यंत कल्याणास्पद होवो. (दोघें निघून जातात)

अंक] प्रवेश २ रा. [चवथा.

(राम, चंद्रकेतु व लव)

राम—

पद— (अष्टमीचा चंद्र०)

हे दिवाकरवंशचंद्रा ! चंद्रकेतो ! नंदना !।
ये उदारा ! सत्वरी मज गाढ दे आलिंगना ॥ ध्रु० ॥
करुनि तव हीमशकलशीतल कोमलांगस्पर्शना ।
शमुनि जावो ताप सारा कांपवी जो मन्मना ॥ १ ॥

चंद्रकेतु—आर्य ! मी अभिवंदन करितों.

राम—(त्यास उठवून प्रेमानें आलिंगून) वत्सा ! दिव्यास्त्रधारी असा तूं खुशाल आहेस ना ?

चंद्रकेतु—या अत्यद्भुत पराक्रमी व प्रियदर्शन अशा लवाच्या अभ्युद-

यानें मी खुशाल आहें. मजवर जशी वडिलांची कृपादृष्टि आहे, तिजहूनही अधिक कृपादृष्टीनें या महावीराकडे अवलोकन करावें, अशी प्रार्थना आहे.

राम—(लवास पाहून) खरेंच हा तुझा मित्र लव फारच रमणीयाकृति आहे. अहाहा !

पद—(सुंदर रमणी दर्शन०)

पाळाया जन मूर्त धनुर्धर धनुर्वेद जणुं हा झाला।
रक्षाया द्विज सदेह उदया क्षात्रधर्म कीं हा आला ॥ ध्रु० ॥
सामर्थ्याचा संघ, गुणाचा संचय अथवा समजूं याला।
किंवा त्रिजगत्पुण्यराशि हा स्वीकारी या रूपाला ॥ १ ॥

लव—(मनांत) खरोखर हा कोणी तरी मोठा पुण्यवान आणि महाप्रतापी पुरुष आहे.

पद—(तें डेरेकारनु मेंडेरे०)

प्रीति भक्ति शांतिधर्म हा ! नरवर जणुं मूर्त पहा ॥ ध्रु० ॥
शमला सगळा विरोध मनिंचा। सुखद शांत रस भरला ॥ १ ॥
विरलें, न भलें उद्धतपण तें। विनय नम्र करि मजला ॥ २ ॥
बघुनी नयनीं या परवशता। अशि ये मम हृत्कमला ॥
प्रीति भक्ति शांति धर्म हा ॥ ३ ॥

अथवा सत्तीर्थें आणि सत्पुरुष यांचा प्रभावच हा कीं, त्यांच्या दर्शनानें चित्तवृत्ति पालटून जावयाचीच.

राम—(मनांत) पण हा कुमार एकाएकीं दुःखाचा विसर पाडून माझ्या अंतःकरणांत स्नेह उत्पन्न करीत आहे, याचें कारण काय असावें बरें ? अथवा स्नेहाला कारणाची अपेक्षाच नसते.

दिंडी—(दादरा.)

वस्तु संयोगा गुप्त हेतु कांहीं।
बाह्यसंबंधें प्रीति जडत नाहीं।
कमल विकसे भानुचा उदय होतां।
चंद्रकांता द्रव सुटे चंद्र येतां ॥ १ ॥

लव—चंद्रकेतो! हे कोण बरें?

चंद्रकेतु—प्रियमित्रा! हे आमचे वडील आहेत.

लव—तूं मला आपला प्रियमित्र असें ह्मटलेंस, त्याअर्थी धर्मन्यायानें हे मलाही वडीलच होत. पण तुह्मांला वडील असे रामायणकथेंत चौघे पुरुष सांगितले आहेत, त्यांपैकीं हे कोण?

चंद्रकेतु—सर्वांत वडील ते हे.

लव—काय हे रघुनाथ? वाहवा! आजचा हा मोठा भाग्याचा दिवस उगवला! (रामास नम्रतेनें व कौतुकानें पाहून) हा मी वाल्मीकिमुनींचा शिष्य लव आपणास अभिवंदन करितों.

राम—(स्नेहभावानें) वत्सा, आयुष्मान् हो. ये असा इकडे मजजवळ ये. (त्यास प्रेमानें आलिंगून) अरे!

पद—(अर्धांगीकृत नारि०)

विनय पुरे हा गाढालिंगन दे मज वारंवार॥ ध्रु० ॥
लाजवितो स्फुटपंकजगर्भा तैसा बहु सुकुमार।
स्पर्श तुझा विधुचंदनसम जो शीतल सुखकर फार॥ १ ॥

लव—(मनांत) यांचा मजवर असा हा निष्कारण सहज स्नेह असतां म्यां मूर्खानें यांच्याशीं वृथा द्रोह केला, हें फार वाईट झालें! अथवा शस्त्राचा गुणच हा, कीं तें हातीं धरलें ह्मणजे विरोधच उत्पन्न व्हावा! असो. (उघड) महाराज माझ्या पोरपणाबद्दल मला क्षमा असावी.

राम—पण बाळा! तूं असा अपराध तरी काय केला आहेस?

चंद्रकेतु—मी सांगतों. अश्वरक्षकांच्या तोंडून आपल्या प्रतापाचें वर्णन ऐकून ईर्ष्येनें यानें थोडा वेळ किती तरी पराक्रम दाखविला.

राम—अरे, हें तर क्षत्रियांना भूषण आहे! यांत अपराध कशाचा?

पद—(नच सुंदरि०)

तेजस्वी जो आहे। परतेज कसा साहे?।
हा तन्नैसर्गिक गुण लोपे न कदा पाहें॥ ध्रु० ॥
किरणांहीं खरतर अति। तापुनि ये नभिं दिनपति।
रविकांत मण्यावरती। तत्कर तैं जरि पडती।

करितो अंतरिं गणती । कीं हो धिःकृतिं निज ती ।
प्रकटवि अपुलें तेजहि अनलासम लवलाहें ॥ १ ॥

चंद्रकेतु—महाराज ! आणखी क्रोध झाला तरी तो असल्याच वीराला शोभतो. तें पहा, यानें सोडलेल्या जृंभकास्त्रानें आपलें सर्व सैन्य स्तब्ध व निश्चल झालें आहे.

राम—वत्सा लवा ! आपल्या अस्त्राचा समारोप कर बरें. बाळा चंद्रकेतो, तूंही जाऊन, निश्चेष्ट झाल्यामुळें गोंधळून गेलेल्या सर्व सैन्याचें समाधान कर.

चंद्रकेतु—जशी आज्ञा. (जातो.)

लव—अस्त्र शांत झालें महाराज, तें पहा.

राम—अरे वाः ! या दिव्य जृंभकास्त्राचा प्रयोग आणि उपसंहार दोन्हीं तुला अवगत आहेत, पण हीं अस्त्रें तुला कशीं प्राप्त झालीं सांग बरें ?

लव—आह्मां दोघांना हीं जन्मतःच प्राप्त झालीं आहेत.

राम—(विचार करून) हा कदाचित् महत्पुण्याचरणाचे फलाचाही महिमा असेल. बरें पण कायरे, 'दोघांना' ह्मटलेंस, तर दोघे ते कोण ?

लव—आह्मी दोघे जुळे बंधु आहोंत.

राम—मग दुसरा कुठें आहे ?

(पडद्यांत)—'भांडायना, अरे भांडायना, कोणा सार्वभौम राजाच्या सैन्याशीं लवाचें युद्ध चाललें आहे असें ऐकतों तें खरें कायरे ?'

राम—कोण बरें हा असें बोलतो ?

लव—हाच तो माझा वडील बंधु कुश—भरताश्रमाहून परत आला वाटतें.

राम—जा जा, तर त्याला इकडे घेऊन ये.

लव—आज्ञा. पण इथें उन्हाचा ताप प्रखर आहे, तर तोंपर्यंत आपण त्या सालवृक्षाच्या छायेंत विश्रांति घ्यावी.

राम—बरें आहे, जशी तुझी इच्छा. (लव जातो.)

कुश—(पडद्यांत)—

पद—(भूप-धमार.)

सूर्यवंशांतील नृपति प्रमुख त्यांशीं संगरीं ।
युद्ध चाले भाग्यराशी केवढा अमुचा तरी ॥

होय धनुची धारणा कीं सफल केवळ आज ही।
पात्र होऊं क्षत्रियांच्या खास अह्मि कीर्तीसही ॥ १ ॥

राम—वाहवा ! या क्षत्रिय बालकाचे ठिकाणीं केवढें हें पौरुष !!

पद—(पिलु–त्रिवट)

त्रिभुवन ज्याला वाटतें। अपुल्या पुढें तुच्छ बहु तें ॥ ध्रु० ॥
रणदर्प कीं मूर्त तो वीररस हा। बालरूपें दावी गुरुते ॥ १ ॥

(वृक्षाखालीं छायेंत जाऊन बसतो. कुश लव प्र० करितात.)

लव—दादांचा विजय असो.

कुश—तुझेंही क्षेम असो. पण कायरे, ही युद्ध युद्ध ह्मणून काय वार्ता उठली आहे ?

लव—हो तसें कांहीं झालें होतें खरें. पण दादा ! आतां हा उद्दामपणा सोडून देऊन इथें विनयानेंच वागलें पाहिजे.

कुश—तें कां बरें ?

लव—इथें रामचंद्र आला आहे. तो आपणांवर अतिशय प्रेम दाखवितो, आणि तुमच्या भेटीकरितां फार उत्कंठित झाला आहे.

कुश—ह्मणजे रामयणकथेंतील मुख्य पुरुष व ब्राह्मणांचा रक्षणकर्ता तोच ना ?

लव—होय तोच.

कुश—तो महात्मा वंदनीय, विख्यात व पुण्यदर्शन असा आहे खरा; पण आपण त्याच्याकडे जाऊन कोणत्या नात्यानें वागावें बरें ?

लव—पित्याप्रमाणें त्याचा गौरव केला पाहिजे.

कुश—असें काय ह्मणून ? तो काय आपला पिता आहे ?

लव—पिता नसला तरी उर्मिलेचा पुत्र चंद्रकेतु हा फार उदार मनाचा मुलगा आहे. तो माझ्याशीं सख्यत्वानें प्रियमित्रासारखा वागतो, तेव्हां त्याच्या संबंधानें तो राजर्षि आपलाही धर्मपिता मानायला काय हरकत आहे ?

कुश—एकूण अशा त्या क्षत्रियाशीं आज नम्रत्वानें वागण्याचा प्रसंग आला तर ! बरें असो, चल जाऊं त्याच्याकडे.

लव—(रामाकडे जाऊन) दादा ! हा पहा तो थोर पुरुष–बाह्य आकारावरूनच त्याच्या गांभिर्याचें व थोरपणाचें अनुमान होतें, आणि त्याच्या अनेक लोकोत्तर चरितांचा संभवनीयपणा लक्षांत येतो.

कुश—(निरखून पाहून) अहाहा ! खरें आहे.

साकी—(धुमाळी.)

प्रभाव शुद्ध प्रसन्नता ही किति तरी रूपीं याच्या ।
योग्य स्थानीं प्रवर्तली ती रामायणकविवाचा ॥
खचित खचित पाहीं । शंका यांत मुळीं नाहीं ॥ १ ॥

(जवळ जाऊन नम्रपणानें) तात ! हा वाल्मीकि मुनींचा शिष्य कुश आपल्याला अभिवंदन करितो.

राम—वत्सा ! दीर्घायु हो. असा इकडे येऊन मला गाढ आलिंगन दे. (त्यास आलिंगून मनांत) हा बाळ माझेंच अपत्य असेल काय ? अहाहा ! याच्या या आलिंगनाबरोबर माझ्या सर्व शरीरावर अमृतप्रवाहाचें जणों सिंचन होतें आहे ! आणि माझ्या प्रत्येक अवयवांतून स्नेहाचा सार निघून त्यापासून हा बनला आहे, किंवा चैतन्याचा रस बाहेर पडून मूर्तिमंत पुढें उभा आहे, असें वाटूं लागलें आहे ! (उघड) बाळांनो ! बसा खालीं बसा.

लव—आपणही बसावें महाराज. (सर्व खालीं बसतात.)

राम—(मनांत) हीं दोन्हीं मुलें माझ्याशीं फार नम्रतेनें वागतात; तथापि यांचें चालणें, उभें राहणें व बसणें इत्यादि सभ्य प्रकार पाहून यांच्या अंगीं साम्राज्यपदाची साहजिक योग्यता दिसते. पहा, यांचीं शरीरें इतकीं सुंदर आहेत कीं, त्यांना दुसऱ्या कोणत्याही साधनांनीं शोभा आणण्याची मुळींच जरूर नाहीं. त्यामुळें प्रत्येक मनुष्याला दिसल्याबरोबर हे आवडणारे आहेत. स्वच्छ रत्नाला उपजत उत्तम तेजानें अथवा फुललेल्या कमलाला मकरंदबिंदूंनीं सहज शोभा येते, तद्वत् यांची स्थिती आहे. खरोखर रघुकुलोत्पन्न कुमारांची यांच्यावर बरीच छाया दिसते. कपोतकंठासारखा नीलवर्ण, सुघटित असे शरीरावयव, प्रसन्न सिंहाप्रमाणें थोर दृष्टि आणि मृदंगासारखी मधुर व गंभीर वाणी, यांवरून दुसरी कल्पनाच होत नाहीं. अधिकाधिक निरखून पाहिलें असतां, केवळ माझ्यासारखीच यांची आकृति आहे असें नाहीं, तर माझ्या प्रियेच्या आंगच्याही बऱ्याच गोष्टी यांच्यांत दिसून येतात. तें प्रफुल्ल मुखकमल, ती शुभ्र दंतपंक्ति, तो ओठांचा आकार, ते नेत्र, ते कर्ण इत्यादि हुबेहूब तिच्याच प्रमाणें आहेत. तिला नेऊन सोडून दिलेलें अरण्यही हेंच, आणि या मुलांची रूपाकृति अशा प्रकारची. त्यांतून यांना जन्मतःच जृंभकास्त्रें प्राप्त झालीं आहेत. कदाचित् त्या

चित्रदर्शनप्रसंगींचा तो आशिर्वाद सफल झाला असेल. कोणालाही गुरुसंप्रदायावांचून त्या अस्त्रांची प्राप्ति झाल्याचें माझ्या ऐकिवांत नाहीं. यांच्या या भेटीमुळें माझा अंतरात्मा सुखसागरांत जणों तरंगत आहे, अशी अवस्था मला प्राप्त झाली आहे. सीता गर्भिणी होती त्यावेळीं तिला दोन मुलें होतील असें मीं बळकट अनुमानही केलें होतें. तेव्हां हा काय योग आहे ? (डोळ्यांत पाणी आणून)

पद—(कांते फार तुला०)

प्रेमा बालपणापासोनी मजवरती सखिचा । तेणें घडला अधिकाधिकची स्वाभाविक मज सहवास तिचा ॥ ध्रु० ॥ एकांतीं जरि ती अति लाजे । स्पर्शुनि आधीं मींच जाणिला । द्विविध गर्भ तो बहु दिवसांनीं झाला पुढतीं तिज ओळखिचा ॥ प्रेमा बालपणापासो०॥ १ ॥

यांना कांहीं तरी उपायानें मी स्पष्ट विचारूं का ? (असें ह्मणून रडूं लागतो.)

लव—हां हां महाराज ! हें काय ? असें रुदन काय ह्मणून ?

कुश—अरे, हें काय वेड्यासारखें विचारावें ?—

पद—(बघुनि त्या भयंकर०)

जानकीविना रायातें कोणतें दुःख तें नाहीं ।
जग सारें प्रियाविनाशें वन शून्य तयातें पाहीं ॥ १॥
निरवधि स्नेह उभयांचा जाहला वियोगहि तैसा ।
तें शिकुनी रामायण तूं यापरि विचारिसि कैसा ॥ २ ॥

राम—(मनांत) हाय हाय ! आतां तर भाषणच कुंठित झालें. प्रश्न करण्याचें कारणच उरलें नाहीं. हे दग्ध हृदया ! एकाएकीं तुला काय हा चमत्कारिक विकार झाला ? तूं असें धैर्य सोडल्यामुळें हीं मुलेंदेखील माझी कींव करूं लागलीं. असो, आतां हा दुःखावेग आंवरून धरला पाहिजे. (उघड) मुलांनो ! भगवान् वाल्मीकिऋषींनीं सूर्यवंशाच्या वर्णनपर–आपल्या वाणीचें सारच असें रामायणकाव्य रचलें आहे, ह्मणून ऐकतों. त्यांतील कांहीं भाग तुमच्या तोंडून श्रवण करावा अशी फार इच्छा आहे. तुह्मांला ह्मणतां येतें का ?

कुश—तें सर्वच काव्य आह्मी पढलों आहों. त्यांतील बालकांडाच्या शेवटच्या अध्यायांतील दोनच पद्यें आतां मला आठवतात.

राम—कोणतीं तीं ह्मण पाहूं.

कुश—

पद—(अशुभ दिसतें०)

सहज जरि ती । प्रिय सती । रघुपतिसि जनकजा निश्चिता ॥ ध्रु०॥
तें स्वगुणें । प्रेम दुणें । निज पतिचें मिळवी गुणवती ॥ १ ॥
प्रिय तिज रामही असुहृनि झाला । तत्प्रेमाच्या योगाला ।
तीं त्याचिंच हृदयें जाणती ॥ २ ॥

राम—(मनांत) हाय हाय ! हा हृदयभेद करणारा आघात कितीतरी दारुण आहे ! हे देवि सीते ! त्यावेळीं तुझें माझें प्रेम असें होतें खरेंच ! या संसारांतील निष्कारण विपर्यास, उद्विग्नता व शेवटीं दुःख देणाऱ्या गत गोष्टींनीं कोणाला ताप झाला नाहीं ? धिःकार असो त्यांना !

पद—(जाते कीं मम०)

तेव्हांचा तो मोद आपुला कोठें मावळला ।
प्रेमातिशयें एकांतीं दिनरजनी वाढविला ॥ १॥
यत्न अह्मीं जे केले निर्भर कौतुकरस गेले ।
सुख दुःखींचें ऐक्यहि दैवें सर्व कुठें नेलें ॥ २ ॥
व्याकुळ पापी क्षणोक्षणीं हा जीव असा पाहीं ।
तरिही अजुनी विराम याचा होत कसा नाहीं ॥ ३ ॥

अरेरे ! प्रियेच्या सहस्रशः गुणांचें आविष्करण करणारा ह्मणून स्मरण होण्यालाही दुर्धर असा जो एक आमचा काल गेला, त्याचेंच यावेळीं मला हें स्मरण दिलें. त्याकाळीं--

दिंडी—(दादरा.)

दिसंदिस जैसा तरुणपणा आला ।
मृगाक्षीस्तन विस्तार सुरू झाला ॥
वयोवस्थेचा मान बघुनि काम ।
शिरुनि मनिं, देहीं करी गुप्त धाम ॥ १ ॥

लव—मला एक पद्य आठवतें आहे. त्यांत मंदाकिनी व चित्रकूट यांच्या जवळील वनांत विहार करीत असतांना रामचंद्रानें सीतादेवीला उद्देशून ह्मटलें आहे कीं,

पद—(मोहे काननमें०)

सखि ! मांडियला तुजसाठीं शिलामंचक हा येथ महा ॥ ध्रु० ॥
सभोंवार ही बकुलद्रुमसुमवृष्टि पहा ॥ सखि मां० ॥ १ ॥

राम—(लज्जा, स्नेह व खेदयुक्त होऊन मनांत) हा मुलगा अगदींच भोळा त्यांतून अरण्यांत राहणारा; त्यामुळें केव्हां कसें बोलावें हें याला कोठून समजणार ? हा देवि सीते ! तो प्रदेश व त्या काळच्या त्या प्रेमातिशयाच्या गोष्टी तुला आठवतात काय ? हाय हाय कोण कष्टकारक प्रसंग हा !

पद–(सखे शशिवदने०)

सखे तव मुख तें । मज दिसत लोचनां पुढतिं मनोहर
फार ॥ ध्रु० ॥ जाई भिजुनी जें श्रमसलिलें । केश ल-
लाटीं येऊनि अनिलें । चंद्रद्युति हरणार ॥ सखे० ॥ १ ॥
नसतां कुंकुम विशाल भालीं । कर्णीं भूषण रागहि गालीं ।
सुरुची जें वरणार ॥ २ ॥

अरेरे ! काय सांगूं !

पद—(जननि जनक विरह०)

ध्यान जिचें सतत सखी मूर्ति हृदयिं येई ।
विरहांतहि भेट अशी समाधान सुख देई ॥ ध्रु० ॥
पुनरपि मन उपरमतां जगज्जीर्ण वन गमतें !
दीप्त हुताशनिं हें मम हृदय दग्ध जणुं होई ॥ १ ॥

(पडद्यांत)

" भांडायना ! अरे भांडायना ! लवानें युद्ध मांडल्याचा वृत्तांत ऐकून भीतीनें आश्रमांतून वसिष्ठ, वाल्मीकि, अरुंधती, कौसल्यादि राजमाता व जनकराजर्षि इत्यादि वृद्ध मंडळी–त्यांच्यानें चालवत नाहीं तरी मोठ्या कष्टानें हळूहळू संग्राम-स्थानाकडे जायला निघाली आहे, ती पहा."

राम—काय ! भगवान् वसिष्ठ व अरुंधती ! आणि जनक व मातोश्रीही येथेंच आहेत ! त्यांना यावेळीं भेटणें मोठेंच कष्टकारक आहे ! (करुणायुक्त होऊन) हाय हाय ! दैवगतीनें जनकही येथेंच आलेले ऐकून तर खरोखर मः अभाग्यावर जसा वज्रपात होतो आहे.

पद—(प्रिये पहा रात्रींचा०)

सखा असुनि पितयाचा व्याहीही जो पुढतीं जाहला ॥ ध्रु० ॥
मंगलमय त्या कालीं । भेट मला जी झाली ॥
त्यावरि हें कर्म करुनि पाहुं कसा आज त्याजला ॥ १ ॥
न कसें दर्शन याचें । शतधा भेदिल साचें ॥
दुष्कर वा काय असे निर्दय हा राम याजला ॥ सखा० ॥ २ ॥

(पुन्हा पडद्यांत)

'अरेरे ! रामचंद्राच्या शरीरावर केवळ मोठेपणाची थोरवी दाखविणारी कांति मात्र अवशिष्ट राहिलेली एकदम पाहून जनकाला मूर्छा आली! तो सावध होतो न होतो तोंच ही स्थिति पाहून रामाच्या माताही मूर्छित झाल्या आहेत."

राम—(मनांत) हे जनकराजर्षे ! अहो मातांनो ! मला पाप्याला पाहून तुमच्या हृदयांत इतकी करुणा कशाला आली ? मी दुष्ट तुमच्या करुणेला पात्र नाहीं.

पद—(भैरवी–त्रिवट.)

मंगल जें रघुजनक कुलांचें ।
अथवा सुकृतलतासुम साचें ॥ ध्रु० ॥
लेश न त्याची करुणा ज्याला ।
पाहुनियां मज त्या अघमाला ।
व्यर्थ होतसे दुःख तुह्मांला ।
दर्शन हें मनिं जाचे ॥ मंगल० ॥ १ ॥

असो, पण आतां त्यांच्याकडे जाऊन त्यांचा समाचार घेतलाच पाहिजे. (उठून उघड) बाळांनो चला, आपण त्यांना जाऊन भेटूं या.

लव--(पुढें होऊन) असें इकडून यावें महाराज. (जातात.)

[**अंक ४ था समाप्त.**]

अंक ५ वा.

प्रवेश पहिला.

(लक्ष्मण प्रवेश करितो.)

लक्ष्मण—(स्वत:शीं) भगवान् वाल्मिकिऋषींनीं जें एक अभिनव सुंदर नाटक रचिलें आहे, त्याचा अप्सरांकडून होणारा प्रयोग पाहण्याकरितां त्यांनीं आह्मांसह सर्व ब्राह्मक्षत्रियादिक पौरजानपद यांना बोलावून आणिलें, व आपल्या तप:सामर्थ्यानें देव, दैत्य, नाग, पक्ष, किन्नर–फार काय स्थावर-जंगमात्मक सर्व प्राणिवर्गही एकत्र जमविला. तेव्हां या गंगातीरावरील रंग-भूमीवर त्या सर्व समाजाची नीट बसण्याची व्यवस्था करण्यासाठीं आमचे दादा आर्य रामचंद्र यांनीं मला आज्ञा केली; त्याप्रमाणें मीं देव, दैत्य, मानवादिक सर्वत्रांना यथायोग्य स्थानीं बसविण्याची व्यवस्था केली आहे. आतां दादांच्या येण्याचाच काय तो अवकाश आहे. ते आले कीं नाटकप्रयोगाला सुरवात झालीच. पण हे पहा, ते आलेच.

पद—(भाषण किति मधुर०)

राज्याश्रमवास करुनि भोगिती श्रमास जरी ।
पाळिती मुनिव्रत जे साहुनि बहु कष्ट तरी ॥ ध्रु० ॥
द्यावयास गौरवास वाल्मिकीस केवल ते ।
आले हे आर्य रामचंद्र रंगभूमिवरी ॥ राज्या० ॥ १ ॥

(राम प्रवेश करितो.)

राम—लक्ष्मणा ! प्रेक्षकजन सर्व आपआपल्या जागीं नीट बसले का ?

लक्ष्मण—होय, ते केव्हांच बसले. फक्त आपल्याच येण्याची कायती खोटी होती.

राम—बरें, हे दोघे कुमार कुश व लव यांना वत्स चंद्रकेतूप्रमाणेंच चांगली योग्य जागा द्यावी.

लक्ष्मण—दादांच्या स्नेहाचा रोख पाहून मीं आधींच तसें केलें आहे. हें राजासन मांडलें आहे, यावर आपण बसावें.

(सर्वजण आपापल्या जागीं बसतात.)

राम--हं, चालूंद्या आतां तुमचें नाटक.

सूत्रधार—(प्रवेश करून) सूज्ञ प्रेक्षक जनहो ! त्रिकालज्ञ भगवान् वाल्मीकिमुनि यांची सर्व स्थावरजंगमात्मक जगाला अशी आज्ञा आहे कीं, आह्मीं दिव्य दृष्टीनें पाहून जें पावन करून आह्मीं अद्भुत रसांनीं युक्त असें दृश्य काव्य–नाटक रचिलें आहे, तें सर्वत्रांनीं कार्यगौरवास्तव लक्षपूर्वक अवलोकन करावें.

राम—(स्वत:शीं) खरें आहे. महर्षी हे दिव्य ज्ञानानें सर्व गोष्टी प्रत्यक्ष पहात असतात. अमृतासारखीं त्यांचीं गोड वचनें अज्ञानाचा नाश करून दिव्य प्रकाश—अर्थात् खऱ्या गोष्टीचा अनुभव करून देतात. तेव्हां त्यांत खोटें असेल अशी शंका देखील घ्यावयाला नको.

(पडद्यांत)

पद—(धरिसी कां कोप०)

किति तरि अजि मी हतभागिनी । पडलें विजनीं घनिं या वनीं ।
साह्य न मजला कुणी । उरलें सा० ॥ ध्रु० ॥
तो प्रसवकाल मम आला । वेणांचा ताप जहाला ।
टपतात पशुहि खायाला । कोण समय याहुनि ।
दुर्धर कोण समय० ॥ १ ॥ करूं काय उपाय न उरला ।
दृढ निश्चय अंतरिं ठरला । या जान्हविच्या जलिं विमला ।
देतें तनु लोटुनी । ममही देतें तनु लो० ॥ २ ॥

लक्ष्मण—(मनांत) हाय हाय ! काय कष्ट हे ! ही विपरीतच गोष्ट कानीं येत आहे.

सूत्रधार—

साकी—(धुमाळी.)

त्यागियली भूकन्या रामें घोरवनीं सीता जी ।
ती प्रसवाच्या दुःखें लोटी स्वतनू गंगेमाजी ॥ १ ॥

(निघून जातो.)

राम—(लक्ष न दिलेंसें करून) हाय हाय ! हे देवि ! दंडकारण्यवास ! प्रिय सखि ! या निर्दय रामामुळें तुजवर असा दुर्दैवाचा घाला पडला ना ?

लक्ष्मण—दादा ! असें काय करितां ? या नाटकांत संविधानकाची रचना कशी आहे ती पहा तर आधीं.

राम—होय, हा वज्रहृदयी राम त्याही गोष्टीला सिद्धच आहे.

(इतक्यांत गंगा व पृथ्वी कडेवर एकेक मूल घेऊन सीतेसह येतात.)

राम—लक्ष्मणा ! मला एकाएकीं अविज्ञातपूर्व व विलक्षण अंधकारांत पडल्यासारखें होत आहे, तर मला नीट सांवरून धर.

गंगा--मुली ! स्वस्थ रहा, असें दुःख करूं नको. दैवानें तुझें कल्याण केलें आहे. जलांत असतांना रघुवंश पुढें चालविणारे असे हे दोन पुत्र तूं प्रसवली आहेस.

सीता—(शुद्धीवर येऊन) काय मी दोन मुलें प्रसवलें आहें ? बरें झालें. पण प्राणनाथ कुठें आहेत ? हा प्राणनाथ ! (मूर्छित होते.)

लक्ष्मण--(रामाचे पायांवर मस्तक ठेवून) दादा ! फारच उत्तम गोष्ट झाली ! रघुवंशाला कल्याणकारक अंकुर फुटले. (रामाच्या मुखाकडे पाहून) अरेरे ! दादांच्या डोळ्यांतून तर अश्रूंचे लोट चालले आहेत. हे अगदीं मोहित झाले असें वाटतें. (वारा घालीत.) दादा ! सावध व्हा.

पृथ्वी--बाळे ! स्वस्थ हो, स्वस्थ हो.

सीता—(सावध होऊन) भगवति ! आपण कोण आहां ? आणि या कोण ? दूर व्हा, सोडा मला.

पृथ्वी--ही तुझी सासरची कुलदेवता भागीरथी.

सीता--देवि ! आपणाला माझा नमस्कार असो.

गंगा—मुली ! पातिव्रत्यानें संपादित आणि लोकमान्य अशी कल्याण संपदा तुला अखंड प्राप्त होवो.

लक्ष्मण—हा आह्मांवर मोठा अनुग्रहच आहे.

गंगा—बाळे ! ही तुझी माता वसुंधरा बरें.

सीता--(डोळ्यांत पाणी आणून) हाय हाय ! माते ! मी तुला अशा स्थितींत दिसावें ना ?

पृथ्वी--मुली ! अशी इकडे माझ्या जवळ ये (तिला आलिंगून मूर्छित होते.)

सीता--(लाजून डोळ्यांत पाणी आणून) अथवा आपण ह्मणतां तेंही खरेंच.

राम—माते वसुंधरे ! मी तसाच आहें खरा.

गंगा—वसुंधराबाई ! आपण या चराचर विश्वाचें शरीर असून, अजाणत्याप्रमाणें आपल्या जांवयावर विनाकारण कां रागावतां ? त्याच्याकडे काय दोष आहे ? सीतेविषयीं लोकांत जी भयंकर अपकीर्ति पसरली ती त्याला कशी सहन व्हावी ? तिकडे लंकाद्विपांत जी अग्निशुद्धि झाली तिजवर इकडील लोकांचा विश्वास तरी कसा बसणार ? सर्व प्रकारें प्रजेला संतुष्ट राखणें हेंच इक्ष्वाकुवंशीयांचें कुलव्रत, आणि तें बिनबोभाट चालविणें किती कठिण आहे ? तेव्हां अशा स्थितींत बिचाऱ्या रामभद्रानें काय करणें योग्य होतें तें तुह्मीच सांगा.

लक्ष्मण—सर्वांमध्यें देवतांना प्राणिमात्रांच्या अंतःकरणांतील गोष्टी अगदीं अव्याहत व स्पष्ट कळतात. त्यांतही विशेषतः गंगादेवीला. देवि ! नमस्कार असो.

राम—अंबे ! भगीरथाच्या कुलावर आपला सारखा प्रसाद चालू आहे. तदनुरूपच हें आपलें भाषण व वर्तन आहे.

पृथ्वी—भागीरथीबाई ! मी सर्वदां आपणा सर्वांविषयीं प्रसन्नच असतें, पण काय करूं ? स्वाभाविक स्नेहातिशयाच्या योगानें माझ्या मुखावाटे असें निघालें. रामभद्राचा सीताविषयक खरा स्नेह मी जाणत नाहीं असें नाहीं. त्याचें अंतःकरण कसें सारखें पोळतें आहे ! दुर्दैवामुळेंच त्याला तिला सोडावें लागलें. तो आजवर जिवंत आहे तो तरी आपल्या लोकोत्तर धैर्यानें व प्रजेच्या अपूर्व पुण्याईमुळेंच ह्मटलें पाहिजे.

राम—वडील माणसें मुलांविषयीं नेहमीं अशींच सकरुण असतात.

सीता—(रडत हात जोडून) माते ! यावेळीं मला आपल्या उदरांत ठाव मिळेल तर बरें होईल.

राम—(वाईट वाटून) खरेंच, यावेळीं इनें दुसरें काय ह्मणावें ?

गंगा--भलतेंच एखादें ! असें अमंगळ बोलूं नये. हजार वर्षेपर्यंत तूं खुशाल आनंदांत रहा.

पृथ्वी--बाळे ! तुझ्या मुलाचें रक्षण व्हायला नको का ?

सीता--मी अनाथ झालें आहें. मला मुलें घेऊन काय करायचीं आहेत ?

राम—हे हताश हृदया! तूं खरोखर वज्रमय आहेस, ह्मणूनच हें हिचें बोलणें ऐकून विदीर्ण होत नाहींस!

गंगा--मुली! तूं सनाथ असून आपल्याला अनाथ कां ह्मणतेस!

सीता—या अभागिनीला आतां सनाथपण तें कसचें उरलें आहे?

गंगा—छे: छे:, तूं आपल्याला तुच्छ मानतेस हें बरें नाहीं.

पद--(अनीति अनुसरितो०)

मंगल आत्मा जो त्रिजगाला। अवमानिसि कां त्याला॥
॥ मंगल०॥ ध्रु०॥ तव संगें ती बहु आली गे। पावनता
आह्मांला॥ मंगल आत्मा जो ०॥ १ ॥

लक्ष्मण--दादा! ऐकलें ना?

राम—अरे, मी काय ऐकून करणार? सर्व लोक ऐकूं देत ह्मणजे झालें. पण एकाएकीं चोंहींकडे लखलखाट झाला हें काय! ही कांहीं तरी आश्चर्याची गोष्ट आहे.

सीता—अगबाई! ही अंतरिक्षांत दाटी कशाची झाली बरें!

गंगा—हां समजलें, कृशाश्व, कौशिक व राम अशी गुरुपरंपरा असलेलीं ही जृंभकास्त्रें आणि त्यांच्यासह सर्व शस्त्रास्त्रें आविर्भूत झालीं आहेत.

(पडद्यांत)

आर्या

देवि नमस्ते सीते आह्मां गति पुत्र हे तुझे जाण।
तुज चित्रदर्शनीं जें वदला श्रीराम तें मनीं आण॥ १॥

सीता—या अस्त्रदेवता प्रगट होऊन प्रसाद करीत आहेत हें आमचें मोठें भाग्यच होय.

लक्ष्मण—दादा! आपण त्यावेळीं वहिनीला बोललां होतां खरें कीं हीं अस्त्रें आतां तुझ्या पुत्रांना सर्व प्रकारें प्राप्त होतील.

गंगा व पृथ्वी—(अस्त्रदेवतांस)

पद—(हो परम लाभ हा०)

हें नमन तुह्मांतें। परमास्त्रांतें॥ ध्रु०॥
तुमच्या अनुग्रहें आली किती तरी।
कृतार्थता अह्मांतें॥ नमन०॥ १॥

करितील हीं मुलें तुमची स्मृती पदा।
सहाय्य व्हा तयातें ॥ नमन० ॥ २ ॥
कल्याण कीं सदा तुमचें असो अतां ।
स्वकीय जा स्थलातें ॥ नमन० ॥ ३ ॥

राम—यावेळीं विस्मय व आनंद यांच्या सम्मेलनानें जर्जरित अशा दुःख-सागराच्या खवळून गेलेल्या लाटा माझ्या मनाची कशी अवर्णनीय दशा करीत आहेत.

गंगा—वत्से जानकि, हे तुझे पुत्र प्रत्यक्ष रामभद्रासारखे महासमर्थ झाले, याचा तूं आनंद मान बरें.

सीता—तें खरें, पण यांचे क्षत्रियोचित संस्कार आतां कोण करणार ?

राम—(मनांत) हाय हाय ! काय दैव हें ?

पद—(पूर्वी अधरोष्ठावरि०)

केलें संतत वसिष्ठगुरुंनीं संरक्षण ज्याचें ।
जिच्यामुळें अभिवर्धन झालें त्या रघुवंशाचें ।
ती ही सीता मनीं पावते कष्ट किती साचे ।
न मिळे इजला संस्कारास्तव कोणी स्वसुतांचे ॥ १ ॥

पृथ्वी—बाळे ! तुला याची काळजी कशाला ? या मुलांचें पिणें सुटून हे अंमळ मोठे झाले कीं यांना वाल्मीकि मुनींच्या स्वाधीन करूं. ते यांचे क्षत्रियोचित सर्व संस्कार करितील.

गंगा—शिवाय वशिष्ठ अंगिरा मुनीप्रमाणें वाल्मीकिही परमश्रेष्ठ व जनक आणि रघुकुलांचे परमगुरु आहेत. तेव्हां त्यांनीं संस्कार केले असतां वशिष्ठांनीं केल्यासारखेंच होईल.

राम—देवींनीं केलेली ही योजना फार चांगली आहे.

लक्ष्मण—दादा ! खरेंच सांगतों, या सर्व गोष्टींचा विचार केला असतां मला वाटतें कीं, हे कुशलवच वहिनींचे मुलगे असावेत. दोघेही जन्मतः अस्त्र-सिद्धि पावलेले–वाल्मिकि मुनींनीं यथोचित संस्कार केलेले आणि वयानेंही बारा वर्षांचे आहेत.

राम--मी तरी याच विचारानें जसा अगदीं आनंदसागरांत बुडून मूढ झालों आहें.

पृथ्वी--मुली चल माझ्याबरोबर. आपण रसातलांत जाऊंया.

राम--हाय हाय ! प्रिये ! एकून तूं लोकांतराला चाललीस ना ?

सीता--माते ! मला तूं आपल्या उदरांत लीन करून सोड. या संसारांतलीं हीं असह्य दुःखें माझ्यानें आतां सहन करवत नाहींत.

पृथ्वी--बाळे ! या मुलांचें पिणें सुटेपर्यंत मी सांगतें तसें ऐक. मग पुढें जसें तुझ्या मनाला येईल तसें कर.

गंगा--होय, माझेंही ह्मणणें असेंच आहे.

(गंगा, पृथ्वी व सीता निघून जातात.)

राम--काय ! शेवटीं वैदेहीचा विलयच झाला ? हाय हाय !

पद-(सुटत बहुत कंप०)

प्राणसखे हे देवी सीते । दंडकविपिनवाससुखदा-
यिनी । सहचरि जनककुमरि शुभचरिते ॥ ध्रु० ॥ हत
दैवी या निर्दय रामा । त्यजुनि जासि कशि लोकांतरीं
तें ॥ प्राणसखे हे देवि० ॥ १ ॥

(मूर्छित होतो.)

लक्ष्मण—भगवंता वाल्मीके ! कृपा करा आतां. असाच का आपल्या काव्याचा परिणाम आहे ? तर नको हें पाहणें. दादा अगदीं मूर्छित झाले आहेत.

(पडद्यांत)

"पुरे पुरे, आतां नाटकप्रयोग बंद करा. हे सर्व स्थावर जंगम, प्राणिमात्र, मनुष्य, देवादिकहो ! महर्षि भगवान् वाल्मीकि यांच्या आज्ञेनें घडून आलेलें हें पवित्र आश्चर्य पहा !"

लक्ष्मण--खरेंच, काय हें आश्चर्य !

(**दिंडी**—दादरा.)

क्षुब्ध मंथें जणु जान्हविचें तोय ।
सुरर्षींहीं अंबर व्याप्त होय ॥

युक्त गंगा भूदेविशीं जहाली ।
जलापासुनि ही जानकी निघाली ॥ १ ॥

(पुन्हा पडद्यांत)

" भगवति अरुंधति ! आह्मी गंगा व पृथ्वी ही पुण्यव्रता सीता तुला अर्पण करितों, हिचा स्वीकार कर."

लक्ष्मण—दादा! हा चमत्कार पहा! (रामाकडे पाहून) काय ! हे अद्यापि शुद्धीवर येत नाहींत ? (अरुंधती व सीता प्र०क०)

अरुंधती—बाळे वैदेहि ! त्वरा कर, त्वरा कर, तूं थोडीशी भीड मर्यादा सोडून या रामभद्राला आपल्या हस्तस्पर्शानें शुद्धीवर आण.

सीता—(रामास स्पर्श करून) प्राणनाथ ! सावध व्हा! सावध व्हा !

राम—(सावध होऊन) अरे, हें काय ? (आश्चर्यानें) कोण देवी जानकी ! (लाजून) आणि अंबा अरुंधती ! तसेंच आनंदनिर्भर होत्साते ऋष्यशृंग व शांताआकासुद्धां सर्व गुरुजन ?

अरुंधती—वत्सा रामा ! ही प्रसन्न झालेली भगीरथ कुलदेवता गंगा.

गंगा—(पडद्यांत) हे जगत्पते रामभद्रा ! चित्रदर्शनाचे वेळीं तूं मला बोलला होतास त्याप्रमाणें प्रसाद करून मी तुझी उतराई झालें आहें.

अरुंधती—तशीच ही तुझी सासू भगवती वसुंधरा.

पृथ्वी—(पडद्यांतून) रामभद्रा ! माझ्या बाळेचा त्याग करते वेळीं तूं ह्मणाला होतास तें ध्यानांत ठेवून मीं जानकीचें रक्षण केलें आहे. आतां तुझ्या वचनांतून मी मोकळी झालें बरें.

राम—महाअपराधी असतांही भगवतींनीं दया केलेला हा राम अभिवंदन करित आहे.

अरुंधती—अहो पौरजानपद हो ! भगवती जान्हवी आणि वसुंधरा यांनीं अशी प्रत्यक्ष प्रशंसापूर्वक माझ्या स्वाधीन केलेली, भगवान् वैश्वानरानें जिच्या पुण्यचरित्राचा पूर्वीच निर्णय केला आहे, व देव, ब्राह्मण, ऋषी यांनीं स्तविलेली अशी ही सूर्यवंशीय राजांची कुलवधू, देवयजनसंभवा सीतादेवी, हिचा रामभद्रानें स्वीकार करण्याविषयीं आतां तुमचें काय ह्मणणें आहे बोला.

लक्ष्मण—पहा, भगवति अरुंधतींनीं निर्भत्सना केलेला सर्व प्रजाजन व प्राणिसमुदाय आर्या सीतादेवींना नमस्कार करीत आहे! तसेंच लोकपाल व सप्तर्षी पुष्पवृष्टि करून आपली अनुमति दर्शविताहेत!

अरुंधती—जगत्पते रामभद्रा! ही तुझी सहधर्मचारिणी महापतिव्रता प्रिया सीतादेवी हिचा स्वीकार कर. हिची सुवर्णप्रतिमा करून तूं यज्ञकर्म चालविलें आहेस, त्या ठिकाणीं आतां प्रत्यक्ष हिचीच योजना होऊं दे.

सीता—(मनांत) माझें दुःख दूर करण्याविषयीं प्राणनाथ समर्थ आहेत.

राम—जशी भगवतींची आज्ञा.

लक्ष्मण—आज मी कृतार्थ झालों.

सीता—आतां माझ्या जिवांत जीव आला.

लक्ष्मण—वहिनी! निर्लज्ज लक्ष्मण नमस्कार करीत आहे.

सीता—भावोजी! असेच चिरंजीव व्हा.

अरुंधती—भगवान् वाल्मीके! आतां उशीर कां? ते दोघे मुलगे कुशलव कोठें आहेत? त्यांना या उभयतांना भेटवावें. (जाते.)

राम—दैवानें तसेंच व्हावें.

सीता—(डोळ्यांत पाणी आणून) कुठें आहेत माझे बाळ ते!

(वाल्मीकि आणि कुशलव येतात.)

वाल्मिकी—वत्सांनो! हा तुमचा पिता रघुपति; हा लक्ष्मण, काका; ही सीतादेवी तुमची माता आणि हे राजर्षि जनक, तुमचे मातामह.

सीता—काय! बाबाही आले आहेत!

कुशलव—अहो बाबा–आई–अहो आजोबा!

राम—(त्यांस आलिंगून) बाळांनो! तुह्मीं मोठ्या पुण्यानेंच आह्मांला प्राप्त झालां आहां!

सीता—(प्रेमानें) बाळा, कुश-लवा! या या. या तुमच्या जणों जन्मांतराहून परत आलेल्या मातेला पुष्कळ वेळ भेट द्या कसे!

कुशलव—वाः! आज आह्मी मोठे धन्य आहों.

सीता—(वाल्मीकीस) भगवान्! आपणाला मी नमस्कार करितें.

वाल्मीकी—बाळे ! अशीच चिरकाल रहा.

सीता—(चोंहीकडे पाहून) अहाहा ! या सर्वांना पाहून यावेळीं मी आनंदानें कशी निर्भर झालें आहें.

(पडद्यांत)

'लवणासुराला मारून मथुरेश्वर झालेला शत्रुघ्नही आतांच प्राप्त झाला आहे.'

लक्ष्मण—कल्याणकारक गोष्टी घडूं लागल्या ह्मणजे पुष्कळशा एकदमच घडतात.

राम—या सर्व गोष्टींचा यावेळीं मी प्रत्यक्ष अनुभव घेत आहें, तरी मला त्या खऱ्या वाटत नाहींत हें काय ? अथवा अभ्युदयकाळीं मनाची अशी स्थिति साहजिक होतेच.

वाल्मीकी—रामभद्रा ! आतां आणखी मीं तुझें काय प्रिय करावें बरें ?

राम—याहून आणखी प्रिय तें काय करायाचें ? तथापि असें असो—

पद—(भैरवी.)

ही मंगलदायक कथा मनोहर। जगज्जननी कीं गंगेसम
अघहारक पावनकारक सतत श्रेयोवर्धक होवो ॥ध्रु०॥
शब्द ब्रह्मविद प्रबुद्ध कविकृति अभिनययुत रंगस्थलीं
अवलोकुनि बुधजन गुण सेवो ॥ १ ॥

(जातात. पडदा पडतो.)

[**अंक ५ वा समाप्त.**]